CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१५.५

5199

समयसार

पं. सुमतिबाई शहा

मूल्य पांच रुपये

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पं० श्री० फूलचन्द्रजी शास्त्री
बनारस

सादर भेंट

सुमतिचन्द्र शास्त्री

महिलाश्रम

सागपुर

१५ . १८ . ६८ - ६९

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

5199

समयसार

पं. सुमतिबाई शहा

मूल्य पांच रुपये

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सुमतिबाई शहा यांची पुस्तकें

* महापुराण
* रामायण
* सुवर्णरेखा

▲

समयसार ◉

चिंतनिका

आवृत्ति पहिली

१९६६

▼

– सर्व हक्क प्रकाशकाधीन –

प्रकाशक :

न. गौ. व्होरा,

सुरस ग्रंथमाला,

सोलापूर.

मुद्रक :

ना. ह. कोल्हटकर,

महाराष्ट्र-मित्र मुद्रणालय,

७७, शुक्रवार, सातारा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

:नि वे द न:

गेल्या वर्ष-दीड-वर्षांच्या मौन कालांत मीं जें आत्मचिंतन केलें, त्याला शब्दरूप प्राप्त झालें. या चिंतनाचा हेतु द्वंद्वमय जीवन सुसंवादी बनावें; बेसूर व भेसूर दिसणारें मानवी जीवन "न मे कर्मफले स्पृहा" या तत्त्वज्ञानानें प्रकाशित व्हावें, हा होता.

माणूस पुरुषार्थ करील, तर तो आत्मविकासोन्मुख होऊन आपला संसार सुखाचा करूं शकेल. दैनंदिन जीवनांत येणाऱ्या संकटांचा स्वतःच्या सामर्थ्य-वृद्धीसाठीं उपयोग करून घेतां येणें शक्य आहे. त्यासाठीं दीर्घ चिंतन हवें आहे. आळस व प्रमादशीलता या दोन गोष्टी सर्व प्रकारच्या उन्नतीस व विकासास बाधक आहेत. त्यांचा त्याग करून आपलें सारें जीवन मांगल्य, पावित्र्य व सौंदर्य यांनीं भरून टाकतां येणें शक्य आहे.

भारतीय व पाश्चिमात्य तत्त्ववेत्त्यांना ज्या गोष्टीचें मोठें कोडें पडतें ती गोष्ट म्हणजे 'आत्मा!' ज्याच्या अस्तित्वाबद्दल शंकाकुशंका असणाऱ्यांनीं अनेक प्रश्नांनीं भंडावून सोडावें व ज्यावर पूर्ण विश्वास असणाऱ्यांनींहि मधून मधून शंकाकुल व्हावें, अशी गोष्ट म्हणजे 'आत्मा!'

याच गोष्टीचा विचार या पुस्तकांत केला आहे. उपनिषदांत ज्यांचीं स्तोत्रें गायलीं गेलीं, तोच हा 'आत्मा' होय. प्लेटोनें त्यासंबंधीं आपले विचार मांडले. कान्ट आणि शॉपेनहॉवर या युरोपीयन तत्त्वज्ञांनींहि आत्म्यासंबंधीं अशाच प्रकारची विचारसरणी पुढे मांडली.

भारतीय महापुरुष भगवान् महावीर व त्यांचे अनुयायी यांनीं या आत्म-धर्माला अधिक उजाळा दिला. अनात्मवादी विचारसरणी भारतांतून पूर्णतः नाश पावली. परंतु आत्मदर्शन ही इतकी कठीण गोष्ट आहे, कीं तिचा पुनः पुन्हा विचार केल्याशिवाय ती चिरस्थायी होणें शक्य नाहीं.

प्रस्तुत ग्रंथ हा, भारतीय तत्त्वज्ञ व संत श्री कुंदकुंद (इ. स. अंदाजें १ लें शतक) यांच्या 'समयसार' या ग्रंथाचें स्वैर विवेचन आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विवेचन सुलभ व्हावें म्हणून मी आटोकाट प्रयत्न केला आहे. तरी पण कांहीं कांही 'संज्ञां' चा उपयोग मूळ ग्रंथांत असल्यानें त्या टाळून उपयोग नव्हता. त्या संज्ञांचे पर्यायवाचक शब्द शक्य तिथें दिले आहेत. जीवनाकडे पूर्ण सत्यानें पाहिलें असतां काय दिसून येतें, व व्यवहार म्हणून पाहिलें असतां काय दृष्टोत्पत्तीस येतें, अशा दोन प्रकारें सर्वत्र विचार केला आहे. या विचारसरणीला 'नय' अशी समर्पक संज्ञा आहे. परस्परविरोधी दिसणारीं विधानें विरोधीच असतात असें नव्हे, तर तीं एकमेकांस पूरक असून संपूर्ण सत्याला आविष्कृत करणारींहि असतात; इकडे फारच थोडयांचें लक्ष असतें.

दुसरें, यांतील संपूर्ण विचार जीव (आत्मा) आणि पुद्‌गल (जड – अचेतन) यांच्याशीं निगडित आहे. 'कर्म' अशी संज्ञा पुनः पुन्हा वापरली गेली आहे. कर्म हें अचेतन परमाणु असून विकारामुळें त्यांचा आत्म्याशी सयोग होतो. त्या संयोगाचीं फळें (बरीं-वाईट) भोगल्यावर कर्मविमुक्ति होते. कर्मविमुक्तीचा मार्गच एका अर्थानें यांत मांडला आहे.

तसेंच भाव, परिणाम याचा अर्थ मानसिक विचार असा घ्यावयाचा आहे.

यांतील जें मौलिक आहे, तें साधु-संतांचें आहे. जी उणीव असेल तेवढी माझी आहे. हें नवें पुस्तक सादर करतांना होणारा आनंद मात्र भीतियुक्त म्हणून संमिश्र आहे. वाचकांनीं हें कार्य गोड करून घ्यावें.

–लेखिका

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हे सिद्धपुरुषा !

मलिन भावाचा त्याग करून शुद्ध व स्वच्छ हें निसर्गतःच ज्ञानस्वरूपी असल्यामुळें त्या ज्ञानानें अनादि कालाचे उठणारे अज्ञानाचे तरंग तूं नाहींसे केलेस; अमंगल परिणाम नाहींसे झाल्यानें त्याचे मंगलमय परिणाम झाले आहेत; तुझ स्वाभाविक असलेले मंगल, पवित्र, शुद्ध भाव पुन्हा कधींहि अमंगल, अपवित्र व अशुद्ध होणार नाहींत; म्हणूनच तुला ध्रुवत्व प्राप्त झालें आहे

आतांपर्यंत परावलंबनामुळें तुझी वृत्ति चंचल होत होती; पण आतां पराकडे धाव घेणारी वृत्ति बंद झाल्यामुळें तेथें अचलत्व प्राप्त झालें आहे मीं कोणाची उपमा देऊन तुला त्याचें विशद-रूप सांगूं ? जगांत अशुद्ध पाणी निवळीच्या बीनें शुद्ध होतें, पण पुन्हा मातीच्या संगतीनें अशुद्ध होतें. आकाश स्वच्छ दिसतें, पण थोड्या वेळानें पुन्हा मेघाच्छादित होतें. अशुद्ध सोनें तावून-सुलाखून शुद्ध होतें; पण पुन्हा भेसळ केल्यास अशुद्ध होतें. हा मोठा पर्वत. कितीतरी काळ नानाप्रकारच्या झंझावातांतहि अचल होता तो ! पण तो देखील पृथ्वीच्या उदरांतील हाल-चालीनें नाहींसा झाला.

स्वभावतः शुद्ध, स्वच्छ; ध्रुव, अचल व पूर्ण ज्ञानी अशा सिद्ध भगवंतांना उपमा देण्यासारखें मला कांहीं सांपडत नाहीं. म्हणून श्रेष्ठ अशा अनुपम सिद्ध भगवंतांच्या चरणकमलीं माझें मस्तक नम्रीभूत होत आहे.

– १

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २ –

भारतीय संस्कृति आणि भारतीय तत्त्वज्ञान ज्याची स्तुति-स्तोत्रें गातात, ज्याच्या शोधासाठीं अनेक संत-महंतांनीं जंगलांत निवास केला अशी वस्तु म्हणजे 'आत्मा'. आत्म्याच्या शोधासाठीं, त्याच्या शुद्धीसाठीं, त्या परतत्त्वाला स्पर्श करण्यासाठीं सर्व विचारवंतांची केवढी धडपड !

मानवांतील ज्या मानवतेचा आज उद्घोष होत आहे, ज्या मानवतेच्या रक्षणसाठीं संसारांतील विविध तत्त्वज्ञानी, राजकारणी व साधुसंत बद्धपरिकर झाले आहेत, ती मानवता म्हणजेच आत्मा.

ज्याचं अस्तित्व दृष्टीनं न दिसतांहि इंद्रियगम्य आहे, ज्याची सत्ता दिवसरात्र चालू असूनहि अनाकलनीय आहे, ज्याचं स्वरूप इतकं विविध आहे, इतकं वैचित्र्यपूर्ण आहे कीं त्याच्या संबंधानें सहजासहजीं गफलत व्हावी; कुणी त्याला सगुण म्हणावं, कुणी निर्गुण म्हणावं, कुणी त्याला क्षणविनाशी म्हणतात, तर कुणी अमर – नित्य म्हणतात. कुणीं कांही म्हटलं तरी हें खरं कीं त्याचा शोध घेण्याचा मानव प्रयत्न करीत आहे. त्या 'आत्म' दर्शनासाठीं तो युगानुयुगें उभा आहे, प्रयत्नशील आहे. आकाशाचं अस्तित्व कळूनहि असंख्य मैल पसरलेल्या त्या पोकळीचं संपूर्ण ज्ञान जसं मानवाला घडूं शकलं नाहीं. तसं आत्म्याचं आहे. त्याच्या स्वभावाचे पैलूच अनंत आहेत. पाहणाऱ्याला, जाणणाऱ्याला तो विविध, विचित्र आणि अनाकलनीय वाटतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

याचं कारण अनेक शास्त्रें, अनेक तत्त्ववेत्ते, अनेक साधु-संत वेगवेगळं सांगतात. या वेगवेगळ्या कथनांतहि वैचित्र्य—संगति आहे, असंगति नाहीं, खोट नाहीं.

सोन्यांतील इतर धातु वेगळे होऊन तें जसं शुद्ध व्हावं, गढूळ पाण्यांतील गाळ दूर होऊन तें जसं शोभून दिसावं तशी स्थिति आत्म्याचीहि होते.

अनेक सुष्ट, दुष्ट आचार, अनेक मानसिक शुभ अशुभ विचार, विविध प्रकारचें पण आत्मोत्कर्षाला बाधक, विरोधक व विघातक अशा प्रकारचें ज्ञान यांचीं भलीं-बुरीं पटलं शरिराभोवतीं वस्त्र गुंडाळावें, तशी आत्म्याभोवतीं गुंडाळलीं जातात. पाण्यांत मीठ टाकल्यावर तें जसें पाण्याशीं एकरूप होऊन पाण्याची गोडी खारट करून टाकते तसेंच आत्म्याच्या बाबतींत घडत जातें. आत्म्याला वेढून ठेवणारीं हीं पटलं इतकीं तीव्र होतात, वज्रमय होतात, कीं शुद्ध विचार, शुद्ध आचार, शुद्ध ज्ञान होणंहि अवघड होऊन जातं. हेंच पारतंत्र्य, हीच गुलामी. या गुलामीच्या पाशांमुळं ही पटल-बद्ध अवस्था गुलाबी वाटते, मोहक वाटते. मूळचा आत्मधर्म अधर्म रूपानं दिसूं लागतो. क्रियाहि नेमक्या उलट होतात. धोत्र्याचं बीं खाल्लेला माणूस जसा वेड्याप्रमाणं वागतो, दारूची नशा चढलेला माणूस जसा विवेकहीन होतो तसा या पटलांनीं वेढलेला माणूस !

या पटलांना कर्म-पटल अशी संज्ञा आहे. हें कर्म-पटल अचेतन आहे,-जड आहे, असें असूनहि त्याचें सामर्थ्य मोठें. लोखंडांत अग्नीनें प्रवेश करावा, कलीनें राजा नळाच्या शरिरांत प्रवेश करावा, तसें हें जड, निर्जीव कर्म-पटल आत्म्यांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रवेश करते, भूतानं पछाडलेला माणूस स्वतःचे विचार न बोलतां भूताचे विचारच बोलत असतो. तसेंच आपलें होतें. जी क्रिया, जें ज्ञान आणि जी श्रद्धा आपण स्वतःची म्हणवितों, त्यावर या कर्मांचा ताबा पोंचतो. सर्व आत्म्यावर यांचाच अंमल चालतो. उपाधि म्हणजे हीच. हेंच पारतंत्र्य मायावादी याच प्रक्रियेला 'माया' म्हणतात. स्वत्व लयाला जातें आणि कर्मपटलांनीं खरें चारित्र्य, खरे ज्ञान आणि खरी श्रद्धा काळवंडून जातात. हेंच आत्म्याचें पतन. या पतनाची, अधःपाताची त्याला जाणीव होते. तो जागृत होतो कर्म-पटलें आत्म-सूर्यानें विरघळूत जातात.

सर्वत्र मांगल्याचं, स्वतःच्या अनेक गुणांच्या किरणांच्या प्रकाशाचं त्याला दर्शन घडतं, तेव्हां तो शुद्ध, बुद्ध, अर्हत् होतो. तेंच त्याचं कैवल्य, निर्वाण, मोक्ष, वैकुण्ठ. तिथं सगळे विकल्प थांबतात.

★ ★ ★

– ३ –

सौंदर्य कुठं आहे ?

सौंदर्य वस्तूच्या अकृत्रिमतेंत आहे; नैसर्गिकतेंत आहे. विकृतींत नाहीं. सारं जग उजळून काढायला सूर्य जसा तेजस्वी बनला आहे तसा आपला आत्मा प्रकाशमान बनला पाहिजे. सूर्याला कुठेंहि अंधःकार दिसत नाहीं. त्याच्या सौंदर्याची, त्याच्या श्रेष्ठतेची कधीं जाहिरात करावी लागत नाहीं. त्याला स्वतःच्या पराक्रम-व्यक्ततेला, सौंदर्याविष्काराला कुणाची साथ घ्यावी लागत नाहीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कर्म-पटलांनीं मुक्त झालेला आत्माहि त्या सूर्यासारखा असतो. त्याच्या मांगल्याविषयीं, त्याच्या सुंदरतेविषयीं कितीहि सांगितलं तरी तें अपूर्ण असतं आंशिक असतं.

उपाधि, माया किंवा कर्म-बंध ह्यांनीं झांकळलेला आत्मा सुंदर दिसतो. तो स्त्री असतांना सुंदर दिसतो, तो राजा असतांना सुंदर दिसतो, तो नाच-नृत्यांत सुंदर दिसतो, या म्हणण्यांत विसंगति आहे. कारण कांहींना तें सुंदर दिसतं, कांहींना ती विकृति वाटते. कारण परावलंबन हाच या सौंदर्याविष्काराचा प्रमुख आधार. आधाराशिवाय जें उभें राहूं शकत नाहीं तें सौंदर्य अस्थिर आहे, चंचल आहे, विनाशी आहे

अशा कर्मबद्ध स्थितीला सुंदर म्हणण्यामुळंच पारतंत्र्य दृढावत जातं, जीवनाला तडे जातात. जें अहितकारक, अपाय-कारक, आत्मविघातक वा आत्मबाधक तेंच सुंदर वाटूं लागतं. अशा विसंवादांतून बाहेर येणं, शुद्ध आत्मतत्त्वाचा निर्विकल्प विचार करणं हाच खऱ्या सौंदर्य-सशोधनाचा मार्ग !

* * *

— ४ —

इच्छा, वासना आणि उपभोग हा जणुं मानवजातीला अभिशाप आहे. उपभोगाची सहजप्रवृत्ति विकृतीकडे वळते. संचयाचे मार्ग मानवजात शोधून काढते. त्या संचयप्रवृत्तीनें मानसिक शांतता नष्ट होते. शरिराचें आरोग्य नष्ट होतें.

चंदनाच्या सुवासानें वेडावणारा सर्प, पुष्प-मधूमुळें गुंजारव करणारा भुंगा, मधुर संगीतानें मुग्ध होणारें हरीण, हीं तर केवळ जनावरेंच !

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पण... पण माणसाला बुद्धि दिली आहे; सारासार विवेक दिला आहे; तरीहि जीवनाची होळी करण्यासाठींच जणुं या साऱ्यांचा प्रयत्न होत आहे. ग्राह्य आणि त्याज्य, योग्य आणि अयोग्य यांचा विचारच त्याच्या मनांत येत नाहीं. भौतिक समस्या ह्याच जीवनाच्या खऱ्या समस्या होत, असें कल्पून तो अहर्निश त्यांच्या मागें लागला आहे. कधींहि न संपणाऱ्या ह्या भौतिक गोष्टी तो उराशीं बाळगून आहे.

उपनिषदांत ऋषींनीं देखील भौतिकतेकडे वळणाऱ्यांना 'नेति' म्हणून उत्तर दिलं आहे. जो प्रश्न सोडविण्यांत मानव-जात गुंतली आहे, तो जीवनोत्कर्षाचा प्रश्न नाहींच मुळीं. सोडविण्यासारखा एकच प्रश्न सर्व तत्त्वज्ञान्यांना आणि साधु-संतांना वाटला; तो म्हणजे आत्म्याचा शोध !

भौतिक पदार्थांचा शोध घेणं, त्यांच्या घडामोडींचा अभ्यास करणं, त्यांतील रहस्य जाणून घेणं कदाचित् शक्य आहे. त्या रहस्य प्राप्तीनं मानवाच्या उपभोगाची मर्यादा वाढेल, चंद्रावरहि कदाचित् तो आरूढ होईल; पण वासना आणि तृष्णा यांच्या महासाम्राज्यांत त्याचा निभाव लागेल का ? त्याच्यांतील क्षमा, मार्दवादि गुण शिल्लक राहतील का ? तो माणूस म्हणून तरी जगूं शकेल का ?

या साऱ्या प्रश्नांचं उत्तर भारतीय तत्त्वज्ञ एकमुखानें 'नाहीं' असं देतील. कारण उपभोगाची परिसीमा गांठणाऱ्या शेंकडों जमाती या पृथ्वीच्या पाठीवर जन्मून, नांदून इतिहास-जमा झाल्या आहेत. तो मार्ग सोपा आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परंतु आत्म्याभोंवतीं क्रोध, मान, माया, लोभ, ईर्षा, असूया, दंभ इत्यादि शत्रूंनीं पसरलेलं रेशमी जाळं तोडून बाहेर पडणं, आत्मसूर्याचीं सहस्र किरणं स्वतेजानं झळाळून निघणं हें कठीण आहे. * * *

— ५ —

आत्म्याचं तें तेज झळाळून बाहेर पडावं; आत्म्याला परमात्मा करता यावं याचा मार्ग मी तुम्हांला सुचविणार आहे. अनुभव आणि सिद्धी या दोनच गोष्टीमुळं कांही सप्रमाण व तर्कबद्ध विचार वाचकांपुढं मांडणं शक्य आहे.

अंतिम सत्याचं प्रामाणिक दर्शन घडविणं, त्या सत्याची व जीवननिष्ठेची सांगड घालून देणं, जी जीवननिष्ठा तें परम सत्य आत्मसात् करूं शकेल अशा जीवननिष्ठेची घडण करणं, हें या ग्रंथांतील विचार वाचून सहज शक्य होईल.

असें निश्चितपणें सांगतांना हें मीहि समजतें, कीं मी सर्वज्ञ नाहीं. पण अंतिम सत्याचें जें दर्शन मला घडलें, तें केवळ काल्पनिक नाहीं. सूर्य ही वस्तु जशी काल्पनिक नाहीं, तसें अंतिम सत्य हेंहि काल्पनिक नाहीं.

दर्शविलें जाणारें अंतिम सत्य हें प्रमाण आणि तर्क या कसोटीवर तुम्ही घासून पहा. कुणा ग्रंथाचा वा गुरूचा हवाला मी देत नाहीं. तुम्ही स्वतःच ‘पारखी’ व्हा; आणि ज्या अंतिम सत्याच्या शोधांत मी होतें, तें तुम्हालाहि अनुभवाला येऊं शकलें, प्रामाणिक वाटलें, तर ग्राह्य समजा. * * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– ६ –

आत्माच नाहीं म्हणणाऱ्यांनीं एक प्रकारें स्वतःची सुटका करून घेतली आहे. कारण जीविताचा हेतु सांगण्याची जबाबदारी ते पत्करूं शकले नाहींत. जन्मानें सुरू होणारा जीवन-प्रवाह मृत्यूंत विलीन होतो. याची मीमांसा करणं जड गेलं त्यांना.

कांहींनीं अचेतन पदार्थांच्या संयोगानं जीवनाची निर्मिती झाली असं सांगून प्रश्न सोडविण्याची खटपट केली. परंतु सचेतन जीवांजीवांतील वैविध्य, वैचित्र्य, वैरूप्य पाहून त्यांना स्वतःच्या उपपत्तीशीं प्रामाणिक राहतां आलं नाहीं.

क्षणक्षणाला बदलणाऱ्या अवस्था पाहून बौद्धांनीं क्षणिक-वाद स्वीकारला. पण अनित्यतेंतहि नित्यता आहे; क्षणाक्षणाला नवीन नवीन पाणी घेऊन वाहणाऱ्या गंगेचें 'नदीत्व' स्थिरच नाहीं का ?

म्हणूनच अनेक तर्क-वितर्क होऊन आत्म्याचं अस्तित्व सर्व तत्त्वज्ञानी माणसांना मान्य करणं भाग पडलं. दुसऱ्या कोणत्याहि प्रकारें जीवनाची संपूर्ण जबाबदारी या शरिरावर किंवा बाह्य भौतिक पदार्थांवर टाकतां येईना.

चैतन्य स्वरूप आत्मा, ज्ञानमय आत्मा हाच या विविधतें-तील सत्य आहे. बाह्य, भौतिकतेमुळें त्याचें आकलन नीट होत नाहीं. आरसा धुळीनें माखला म्हणजे जसें प्रतिबिंब नीट दिसत नाहीं, तीच गोष्ट आत्म्याची आहे. कर्म-पटलांमुळें तो अशुद्ध भासतो; त्याच्या अभावानें शुद्ध वाटतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परावलंबनामुळेंच अशुद्ध व शुद्ध असे दोन प्रकार आपण करतों. जसें धन असणाऱ्याला 'धनिक' व नसणाऱ्याला 'निर्धन'. पण जन्मतः बालक धनिक किंवा निर्धन नसते. धनाच्या दृष्टीनें मानवाचे असे वर्ग करणें हें जितकं असमंजस तितकंच कर्मपटलाच्या दृष्टीनं आत्मदेवाचं शुद्ध आणि अशुद्ध असं वर्गीकरण करणं !

* * *

– ७ –

अनेक वस्तूंशीं संयोग झाल्यामुळें एकच वस्तु भिन्न भिन्न गुणांची दिसून येते. अशी भिन्नता इतकी गुंतागुंतीची असते, कीं त्यांतील एकता, त्यांतील वास्तविकता सहजासहजीं आकलन होत नाहीं.

ही गोष्ट आत्म्याचा विचार करणाऱ्या अनेक साधु-संतांच्याहि बाबतींत झालेली आढळते. जगांतील दुःख पाहून बुद्धाला त्या दुःखांना पूर्ण विराम कसा देतां येईल हा प्रश्न पडला. पण हीं दुःखं ज्याचीं त्यानंच कमी करायचीं असतात आनंदाचं वातावरण ज्याचं त्यानंच निर्माण करायचं असतं. आत्म्याचं सौख्य हिरावून नेणारीं भौतिक दुःखें म्हणजे आत्मा नव्हे. सर्व-प्रकाशी आत्मा म्हणजे कां दुःख ? सूर्य म्हणजे का अंधःकार ?

सूर्य दर्शनानें उजेड न पाहणारीं घुबडें पहा ! त्यांनीं डोळे उघडले नाहींत म्हणून त्यांना सर्वत्र अंधःकार आहे. तशीच गोष्ट आपली झालेली आहे. आत्मसूर्याकडे आपण पाठ करून उभे आहोंत. शरीर, संसार आणि भोग यांच्याकडे आपलें संपूर्ण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लक्ष आहे. त्यांची प्राप्ति हेंच सुख. त्यांचा वियोग हेंच आपलें दुःख. पण हें सारं सोडवत नाहीं. पारतंत्र्यांत राहून मिळणारी भौतिक शाश्वति स्वातंत्र्यांत हमखास मिळेलच असें न मानणारे ज्याप्रमाणें पारतंत्र्यांतहि सुखी असतात तसेंच आपलें झालें आहे.

विकारी मन जसं विदेहाची साधना करूं शकत नाहीं, भोगासक्त शरीर जसं दुबळं झाल्यामुळं कांही पराक्रम करूं शकत नाहीं, तसच आपण विषयांध झाल्यामुळं आत्म-दर्शन करूं शकत नाहीं. दोन्ही डोळे जवळ जवळ असूनहि जसें आपण स्वतःस पाहूं शकत नाहीं तसेंच भिन्न भिन्न मतांच्या गोंधळांत आत्म्याच्या त्रिकालवर्ती, चिरंतन स्वरूपाचें आकलन आपणांस होत नाहीं.

कांही म्हणतात आत्मा म्हणजे ज्ञान, कांही म्हणतात आत्मा म्हणजे चारित्र्य, आणि कांही या तिहींच्या एकरूपतेंत आत्म्याची ओळख करून देतात, यांत आंशिक सत्य — व्यावहारिक सत्य असलं तरी अंतिम सत्य नाहीं. तीन मुलें आपल्या नांवापुढें आपल्या वडिलांचें नांव लावीत असलीं तरी वडील जसे एकच असतात शिवाय त्यांचे 'वडील' असूनहि आणखीहि ते 'कुणीतरी' असतात; तशी विविधता, विचित्रता, अनेकरूपता असूनहि आत्मा हा खऱ्या अर्थानें यांतला कुणीच नाहीं. तो स्वतः शुद्ध असून सर्वविद् आहे — ज्ञायक आहे — सर्वदर्शी आहे अंशात्मकतेनं त्याचं वर्णन केवळ याचमुळं करायचं कीं शब्द-मर्यादा तोटकी आहे. विश्व प्रकाशित करण्यास जसा एक अणु अपुरा आहे, तसे शब्द हे त्या आत्म-सूर्याचं वर्णन करायला अपूर्ण आहेत.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

-८-

ही अपूर्णता लक्षांत घेऊनच मानवी वाणीला व्यवहारानं बोलावं लागत. आंशिक सत्यानं चिरंतन सत्याचें स्वरूप दाखविण्याचें अवघड काम करावें लागतें. भौतिकतेंतूनच आध्यात्मिकतेकडे वळावें लागतें. अंधारांतून प्रकाशाची ओळख करून घ्यावी लागते

आई आपल्या मुलाशीं बोबडें बोलते तें तिला शुद्ध बोलतां येत नाहीं म्हणून नव्हे; ती मुलासाठीं रांगते, तें तिला चालतां येत नाहीं म्हणून नव्हे. यांतच खऱ्या शिक्षणाचें तत्त्व आहे.

समोरचा समाज खेडवळ – अडाणी असेल तर वक्त्यानें संस्कृतमध्यें बोलून कसें चालेल ? भाषा ही जशी माध्यम आहे, तसेंच आंशिक कथन, व्यवहाररूप कथन हें माध्यम आहे. माध्यम म्हणजे साधन. साध्य हातीं गवसताच साधनांचा आपण त्याग करतों. तसंच अंतिम सत्य गवसतांच आंशिक, व्यावहारिक दृष्टिकोन आपण बदलला पाहिजे. नारळाचा गाभा हवा असेल तर वरील कवच जसें आपण फोडून फेकून देतों, तसेंच अंतिम सत्याचें दर्शन व्हावें म्हणूनच व्यावहारिक दृष्टिकोनाचा आपण स्वीकार केला होता, परमार्थ कळण्यासाठीं व्यवहाराचं अवलंबन घेतलं होत, सहाय्य घेतलं होतं, त्याशिवाय परमार्थाचं साधं आकलन होणंहि शक्य कोटींतलं नव्हतं.

हत्ती न पाहिलेल्या माणसाला चित्र दाखवून हत्तीच्या स्वरूपाची कल्पना आपण करून देतों; पण तें चित्र म्हणजे हत्ती

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाहीं; हत्तीएवढें चित्र दाखविणेंहि अशक्य. असें असतां हत्तीचें चित्र पाहणारा आपण हत्ती पाहिला असें समजतो. त्याचप्रमाणें आत्म्याचें दर्शन घडवून आणण्याचें अवघड कार्यहि व्यवहाराच्या (अंतिम सत्याच्या दृष्टीनें तो खोटा असला तरी) सहाय्यानें पार पाडण्यांत येतें.

* * *

— ९-१० —

मानवाच्या विचारांचा संग्रह म्हणजे ग्रंथ. ज्या ग्रंथांनीं अंतिम सत्याचे दर्शन घडविण्याचा सत्यसंकल्प केला; वैचित्र्यांतहि, वैचित्र्यांतहि, अनेक विकृत स्वरूपांतहि आत्म्याचें शुद्धत्व, आत्म्याचें परमात्वत्व पाहण्याचा प्रामाणिक व नैष्ठिक रीतीनें प्रयत्न केला ते ग्रंथ म्हणजे श्रुत. या साऱ्या श्रुतांचा निर्विकारपणें ज्यानें अभ्यास केला, त्या श्रुतांचा अर्थ पारमार्थिकपणें समजावून घेतला, अशा महाविद्वानाला कैवल्याची प्राप्ति जरी झाली नसली तरी त्याला 'श्रुतकेवली' असें म्हटलें जातें.

जप, तप, अनुष्ठान व योग यांच्यामुळं कर्मपटलांचा धुव्वा उडविणारा माणूसच खऱ्या अर्थानें केवली — सर्व तत्त्वदर्शी — होऊं शकतो. परंतु असें न करतांहि केवळ आत्महितदर्शक ग्रंथांचें अवलोकन, मनन व चिंतन करणारा, पुढें केव्हां तरी खरें आत्मस्वरूप पाहील किंवा पाहूं शकेल. म्हणून व्यवहारानें — किंवा सापेक्षतेनें त्यासहि तत्त्वबुद्ध — अर्हत् म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

ग्रंथांतील विचारांचें सामर्थ्यंच इतकें प्रभावी असूं शकतें कीं त्यांतून माणसाच्या मनाची घडण होऊं शकतें. उत्तम ग्रंथांनीं घडण चांगली होईल. ग्रंथाच्या श्रेष्ठतेवरच हें अवलंबून आहे.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– ११ –

. एखाद्या चित्रावरून वस्तूची केवळ सामान्य कल्पनाच आपणाला येऊं शकते. त्या वस्तूचे जे विविध गुण आहेत, ते चित्रांनीं दर्शवितां येत नाहींत. फुलांचा सुवास, साखरेची गोडी, वस्तूचें वजन हें चित्रांतून कसं दाखवितां येईल ?

म्हणून चित्रांतून झालेलं ज्ञान हें सामान्य स्वरूपाचं तकलुफी आणि हवें तितकें सत्य स्वरूपाचें नसतें. एखाद्या वस्तूकडे केवळ व्यावहारिक दृष्टिकोनानें पाहिल्यानें होणारें ज्ञान हें अंतिम सत्य-दर्शनाच्या अपेक्षेनें अगदींच तोकडें असतें. असें मानतांना हीच गोष्ट प्रतीत होते.

अंतिम सत्याकडे जाण्याचें तें साधन असलें तरी साध्य नसतें. म्हणूनच व्यावहारिक बाजूचा विकल्प सोडून केवळ शुद्ध दृष्टीनें आत्म्याकडे पाहिलें किंवा पहायला शिकलें म्हणजे आपली मनोदृष्टि सम्यक् होते. तिच्यांत गोंधळ, असंबद्धता आणि तर्कदुष्टता राहत नाहीं. क्षुब्ध मनःप्रवृत्तींतून होणारे वस्तुदर्शन हें सत्य असूं शकेल का ? ज्याच्या मनांतच तत्त्वा-संबंधीं अनिश्चितता व गोंधळ आहे, तो दुसऱ्यासहि गोंधळांत टाकील. अस्थिर पाण्यांत पडणारें प्रतिबिंब जसें अस्थिर असतें, चंचल असतें, अस्पष्ट असतें तसेंच अस्थिर मनोवृत्तींत होणारें सत्यदर्शन अस्थिर, चंचल आणि आंशिक असतें.

अक्षुब्ध, शांत, स्थिर मनःप्रवृत्तींतून केलेला आत्मविचार सम्यक्, शुद्ध आणि अविकल असूं शकेल; असा विचार करणा-राच आत्मशुद्धीच्या मार्गांतील पथिक होऊं शकेल. * * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– १२ –

गरजेप्रमाणें किंवा आवश्यकतेप्रमाणें स्वतःचा दृष्टिकोन बनविणारे लोक नित्यशः आपण पाहतों. ज्यांना दारिद्र्य लाभलेलं असतं, धनाच्या अभावीं ज्यांचा पदोपदीं कोंडमारा झालेला असतो, तो मनानें कटु बनून 'अर्थवादी' बनतो. पैशाशिवाय कांहींच होणं शक्य नाहीं असं त्याला वाटतं.

ज्याला खूप तहान लागली असेल असा मनुष्य जर अडाणी असेल तर तहान भागविण्यासाठीं तो अशुद्ध पाणी देखील प्राशन करील. पण ज्याला आरोग्याचें थोडें ज्ञान आहे तो, तें पाणी तहान लागल्यावरहि पिणार नाहीं. त्याचें लक्ष शुद्ध पाणी मिळविण्याकडे असतें.

व्यवहारानें बोलायचें झालें, सापेक्षतेनें सांगावयाचें झालें, तर ज्यास केवळ इहलोकाचाच विचार करायचा असतो, भौतिकतेंतूनच जीवनाचा प्रश्न सोडवायचा असतो, तो सापेक्ष होऊन सत्याचें आकलन करील. सत्य हें त्याचें अंतिम ध्येय असत नाहीं.

पण ज्यास अंतिम सत्याचें मंगल दर्शन घ्यावयाचें असतें, त्याच्या दृष्टीनें ही भौतिकता, हें परावलंबी जीवन तुच्छ असतें. तो एका जन्म-मरणाचा विचार करीत नाहीं. गेल्या अनंत जन्म-मरणांचीं बीजं नष्ट करणं, हेंच त्याचं ध्येय असतं. म्हणून तो तात्कालिक जन्ममरणाचा विचार करीत नसतो. एक-वस्तु-दर्शनापेक्षां संपूर्ण विश्वदर्शन घेण्यास तो उत्सुक झालेला असतो. त्याची झेंप मोठी असते. अनंताला गवसणी घालण्याची महत्त्वाकांक्षा त्याच्या ठिकाणीं निर्माण झालेली असते. हीच त्याची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पारमार्थिकता आहे. याच पारमार्थिकेंतून तो चिरंतन, अविनाशी अशा अक्षय शुद्ध जीवनाचा साक्षात्कार घेण्यास प्रवृत्त होतो, त्याच्या या दृष्टिकोनासच शुद्ध दृष्टिकोन म्हणणें हितावह आहे.

* * *

- १३ -

ज्या शुद्धदृष्टिकोनाचा आपण नुकताच उल्लेख केला. त्याचं कार्य आहे चेतन सृष्टीचा व अचेतन सृष्टीचा वेगवेगळा विचार करणं. अचेतन पदार्थ पाहिल्याबरोबर या चेतनेंत लहरी कां निर्माण होतात ? शांत अशा तळ्यांत एखादा खडा टाकतांच त्यांत शेंकडों वलयें निर्माण व्हावींत यांत कोणतें रहस्य आहे ?

धनप्राप्तीनं उन्माद कां चढावा ? त्याच्या अभावानं विशाद कां वाटावा ? या भौतिक सुखदु:खाच्या लाटा नित्यश: निर्माण करणारा कोण ? या लाटा कधीं तरी थांबून सुख-दु:खातीत अशी परम शांत, गंभीर अशी अद्वैतावस्था, अशी निर्द्वंद्वावस्था प्राप्त होणं कसं आणि केव्हां शक्य आहे ?

मानसिक संतुलन क्षणांत नष्ट होऊन मानवानें राग करावा, लोभाला प्रवृत्त व्हावें, एकमेकांच्या हिंसेला उतावळे व्हावें, या विकारपूर्ण स्थितीचा निर्माता जर मानवच असेल तर ती स्थिति येऊं न देणं हेंहि त्याच्या हातांत आहे. कर्मबद्ध अवस्थेंतून कर्ममुक्त अवस्था प्राप्त करून घेणं, अज्ञानाच्या किंवा कुज्ञानाच्या अंध:कारांतून आत्म-सूर्याच्या प्रकाशांत जाणं हेंहि त्याच्याच हातीं आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आत्म-सूर्याच्या प्रकाशांत विहरावं, बागडावं, त्याच्याच अनंत, अक्षय सुखाचा प्रत्यय घ्यावा असं जेव्हां वाटतं, त्याच स्थिताला सम्यक् स्थित–अवस्था म्हणतात. या सम्यक्-स्थितींत तो पूर्णतः विश्वस्त असतो, निर्भय असतो, निःशंक असतो. स्त्री माहेरीं जितकी प्रसन्न असते तितका तो त्या स्थितींत प्रसन्न असतो.

* * *

–१४–

हीच शुद्ध दृष्टि जेव्हां स्वतःच्या निर्मळ चष्म्यांतून स्वतःच्या आत्म्याकडे पाहते तेव्हां तिला सारं विश्वच वेगळं दिसूं लागतं. अंधाराचं वस्त्र विरळ होत चाललं म्हणजे जगाच खरंखुरं स्वरूप दृष्टिगोचर होतं, तसं कर्मबद्ध असलेला आत्मा कर्मबद्ध दिसत नाहीं. प्रत्यहीं सुखदुःखांत भिजून निघणारा आत्मा कमळाप्रमाणं वाटतो. कमळ पाण्यांत राहूनहि पाण्यापासून तें ओलें होत नाहीं. चिखलांत राहूनहि तें मलिन होत नाहीं.

हीच गोष्ट आत्म्याची असलेली दिसून येते. तो कर्मबद्ध वाटत नाहीं, तो मलिन वाटत नाहीं, तो दुसऱ्या कसल्याहि विकृत स्वरूपांत दिसत नाहीं. तो मनुष्य स्वरूपांत दिसत नाहीं; स्त्री स्वरूपांत नाहीं; तो श्रीमंत दिसत नाहीं; तो गरीब, हीन-दीनहि दिसत नाहीं. द्वैताची कसलीहि घाण त्याला चिकटलेली रहात नाहीं. तो सूर्यासारखा एकटाच, अगदीं एकटाच स्वतंत्रपणें स्वतःला प्रकाशमान करीत जगाला उजळीत असतो. स्वतःच्या प्रकाशाला कुणा दुसऱ्याचं तेज नसनं घ्यावं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लागत नाहीं त्याला. त्याच्या श्रेष्ठतेचे पोवाडे तो गात नाहीं. कारण त्यांत चंद्राला होणारे चढ-उतार, घट-वढ नसतात. सतत प्रकाशित राहणें स्व-तेजानें झळकत राहणें हाच एकमेव त्याचा स्थायी व चिरंतन स्वभाव असतो. कितीहि काळ लोटला तरी त्यांत परिवर्तन होणार नसतं. कसल्याहि बंधनानें तो बांधला जात नाहीं. त्याच्या तुलनेलाहि जणुं तोच असतो.

ज्याला शंकराचार्यांनी 'प्रकृति', ज्याला बुद्धानें 'क्षणिक' म्हणून संबोधिला, ज्याला चार्वाकानें केवळ भौतिक ठरविला, ज्याला कांहींनीं परमेश्वराचा अंश म्हणून सांगितला, तो हा आत्मा तसा नव्हता. तो यांपैकीं कसल्याच विशेषणांनीं संबद्ध नाहीं. सूर्याला जशी स्थळ-काळाची मर्यादा घालून हा भारतीय सूर्य, हा जपानी सूर्य, हा चीनी सूर्य असें म्हणणें वेडगळपणाचें वाटेल, तसेंच शुद्ध आत्म्याला अशुद्धतेचे, संबद्धतेचे, मालिन्याचे, उपमेयाचे, अनित्यतेचे, वैविध्याचे, व वैचित्र्याचे आरोप करून आपण त्याचें स्वरूप ओळखूं शकत नाहीं.

वेडाच्या भरांत बोलल्या जाणाऱ्या शब्दांतून मानसिक विचारांची संगति लावणें जितकें कठीण तितकेंच अशा असंगत विशेषणांनीं संबोधलेल्या जाणाऱ्या आत्म्याचें सत्य स्वरूप शोधून काढणें कठीण !

* * *

– १५ –

शुद्ध आत्म-देवाचा आपणाला साक्षात्कार करून घ्याव-याचा आहे. तो साक्षात्कार व्हावा, तो केवळ भास ठरूं नये

– २

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यासाठीं विविध तत्त्वज्ञांनी अनेक प्रकारची काळजी घ्यायला सांगितली आहे.

असं सांगतात कीं एका व्यक्तीला कांही सिद्धी प्राप्त करून घ्यावयाची होती. तेव्हां त्याच्या गुरूनं सांगितलं कीं 'तुझ्या मनांत माकडाचा विचार येऊं देऊं नकोस. माकडाचा विचार आला कीं तुझी सिद्धी पूर्ण होणार नाहीं.' गुरूनें असें सांगितलें नसतें तर त्याच्या मनांत माकडाची कल्पनाच कदाचित् शिरली नसती. परंतु गुरुपदेशानं नेमकं हें झालं कीं, ज्या ज्या वेळीं तो मन एकाग्र करी त्या त्या वेळीं केवळ माकडाचा विचारच त्याच्या भोवतीं घिरट्या घालूं लागून त्याची एकाग्रता भंगून टाकूं लागला.

हीच गोष्ट आत्म-दर्शन होण्याच्या बाबतींत घडून येते. शरिराचं स्वास्थ्य, शरिराची सजावट, इंद्रियांनीं उपभोगतां येणारी भोगसामग्री यांच्यामुळं मनाची एकाग्रता होणं अशक्य झालं. सारं लक्ष याच गोष्टींकडे गुंतून राहिलं.

त्यामुळं आत्मा स्वतंत्र आहे, मुक्त आहे, ज्ञानस्वरूपी आहे, अभेद्य आहे, अदाह्य आहे हें विसरलें गेलें.

ही विस्मृति ज्याला होत नाहीं, ज्याला असा अनुभव येतो कीं, माझा आत्मा अनिर्बंधपणें, मुक्तपणें, स्वैरपणें, ज्ञान-सागरांत संचार करूं शकतो, अचेतन सृष्टीकडूनच नव्हे तर दुसऱ्या चेतन सृष्टीकडूनहि ज्याला कसलाच प्रतिबंध होत नाहीं, तोच खरा आत्मजित् आहे. आत्मजितांचं अधिराज्य तें हेंच ! जड पदार्थावरील अधिराज्य, सत्ता ही नश्वर, चंचल आणि दुःखदायक आहे तर आत्मजितांच्या अधिराज्यांत दुःखाला थारा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाहीं, अज्ञानाला वाव नाहीं, भेद–व्यक्तीकरणाला जागा नाहीं. तेथें केवळ ज्ञानसूर्य स्व-तेजानें प्रकाशित असतो सर्व भौतिकतेचीं कवचें जळून नष्ट झालेलीं असतात.

मग आपणाला हा भेदहि करायला वाव नसतो कीं आत्मा आणि त्याचं ज्ञायकत्व वेगवेगळं आहे. साखर आणि तिची गोडी ही जशी स्वभावानें अभिन्न आहे तशीच रीत आत्मा आणि त्याचें ज्ञायकपण – ज्ञातृत्व यांची होते. * * *

: १६ :

मानवी जीवनांत श्रद्धेला मोठें महत्त्व आहे. लक्षावधि साधु-संतांनीं या श्रद्धेचें महत्त्व गायिलें आहे. श्रद्धेनें अनेकांचीं जीवनें उजळून निघालीं आहेत. कांहीची रामनामावर श्रद्धा, कांहींची अर्हत्‌वर, कांहींची बुद्धावर ! या भिन्नतेचा विचार केला तर थोडीशी गफलत आपल्या दृष्टीला येते.

श्रद्धा म्हणजे काय ? श्रद्धा म्हणजे एकनिष्ठ विचार. विचार ही आत्म्याची देणगी आहे. अचेतन किंवा जड पदार्थ कधीं श्रद्धा ठेवूं शकतात का ? श्रद्धा ठेवणारा प्राणी सचेतन असतो याचा अर्थ असा कीं, तो आत्म्याचा अभिन्न गुण आहे. श्रद्धा म्हणजेच आत्मा. श्रद्धा सचेतन आहे.

जेव्हां श्रद्धेचें अवलंबन जड वस्तु असते, तेव्हां ती अमंगल परतंत्र, बद्ध आणि दुःख देणारी बनते. याच श्रद्धेचें मंगलरूप तेव्हां दृष्टीस पडतें, जेव्हां ती आत्मजित् अधिराज्यासनावर आरूढ होते; परतत्त्वाला म्हणजेच आत्मतत्त्वाला जेव्हां ती व्यापून राहते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अशा जीवनव्यापी श्रद्धेंतून आत्म-सूर्याचें दर्शन सहज-सुलभ घडतें. साक्षात्कार होतो. श्री अरविंदांनीं ज्याला (सुपर मॅन) परम श्रेष्ठ मानव म्हटलेलें आहे तो तरी काय याहून भिन्न आहे ?

हीच गोष्ट ज्ञानाची आहे. ज्ञान ही देखील चित्शक्ति आहे. मेल्याबरोबर ज्ञानहि मरतें हें तत्त्व केवळ शरिरासारख्या अचेतन – जड पदार्थालाच लावतां येईल. ज्ञान मरत नाहीं. ज्ञान हा आत्म्याचा अविनाशी, अव्यवच्छेदक गुण आहे. जेथें ज्ञान तेथें आत्मा, जेथें शुद्ध ज्ञान तेथें शुद्ध आत्मा. जेथें परमोच्च ज्ञान तेथें परमोच्च आत्मा असें हें गणित आहे.

आपल्या श्रद्धेप्रमाणें, ज्ञानाप्रमाणें जी वर्तणूक घडते तें आचरण होय. हें आचरणहि आत्मिक स्वभाव आहे. जेव्हां माणूस दारू पिऊन वागतो तेंहि वागणंच असतं. ती वागणूक प्रमत्त असते, उन्मत्त असते; कारण ती कर्मबद्ध आहे. कर्मबद्धमुक्त जें आचरण तेंच मंगल चारित्र्य. तेंच अविनाशी चारित्र्य ! कारण तिथं विकृति नाहीं, सम्मोह, संभ्रम, विभ्रम नाहीं.

श्रद्धा, ज्ञान आणि चारित्र्य असा त्रिविध कल्पिलेला आत्मा खऱ्या अर्थानें एकविधच आहे. गुणसापेक्षतेनें किंवा विवेचनसापेक्षतेनें असें द्वैत रूप वर्णन केलें जातें.

पण मूलतः असा भेद नाहीं. अभेददृष्टि नेहमींच पारमार्थिक असते. तिथें शब्दच्छलांना वाव नसतो. स्फटिक जसें स्वगुणानें निर्मळ तसाच कर्म-बन्धरहित आत्मा ! हातांत दण्डुका असलेल्याला संस्कृतमध्यें दण्डी म्हणतात. पण दण्डुका टाकून दिल्याबरोबर त्याची 'दण्डी' संज्ञा नष्ट पावते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शरीर धारण केलें आहे म्हणून व्यवहारानें वैविध्य, वैचित्र्य व अनेकरूपता पाहावयास मिळते. पण हें कर्म-शरीर टाकून दिल्याबरोबर तो मूळचा स्वयंप्रकाशी, सर्ववित् - सर्वजित् असा शुध्द आत्माच दिसून येतो.

* * *

–१७–१८–

एखादा माणूस ज्यावेळीं राजाची कृपा संपादन करण्याचा प्रयत्न करतो; त्या वेळीं 'हाच राजा आहे, याचीच मर्जी संपादन करावयाची' असा निश्चय तो मनाशीं करतो. व नंतर त्याच्या सेवेंत राहून त्याची सर्व प्रकारें सेवा करतो. त्याचं मन कशानें संतुष्ट होईल, या गोष्टीचं ज्ञान तो करून घेतो व त्याप्रमाणें वागतो. हेतु हा असतो, कीं कांही तरी मनीषा पूर्ण व्हावी; कांहीं अर्थलाभ व्हावा.

प्रत्यहीं आपल्या जीवनांत देखील आपण श्रद्धापूर्वक वागतो वरिष्ठ अधिकाऱ्यांची मर्जी संपादून बढती मिळविणारेहि हेंच करीत असतात. लौकिक फायद्यासाठीं ज्ञान, चारित्र्य आणि श्रद्धा यांची आवश्यकता असते. लौकिक कार्यसिद्धि त्याशिवाय होत नाहीं.

शिष्यदेखील गुरूच्या विद्वत्तेबद्दल श्रद्धा धारण करतो. त्यांच्या कृपेसाठीं त्यांना खुष ठेवतो. अनुग्रह-प्राप्ति हाच त्यामागे हेतु असतो.

हेंच उदाहरण आत्मसम्राटाच्या बाबतींत लागू केलें आहे. आत्म-स्वरूपाचें सत्य व अंतिम तत्त्व जाणून घेऊन त्यावर भक्त

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अविचल अशी श्रद्धा ठेवतो; आणि त्या सम्राटाचं दर्शन व्हावं म्हणून अहर्निश त्याच्या गुणांचं ध्यान करतो, त्याशिवाय दुसरं कांही एक त्याच्या मनांत येत नाहीं. इतकी त्याची चित्तवृत्ति तल्लीन होते. जें प्राप्त करावयाचें आहे, त्याशीं तो एकरूप होतो, हें तादात्म्य म्हणजेच कर्ममुक्ति ! यालाच मोक्ष, निर्वाण किंवा वैकुंठ अशीं नांवें आहेत. ही भिन्नता नामांतच आहे, स्वरूपांत नाहीं. जिथें अशी भिन्नता आढळते, तिथें मुळांतच आत्मसूर्याच्या स्वरूपाच्या बाबतींतहि गोंधळ, विभ्रम किंवा शंका दिसून येते

* * *

– १९ –

'मी स्त्री, मी पुरुष, मी राजा, मी नोकर, मी सुखी, मी दुःखी' अशी विचारसरणी मुळांतच कुठें तरी चुकीची वाटते. समजुतींत कुठेंतरी गफलत झालेली दिसते. शरिरासंबंधीं हें म्हटलेलें कांहीसें बरोबर वाटेल. बाह्य, जड पदार्थांचा पगडा आत्मतत्त्वावर इतका तीव्र बसलेला आढळतो, पण हा पगडा म्हणजे चिरकाल टिकणारी वस्तु नाहीं.

मादक पदार्थांचा अम्मल कांही काळ चालतो. त्या काळांत माणूस वेड्यासारखा वागतो. स्वत.ला तो विसरतो. शुद्धीवर आल्यावर आपण असें वागलों असूं यावर त्याचा स्वतःचाहि विश्वास बसत नाहीं. हीच गोष्ट कर्मबद्ध मानवाची. त्याची व त्याच्या आत्मदेवाची कधीं गांठच जणुं पडलेली नसते.

कांही पदार्थांवर त्याची रुचि असते, कांही पदार्थ तो मोहानें संग्रहित करून ठेवतो, कांही विषासारखे पदार्थ पाहून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तो घाबरतो, किळसवाणे पदार्थ पाहून त्याला त्यांची किळस येते. हास्य हें त्यास मधुर पेय असतें, तर रडणें हें त्यास बेसुर वाजणाऱ्या वाद्यासारखें वाटतें.

अशा शेंकडों मनोविकारांत, चित्तविकृतींत, चित्तसंभ्रमांत तो अडकलेला असतो. शरीर हें त्याचं सर्वांत आवडतं घरटं. या नाश पावणाऱ्या घरट्यासाठीं त्याचे अफाट उद्योग चाललेले असतात. या उद्योगापायीं प्राप्त झालेलं मंगल, पवित्र जीवनहि विस्मृत होतं. स्वतःच्याच जाळ्यात गुरफटून जाणाऱ्या सुरवंटा-सारखा तो वागत असतो. कधीं हवं असलेलं मिळालं नाहीं म्हणून किंवा नको असलेलं नेमकं वाट्याला आलं म्हणून तो चरफडतो, क्रोधिष्ठ होतो. सर्वांपेक्षां जास्त मिळालं म्हणून गर्विष्ठ होतो; आहे त्याहून जास्त मिळावं म्हणून तो कपटानें वागतो, लोभाविष्ट होऊन धनपिशाच्च बनतो.

ही अप्रतिबुद्ध अवस्था होय. हेंच अज्ञान होय. * * *

—२०-२१-२२—

'मीं हें अज्ञान झुगारून टाकलं आहे, हा सम्मोह सोडून दिला आहे' असं वाटणारांच्या हृदयांतहि ही अवस्था अणुरूपानें दडी मारून बसते.

वर्तमानकालीन अवस्थेंत ज्या भौतिक वस्तूंशीं आपला संबंध आला असेल, त्या संबंधामुळेंच त्या भौतिक वस्तूशीं तो एकरूप होतो.

दुसऱ्याची असलेली शेती जेव्हां आपण विकत घेतों त्यावेळीं त्या शेतीसंबंधीं ममत्व निर्माण होतें. त्यावेळीं आपण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हें विसरून जातों कीं, ती शेती इथें हजारों वर्षांपासून आहे तशी आहे. तिला माझी माझी म्हणणारे कितीतरी निघून गेले. जातांना केवळ ममत्वामुळं संभ्रान्त झालेलं चित्त त्यांच्याबरोबर गेल.

विकून टाकणाऱ्याच्या मनांत शेती विकून टाकल्यावरहि कधीं कधीं असं येत कीं, 'ही माझी शेती आहे.' यांत शेतीचं प्रत्यक्ष कांहीच फळ त्याच्या पदरीं पडत नसतांना केवळ सम्मोह आणि वासना यांमुळें तो विकारबद्ध होतो. हीच गोष्ट आसक्त-चित्त होऊन भविष्यकाळीं प्राप्त होणाऱ्या भौतिक सुखसामुग्रींचा 'ही माझी होणार आहे.' या भावनेनें विचार करणाराची. तोहि या वासनेमुळें मूर्ख ठरतो.

अनासक्त चित्तानें घडणारा संयोग हा हानिकारक असत नाहीं. कारण जें अनिष्ट आहे त्याचें त्यास पुरेपूर ज्ञान आहे. जें इष्ट आहे तें प्राप्त करून घेण्यासाठीं पूर्णपणें सावधान असें त्याचें निर्मळ मन आहे.

वादळांत स्थिर राहणाऱ्या डोंगराप्रमाणेंच तो विकारांतहि स्थिर असतो. भौतिक सुखदु:खांचीं फळें चाखतांना तो अना-सक्त असतो. 'आलिया भोगासी असावें सादर' याचाहि अर्थ याहून काय वेगळा आहे ? भोगांत सादर असणें वेगळें व त्यांत तल्लीन होऊन आसक्तचित्त होणें वेगळें.

ममत्वाच्या, अहंकाराच्या दुष्ट-वर्तुळांत चित्तवृत्ति केव्हां, कधीं गुंतेल हें सांगणें कठीण आहे. ज्या जागीं बसून तप केलेलं असतं ती जागा नसली तर मन लागत नाहीं. चित्त एकाग्र होत नाहीं. हीच गुलामी. हेच त्या ममत्वाचें रेशमी पाश ! * * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २३-२४-२५ –

याच रेशमी पाशांची उपपत्ति लावायची तर असें म्हणतां येईल कीं आत्म-स्वरूपाचं नीट आकलन न झाल्यामुळं जें स्वतःचं नाहीं, जें स्वतःचं कधींच होणार नाहीं, होणं शक्य पण नाहीं, त्या वस्तूंना माझं म्हणणं हें अज्ञानांतून किंवा अपूर्ण ज्ञानांतून निर्माण झालेलं आहे.

एखाद्या भांड्यांत आपण तूप ठेवत आलों, तेव्हां त्या भांड्यालाच आपण तुपाचं भांडं म्हणूं लागलों. खऱ्या अर्थानें तूप ठेवण्याचें भांडें हा अस्सल अर्थ ! तो लोपून जातो. कर्मबद्ध अवस्थेमुळें सतत या नाहीं त्या शरिरांत आत्म्याला राहावं लागलं, त्यामुळं शरीर, आणि शरिरामुळें धन-धान्य, स्त्री-पुत्र, भोगोपभोग, वासनापूर्ति आणि पर्यायानें 'संसार' आपल्यामागें लागला. पण खऱ्या अर्थानें आपण संसाराच्या मागें लागलों आहोंत. जड संसार चेतनेच्यामागें कसा लागेल ? आपणच स्वतःला मोहजालांत अडकवून घ्यावयाचें व मग त्याचें खापर मोह-जालावर फोडावयाचें, असा हा वेडगळ प्रकार आहे.

शरिराला आत्मा व आत्म्यालाच शरीर असें एकत्व निर्माण झाल्यामुळेंच हा ब्रह्मघोटाळा झाला आहे. देह हा त्याज्य आहे, नव्हे तो इच्छा नसली तरी सोडणें क्रमप्राप्त आहे अशी वस्तुस्थिति आहे. असें असतां देहाचे देव्हारे माजविणें इष्ट नव्हे अभीष्ट तर खासच नव्हे.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २६-२७-२८-२९-३० –

मग परमेश्वराच्या देहाचें, रूपाचें जें वर्णन साधुसंतांनीं केलेलें आहे तें खोटें आहे का ?

कैवल्य प्राप्त झाल्यावर शरिराच्या सहाय्यानेंच भगवान् महावीरानें अहिंसा-धर्माचा उपदेश केला. भगवान् बुद्धानें तेंच केलें. देहाचें अस्तित्व नसतें तर हें महत्कार्य झालेंच नसतें. म्हणून 'देह म्हणजेच आत्मा असें समीकरण मांडलें तर बिघडलें कोठें ?' असा प्रश्न मनांत उद्भवणें अगदीं साहजिक आहे. स-शरीरी मानवानें केलेल्या सद्धर्म-स्थापनेचें महान् कार्य आपल्या सर्वांच्या डोळ्यांपुढें आहे. जी कांही नैतिक पातळी आज दिसून येते ती टिकून राहायला साधु-संतांचें दृश्यमान असें सदाचरण हेंच कारण होय.

आदर्श राजा कसा असावा, आदर्श पुरुष कसा असावा हें वाल्मिक ऋषींनी रामचरित्र लिहूनच सांगितलें ना ? आदर्श जीवन कसें असतें हें भगवान् आदिनाथानें स्वतःच्या उदाहरणानेंच दाखवून दिलें ना ? यामुळंच देहाचें अलौकिक कार्य विसरतां येत नाहीं असें म्हणणें अंशतः खरें वाटतें.

पण यांतहि विसंगति असलेली आपणांस दिसून येईल. जेव्हां एखादें काम एखादा नौकर करीत असता तेव्हां तें मालकाच्या आज्ञेनेंच होय. मालकाच्या इच्छेची पूर्ति करणें हेंच नौकराचें काम असतें. केलेल्या चांगल्या-वाईटाची संपूर्ण जबाबदारी मालकाची असते. तसेंच शरिराचें व आत्म्याचें आहे जेव्हां आपण प्रभूच्या रूपाचें वर्णन करतों, त्याच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भौतिक शरिराची स्तुति करनों त्यावेळीं आपला हेतु प्रभूच्या आंतरिक गुणांची स्तुति करावी असाच असतो. मातेची थोरवी गातांना रूपानें तिच्याहून सुंदर स्त्रिया नसतात असें नाहीं. पण मातेची स्तुति ही तिच्या मातृत्वाची स्तुति असते, रूपाची नसते. होच गोष्ट आपण प्रभु-गुण गातांना करीत असतों. भक्ताला प्रभूची दगडी मूर्ति – वेडीवाकडी असली तरी ती सुंदर दिसत असते, तिच्या सौंदर्य-वर्णनासाठीं हजारों श्लोक, हजारों अभंग तो रचीत असतो.

त्यांतहि एकच आंतरिक सूत्र असतें तें म्हणजे आत्म्याची पारमार्थिक अवस्था. परतत्त्वस्पर्श, किंवा परतत्त्वस्पर्शाचा ओझरता अनुभवहि त्याला पुरेसा असतो.

वरवर ती देहाची स्तुति – प्रशंसा वाटत असली तरी अंतस्थपणें ती आत्मदेवाची स्तुति असते. दुधाची प्रशंसा ही त्याच्या पांढरेपणामुळें किंवा द्रवतेमुळें माणूस करीत नाहीं. त्यांतील दुग्धत्वाची ती स्तुति असते.

व्यवहार म्हणून देह आणि आत्मा यांचें ऐक्य मान्य केलें तरी अंतिम सत्याच्या अपेक्षेनें तें खरें नसतें. कारण देहाचे गुण वेगळे, आत्म्याचे गुण वेगळे. घोड्याच्या रंगावरून त्याच्या वेगवानतेची कल्पना करणें जितकें हास्यास्पद तितकेंच शरिरावरून आत्म्याच्या गुणांसंबंधीं तर्क करणें हास्यास्पद होय.

याचेंच अधिक विवेचन करायचें झालें तर असें म्हणतां येईल कीं घराचें कितीहि वर्णन केलें तरी त्यांत राहणाऱ्यांचें तें वर्णन होत नाहीं. झोपडी अगदींच तुटकी आणि चंद्रमौळी असली तरी त्यांत तेजस्वी तपस्वी रहात नसावा, किंवा त्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ठिकाणीं अगदीं हीन माणूस रहात असावा असा तर्क नेहमींच खरा ठरत नाहीं.

या उलट वैभवशाली राजवाडयांत दुष्ट राजे निवास करीत असल्याचें, अथवा सुंदर स्त्री आचारहीन असल्याचीं शेंकडों उदाहरणें इतिहासांत नाहीं का पहावयास मिळत ?

याचा मथितार्थ हाच नाहीं कां कीं अंतरंग हें बहिरंगापेक्षां वेगळें; देह हा आत्म्याहून वेगळा; दोहोंचें अधिष्ठानच वेगळें. दोहोंचीं लक्षणेंच विरोधाविरोधी.

अशी देहाची स्तुति, मग तो देह अर्हंताचा असला किंवा बुद्धाचा असला किंवा राम-कृष्णाचा असला तरी, ती स्तुति आत्म्याची होत नाहीं.

* * *

- ३१ -

मानवांतील विजिगीषु प्रवृत्ति पाहिली तर तिचीं दोन रूपें दृष्टीस पडतात. सिकंदरसारखा पराक्रमी राजा आपल्या भौतिक सामर्थ्यानें जगास जिंकून लोकजित् होईल. पण हें भौतिक सामर्थ्य वासना जिंकायला अपुरें आहे. भौतिक दुःखें जिंकायलाहि तें अपुरें आहे. मनांत उठणाऱ्या क्रोधादि विकारांच्या सूक्ष्म लाटा स्थिर करण्याचें सामर्थ्य त्यांत नसतें. हें त्या प्रवृत्तीचें रौद्र रूप होय.

दुसरें रूप सात्त्विक आहे. त्यांत जिंकण्याचा अभिनिवेश नाहीं. मनांतील भावनांचा प्रक्षोभ नाहीं. ओढाळ गुराप्रमाणें बेछूट होऊन बेलगाम झालेल्या वासनांशीं झुंज घ्यायला हेंच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दुसरें रूप उपयोगीं पडतें. यांत जित आपण व जेतेहि आपणच असतों. ही लढाई कसल्याहि बाह्य साधनांशिवाय लढली जाते.

आपलीं इंद्रियें, आपलें शरीर म्हणजे आपले नौकर. त्यांच्या इच्छेप्रमाणें आत्मा जेव्हां वागतो तेव्हां तो पराधीन होतो. त्याचें मूळ तेंच झांकाळून जातें. ग्रहण लागलेल्या सूर्यासारखा तो असतो. पण इंद्रियजित् त्या इंद्रियांना आपल्या योग-साधनेसाठीं राबवितो.

आपली साधारणपणें अशी कल्पना आहे कीं, इंद्रियांच्या उपभोगानें त्यांचें सामर्थ्य वाढतें. पण ती चुकीची आहे. इंद्रियांच्या उपभोगानें इंद्रियें व आत्मा हीं दोन्ही कमकुवत होतात. या उलट स्थिति आहे निग्रहाची. इंद्रियांच्या निग्रहानें आत्म्याची शक्ति वाढीस लागते व इंद्रियेंहि अधिक सामर्थ्यवान् होतात.

वाचाळतेमुळें वाणीचें सामर्थ्य नष्ट होतें तर मौनानें तें वाढतें. ऋषी-मुनींच्या शब्दागणिक सामर्थ्य उद्भवतें तें मौनामुळेंच. म्हणूनच इंद्रियजित् हाच आत्मजित् व आत्मजित् हाच खरा इंद्रियजित् असतो.

* * *

– ३२ –

ज्यावेळीं भौतिकतेविषयीं आपण विचार करतों त्यावेळीं बाह्य पदार्थांची आपण निंदा करतों. पण हे बाह्य पदार्थ अचेतन आहेत. कुणाचं भलं-बुरं करण्याचे विचार त्यांच्या ठिकाणीं उद्भवूं शकत नाहींत. विष घातक आहे यांत विषाची चूक नाहीं. एखादी स्त्री फार सुंदर आहे, यांत सौंदर्याची काय चूक ?

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चूक आहे ती त्या सौंदर्यविषयाच्या प्राप्तीच्या लालसेंत. भोगाविषयीं निर्माण झालेल्या अनिवार, अतृप्त अशा आसक्तींत. या आसक्तीनें आत्म्याचें पतन होतें. आसक्तीची तीव्रता जसजशी वाढेल तसतसें पतनहि तीव्र होईल. भौतिक पदार्थ उदासीन आहेत. पण कर्मबद्ध आत्मा ते माझ्या मालकीचे आहेत या संभ्रमांत अडकलेला आहे. फार काळ पिंजऱ्यांत राहिलेला पोपट पिंजऱ्यांतील विश्व सोडून जायला तयार होत नाहीं; विमुक्त अवस्थेचा आनंद लुटायची तीव्र इच्छा असूनहि मानसिक दौर्बल्यामुळं तो तें करूं शकत नाहीं. शेंकडों पोपट प्रत्यहीं स्वतंत्रपणें विहार करतांना पाहूनहि केवळ आसक्त-चेतनेमुळें तो हें धाडस करूं शकत नाहीं.

ही आसक्ति, वासना, माया, प्रकृति किंवा मोह आत्म्याला वेढून आहे. लांकूड फोडणारा भुंगा कमल-दलांना भेदूं शकत नाहीं; तशीच स्थिति या मोहजालाची असते. तें भेदून बाहेर येणाराचा मोह जित होतो.

हें मोहजितत्व, हें इंद्रियजितत्वच स्तुति करण्यास योग्य आहे. याच गुणांच्या आधारें आपणहि इंद्रियजित् किंवा मोहजित् होऊं. परमेश्वराच्या दिव्य देहाची स्तुति करून तसलें दिव्यत्व आपणांस प्राप्त होणार नाहीं. गुण हेच पूजेचे स्थायीभाव असले पाहिजेत. जें मडकें पाणी धारण करण्यास अक्षम आहे तें मडके कितीहि नक्षीदार असलें, सुवर्णाचें जरी असलें तरी तें पाणी धारण करण्याचें दृष्टीनें उपयोगी नाहीं.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मोहसम्राटाचें राज्य फार सूक्ष्म असतें. त्यागाच्या स्वरूपांतहि तो प्रकट होतो. अव्यक्त साधूच्या स्वरूपांतहि तो असतो. परहित, परोपकार करणाऱ्यांच्या मनांतहि तो स्वार्थ घेऊन अवतरतो. आत्मजितांचा पराभव करण्याची कोणतीच संधि हा मोहसम्राट् सोडत नाहीं.

पोट भरल्यानंतर उपवासाची चर्चा मोकळेपणानें करतां येते. इंद्रियतृप्तीनंतर इंद्रियनिग्रहाच्या चर्चेला रंग भरत असतो. याचा अर्थ असा कीं, भोगांत आणि विरक्तींत देखील आधिपत्य अंशतः टिकवून ठेवलें तरी त्याचें काम भागतें. मोहाच्या अति सूक्ष्म बंधनांतहि जगव्यापी अशी शक्ति असते. एकाच व्यक्तीचा काय पण कोटयवधि लोकांचा क्षणांत धुव्वा उडवून लावील इतकें सामर्थ्यं मोहांत आहे. असा हा सम्राट् कधीं काळीं नष्ट झालेला वाटला आणि आपण मोहमुक्त झालों असें वाटलें, तरी मोहाचा संपूर्ण नाश झाल्याशिवाय आत्म-सूर्याचें स्पष्ट दर्शन होत नाहीं. म्हणून केवळ उपशम, उद्रेक-शांति झाला मोहविजय म्हणतां येत नाहीं.

आत्मप्रभेचा अरुणोदय होऊन भागणार नाहीं तर प्रत्यक्ष जगप्रकाशी सूर्यनारायणाचें दर्शन होणें अत्यावश्यक असतें. मोहजित् अशा आत्म्याचा विचार, त्याचें ध्यान आणि त्याचाच अभ्यास हें सारें घडवून आणील.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनुभव आणि प्रतीति यांच्या साह्यानें आत्म-देवाच्या साम्राज्यांत प्रवेश करणाऱ्यांनीं मोहजित् – संपूर्णतः मोहजित् होणें आवश्यक आहे तोच साधु, तोच अर्हंत्, तोच बुद्ध कीं जो मोहजित् आहे !

* * *

– ३४-३५ –

मोहजित् होणं फार कठीण अशी कल्पना साहजिकच होते. मोहाचें सामर्थ्य मोठें असें जेव्हां आपण म्हणतों त्यावेळीं तें सामर्थ्य आत्म्याचें असतें. तें सामर्थ्य रौद्र असतें. विकासोन्मुख नसतें.

जसें विजेच्या संचलनामुळें जगड्व्याळ यंत्रें हलत असतात. पण तें यांत्रिक सामर्थ्य खऱ्या अर्थानें विजेचें असत। आपण मात्र तें यंत्राचें समजतों; कारण यंत्रें दृश्यमान् आहेत, वीज दृश्यमान् नाहीं. तशीच आत्मशक्तिहि दृश्यमान् नाहीं.

म्हणूनच अचेतन पदार्थांशीं स्थापन केलेला संबंध तोडून टाकणें हाच मोहनाश. जें राष्ट्र शेजारीं असूनहि नीट वागत नाहीं त्याशीं संबंध विच्छेद करण्यांत येतो. तसेंच इतर सर्व पदार्थ म्हणजे मी नव्हे. माझा 'आत्मा म्हणजे या सर्वांहून वेगळा. हे भौतिक पदार्थ जड आहेत. माझ्याच आसक्तीमुळं मी त्यांत गुंतलों आहे.' हाच विचार विकासोन्मुख आहे.

आसक्तीचे तंतू जळून गेले म्हणजे त्यांतील बांधण्याचें सामर्थ्य कमी होतें. तीच गोष्ट मोहपाशाची आहे, आसक्तीची आहे. वासना म्हणजेच बंधन. पंख असूनहि उडतां येत नाहीं असें बंधन !

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हें बंधन काल्पनिक आहे. जसें चुकून शेजाऱ्याची वस्तु केवळ सादृश्यामुळें आपणाकडे आली, पण नंतर कांही काळानें या वस्तूची मालकी आपली नाहीं, असें आढळून आलें तर आपण ती वस्तु जशी शेजाऱ्याला परत करतों; तसेंच एकदां हें कळालें कीं संयोगामुळेंच हें इष्ट, हें अनिष्ट, हें सुखकर, हें दुःखकर असें वाटत आहे, तर संयोगाचें, आसक्तीचें, वासनांचें तें मूळच नष्ट केलें पाहिजे. संयोग किंवा संबध हा अविचारानें किंवा अज्ञानानें घडला तरी त्याचें फळ भोगावें लागतें.

चुकून औषध म्हणून विष पोटांत गेलें, तर तें विष आ लें काम पूर्ण केल्याशिवाय राहणार नाहीं. तिथें सुटका नाहीं.

दोर म्हणून साप हातांत धरला तर तो कडकडून चावा घेणारच. आपलाच समज चुकीचा झाला, सापाचा नाहीं. याच अज्ञानामुळें पदोपदीं दुःख-परंपरा अनुभवास येते.

ही अज्ञानावस्था, सम्मोहावस्था दूर करायची म्हणजे जें सत्य आहे, जें चिरंतन आहे, जें अविनाशी आहे, जें श्रेय असून हितप्रद आहे; तिकडे लक्ष दिलें पाहिजे.

पारतंत्र्याच्या काळांत स्वतःच्या सर्व गोष्टी क्षुद्र वाटतात. आपल्या धर्माची, साधु-संतांची, ग्रंथांची लाज वाटते. त्यांची आपण टिंगल करतों, चेष्टा करतों. स्वातंत्र्याचा उदय होतांच जें हीन वाटत होतें, तें अप्रतिम वाटूं लागतें. परकीय भाषा, विचार आचार हे त्याज्य वाटूं लागतात.

—३

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हीच नेमकी स्थिति शुद्ध आत्मदर्शनामुळें होते चेतन आणि अचेतन विश्वाचें रहस्यच त्याला कळून चुकतें. विनाशी काय, अविनाशी काय हें त्याला अवगत होतें.

हीच ज्ञान-पुरुषाची सम्यक् अवस्था आहे. * * *

– ३६–३७ –

या अवस्थेचा प्रत्यय कसा येतो, याचा व्यावहारिक दाखला श्रीखंडाच्या उदाहरणानें घेऊं. श्रीखंड खात असतांना दह्याची अम्लता व साखरेची गोडी यांचा प्रत्यय एकसमयावच्छेदेकरून येतो.

जो आत्मज्ञानी असतो तोहि संसार-सुखाचा प्रत्यय घेत असतांना, हीं मींच निर्माण केलेल्या वासनेचीं फळें आहेत, असें जाणतो. त्या उपभोगांत तो रमलेला दिसत असला तरी तसा तो असत नाहीं. नाटकांत एखादा नट स्त्रीची भूमिका वठवितांना हें जाणतोच, कीं तो स्त्री नाहीं; असें असतांना पाहणाऱ्याला मात्र त्याची भूमिका तद्रूप वाटते.

समुद्रांतील असंख्य लाटा म्हणजे समुद्र नव्हे; तसेंच क्रोधादि विकारांच्या तावडींत सापडलेला आत्मा म्हणजे विकार नव्हे. त्याहून तो वेगळा आहे. त्याची भूमिका केवळ विशुद्ध ज्ञान्याची आहे तेथें आंत-बाहेर असे भेद नाहीत.

अविच्छिन्न असा तो ज्ञानी केवळ ज्ञानरसांत तल्लीन असतो. ज्ञानावेगळें त्याचें अस्तित्व नाहीं. समुद्रांत मासे असतात, रत्नें असतात म्हणून त्याला समुद्र म्हटलेलं नसतं; तें त्याचं व्यवच्छेदक लक्षण नव्हे. तसेंच आत्म्याचें असतें. शुद्ध ज्ञान हेंच त्याचें स्वरूप.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हें जाणणारा तो ज्ञायक किंवा आत्मज्ञानी ! बाकीचें सर्व ज्ञान आहे. पण ज्यास नेमके ज्ञानच नाहीं तो 'ज्ञायक' होऊं शकत नाहीं.

* * *

– ३८ –

'मी शुद्ध आहें, बुद्ध आहें. मी म्हणजेच परमात्मा. माझें आंतरिक स्वरूप म्हणजेच अंतिम, चिरकाल टिकणारें शुद्ध, अविनाशी असें ज्ञान.' असा विचार जेव्हां एखादा योगी आपल्या मनांत आणतो. तेव्हां ज्याला आपण व्यवहारांत 'मी' म्हणतो, तो हा 'मी' नव्हे. हा 'मी' म्हणजे जागृत झालेला, आत्मज्ञानानें केवळ ज्ञानस्वरूप बनलेला, क्रोधित न होणारा, अहंकारी न होणारा, वासनेच्या पाशांत न सांपडणारा असा जो परमशुद्ध आत्मा तो म्हणजे हा 'मी' होय

तो कांही लोकांनीं सांगितल्याप्रमाणें केवळ अंश नाहीं; तो पूर्ण आहे. तो स्वतःच परमेश्वर आहे. गीतेंत वर्णिल्याप्रमाणें 'उद्धरेत् आत्मनाऽऽत्मानं' यांतील आत्मा म्हणजे 'मी' आहे. स्वतःच्या योगें स्वतःचा उद्धार करून घेणारा, केलेल्या कर्मफलांचा अनासक्त भोग घेऊन त्यांतून स्वतःची सुटका करून घेणारा आत्मा 'मी' आहे.

तो एकटा आहे, एकाकी आहे. त्याला कशाचेंहि अवलंबन नाहीं, तो कशानेंहि बद्ध नाहीं, लिप्त नाहीं. सूर्याप्रमाणें त्याचा मार्ग तो एकाकीच आक्रमीत असतो. गुणांचा प्रकर्ष असल्यामुळें तो शुद्ध बनला आहे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्याला कसलेंहि रूप नाहीं, कारण तो जड नाहीं. ज्ञान हें त्याचें कवच व तेंच त्याचें स्वरूप. इंद्रियांच्या सहाय्यानें होणारें ज्ञान हें त्याचें खरें स्वरूप नव्हे. इंद्रियांमुळें त्याच्या जाणण्याच्या क्रियेमध्यें विरोध, वैविध्य, वैचित्र्य, असंबद्धता आणि अप्रामाणिकता येते. पण इंद्रियांच्या अवलंबनाशिवाय जें ज्ञान त्याला झालें आहे, तें आतां सर्वगामी, सर्वदर्शी व सर्वस्पर्शी झालें आहे.

म्हणूनच अशा त्या परम योगाच्या अवस्थेंत तो म्हणूं शकतो कीं,–

"मी कुणाचा (बद्ध) नाहीं. माझें कोणी (बद्ध) नाहीं, मी एकटा आहें, स्वतंत्र आहें. सर्व जगाला व्यापून राहणारें परम पवित्र ज्ञान – शुद्ध ज्ञान – हें माझें, व मी त्याचा. इतर सारें परकें, भिन्न स्वरूपाचें आणि म्हणूनच स्वात्मोकर्ष विरोधी !

* * *

– ३९-४०-४१-४२-४३-४४ –

आत्म्याचें स्वरूप जाणण्याच्या बाबतींत होणारा गोंधळ पौद्गलिक – जड (अचेतन) पदार्थांचें खरें स्वरूप जाणण्याच्या बाबतींतहि होत आला आहे.

शरिराला आत्मा म्हणणारे लोकहि याच गोंधळलेल्या मनःस्थितींत आहेत. आपण प्रत्यहीं जे शुभाशुभ विचार करतों, आचरण करतों त्याचीं फळें भोगणें क्रमप्राप्त असतें.

मागें ज्या कर्मपटलाचा उल्लेख केला आहे तें पटल म्हणजे दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर आत्म्याला वेढून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असणारें कार्मिक शरीर होय. हें शरीर मृत्यूनंतरहि आत्म्याला सोडत नाहीं. तें इतकें सूक्ष्म असतें कीं तें अनुभव-चक्षूलाच गम्य होऊं शकतें. हें शरीर जितकें सूक्ष्म आहे, तितकेंच अधिक कार्यक्षम आहे. आत्मिक ज्ञान, दर्शन, चारित्र्य इत्यादि गुणांवरहि आपला अंमल चालविणारें, त्या गुणांचा किंचितहि उत्कर्ष न होऊं देणारें हें शरीर म्हणजे सर्व विघातक कृतान्तच होय.

हेंच कार्मिक शरीर नाना प्रकारच्या योनींतून वेगवेगळीं दृश्य शरीरें आत्म्याभोवतीं घालतें. गुलामाकडून आपण करवून घेणार नाहीं इतकीं हीन कामें तें करून घेतें. असलें हें कार्मिक शरीरच इष्ट तें मिळूं देत नाहीं, अनिष्ट तें देतें. भौतिक सुख-दुःखांचा प्रत्यहीं अनुभवहि याच कार्मिक शरिरामुळें येत असतो

जें शरीर दृश्यमान् आहे, डोळ्यानें दिसत आहे, तें आपलें शरीर हें दुसरें बंधन होय, हेंहि बंधन मृत्यू येईपर्यंत असतें.

या शरिरासाठीं माणूस अहोरात्र खपतो. नाहीं नाहीं तीं दुष्कृत्यें करतो. अर्थसंचयासाठीं सर्व जीवन घालवितो. अर्थ-प्राप्ति व सुखोपभोग यथेच्छ झाले तर जीवनाला धन्य मानतो. या दुसऱ्या बंधनामुळेंहि जीवन काळवंडून जातें.

तिसरें बंधन म्हणजे आपल्या भोवतीं पसरलेलें भौतिक विश्व. हें भौतिक विश्व दिसायला जड असलें तरी चेतना-शक्तीला उद्दीपित करणें, क्रोधादि विकार चेतन शक्तींत निर्माण करणें हीं कार्यें हें भौतिक विश्व करीत असतें, किंवा लोभाविष्ट होऊन चेतना स्वतःच त्यांच्याद्वारें उद्दीपित होते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चिच पाहिल्याबरोबर तोंडाला पाणी सुटतें; सुंदर, टवटवीत फुलांना पाहून चित्तवृत्ति बहरून येतात; नाटक पाहतांना शृंगार, वीर, शांत इत्यादि रसांनी मनोवृत्ति पुलकित होतात. याचें कारण हेंच कीं हें जड विश्व उदासीन नाहीं. चेतन-विश्वाला भुरळ पाडण्याइतकी शक्ति खासच जड विश्वांत आहे.

अशा रीतीनें जड विश्वाचा विचारहि शुद्ध रीतीनें केला पाहिजे. या जड विश्वाचा व आत्म्याच्या शुद्ध अवस्थेचा कांही एक संबंध नाहीं. आत्मा म्हणजे विकार नव्हे. आत्मा म्हणजे कार्मिक शरीर नव्हे. कर्मफळे भोगतांना जसा तो वागतो, तें वागणें मिथ्या असतें. मिठाच्या मिश्रणानें पाणी खारट लागत असलें तरी त्याचें अस्सल रूप खारट नसतें. अशा रीतीनें अचेतन विश्वाचा देखील शुद्ध रीतीनें विचार करणें अवश्य आहे.

* * *

– ४५ –

प्रमुख अशा आत्मिक आठ गुणांचें तेज न फाकूं देणारे कर्म-परमाणु आहेत. त्या आत्मिक गुणांच्या अपेक्षेनें कर्म-परमाणूंचेहि आठ प्रकारें विभाग केले आहेत.

या कर्म-परमाणूंचे थरचे थर आत्म-प्रदेशाशीं एकरूप होतात. त्यामुळेंच प्रखर अशी अविच्छिन्न श्रद्धा आत्म्याच्या ठिकाणीं निर्माण होत नाहीं. श्रद्धा निर्माण झाली तरी ती क्षणभंगुर असते, मोहाविष्ट असते; प्रलोभनांनीं ती तडकून जाते, अविचारानें ती गढूळ होते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्ञान-सूर्याचें तेजहि हेच कर्मपरमाणु फांकूं देत नाहींत. ज्यामुळं दैहिकतेंत, जडतेंत आपण गुंतून राहूं, केवळ भाकरीची समस्या सोडविण्यांतच तेजस्वी चेतना गुंतून राहील असें वातावरण निर्माण करणें हेंहि काम त्याच परमाणूंचें.

सुख-दुःखांच्या, इष्टानिष्टांच्या, आनंद-खेदाच्या प्रचंड लाटांत खऱ्या सौख्याचा ठेवा कुठें आहे याचा थांगपत्ता लागूं न देण्याचंहि काम त्यांचंच.

हे कर्मपरमाणु तुम्हांला मोहाविष्ट करून केवळ आशा-निराशेच्या, लाभ-अलाभाच्या, प्राप्ति-वियोगाच्या रेशमी पाशांनीं तुम्हांला असें चुकूनहि वाटूं देत नाहींत कीं या सर्व जड-विश्वाचे अधिपति तुम्ही आहांत. ज्या परम-मानव-पदासाठीं आपण झगडा मांडतों ता मोडून निघावा म्हणून हें विलोभनीय जड-विश्व म्हणजे विश्वामित्राचा तपोभंग व्हावा म्हणून पाठविलेली मेनकाच होय.

आत्मा अमर्त्य असतांना केवळ 'आयुष्य' वाढीसाठीं जडत्वाशीं सख्य करणारी वृत्ति निर्माण करून सावजाच्या प्राणांशीं खेळ खेळणाऱ्या मांजराप्रमाणें हे जड कर्मपरमाणु होत.

अशा रीतीनें हव्या असलेल्या निराकुल, आनंदमय, प्रसन्न चेतनावृत्तीचा आविष्कार न होऊं देण्यासाठीं, नित्यनूतन सुख-दुःखाचें त्रांगडें उभें करीत राहणें व त्यांतच मानवाला गुंतवून टाकणें हेंच कर्म फलांचें काम !

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

या वेगवेगळ्या कर्मफलांशीं चेतनावृत्ति तादात्म्य पावत राहते त्यामुळें तिच्यांत निर्माण होणाऱ्या विकारांचें कर्तेपण चेतनेकडेच येतें, जबाबदारी चेतनेकडेच येते. अशा दूषित चेतनेला आलेलें दूषितपणहि कांही वेळा आत्म्याचें स्वरूप म्हणून वर्णन केलें गेलें तरी तें व्यावहारिक म्हणूनच.

असलें व्यावहारिक वर्णन यासाठीं केलेलें असतें कीं दूषित चेतनेचें कर्तेपण आत्म्यानें सोडावें. प्रतिसमयाला कर्मांनीं बद्ध होण्यापेक्षां समयासमयाला विशुद्धता वाढावी हाच विचार यांत प्रामुख्यानें अंतर्भूत असतो

हिंसा करतांना हिंसक, लोभप्रवृत्त असतां लोभी, कोप करीत असतां कोपिष्ट म्हटलें नाहीं तर असा गैरसमज होण्याची शक्यता आहे कीं, हिंसेमुळें, क्रोधामुळें, लोभामुळें चेतनावृत्ति आहे तशीच रहाते, ती शुद्धच राहते. हा गैरसमज होऊं नये म्हणून कर्मबद्ध आत्म्याचें स्वरूप, हें चिरंतन स्वरूप नसलें तरी त्याचें प्रकटीकरण समजुतीसाठीं तशा रीतीनें करणें आवश्यकच आहे.

अन्यथा चोर देखील म्हणेल कीं चोरी करतांना माझ्या चेतनावृत्ति शुद्ध होत्या, त्यांत विकार नव्हता. म्हणून मी कर्मबद्ध नाहीं.

अशीं उदाहरणें शेंकडों आहेत कीं अध्यात्म-रहस्य न कळल्यामुळें, पापप्रवृत्त चेतनेलाहि शुद्ध म्हणत गेल्यामुळें, अनेक साधुसंत अधःपतित झाले. म्हणूनच मनांत सावधानता – अप्रमत्तता धारण करूनच ही अध्यात्म विद्या ग्रहण करावी लागते.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– ४७-४८ –

थोडेंसें जुनें उदाहरण घ्यायचें झालें तर तें स्वारीवर निघण्याचें घेऊं. स्वारीवर निघतांना राजा हजारों लोक घेऊन लढाईवर जात असे. तो निघाला म्हणजे आपण म्हणायचें, 'हा पहा अमुक राजा निघाला स्वारीला.'

खरं म्हणजे राजा एकच असतो. बरोबरीचं विपुल सैन्य. सहस्रावधि हत्ती, घोडे, रथ. उंट हेहि राजाबरोबर असतातच. पण या सर्व सैन्यसमुच्चयाला राजा या एका नांवानें संबोधलें जातें.

तसेंच आत्म्याचें आहे. विविध पदार्थांच्या संयोग–वियोगानें त्याच्या चेतनावृत्ति पालटत असतात. अर्थात् या चेतनावृत्ति त्याच्याच असतात. अशा असंख्य चेतनावृत्तींमुळें विविध स्वरूपांत दिसणारा मानवी आत्मा हा एकच असतो. वैविध्यांत, वैचित्र्यांत, तादात्म्य पावल्यामुळें त्या त्या अपेक्षेनें केलेलें वर्णन हें सापेक्ष आहे, हें ओळखणें आवश्यक आहे.

* * *

– ४९ –

ज्ञानाचा अनुभव येणं नि त्याची पोपटपंची करणं यांत किती महदंतर आहे वस्तुस्वरूपाचं ज्ञान न होतां, तें झाल्याचं सोंग करून सतत वटवट लावणं म्हणजे ज्ञानाचा आविष्कार करणं नव्हे रे वेडया ! तुला आत्म्याचं ज्ञान झालं नाहीं. ज्ञानाचा केवळ आभास झाला आहे. त्यावरून एखाद्या आत्मज्ञान्याप्रमाणें तूं आत्मतत्त्वाची वटवट चालू केली आहेस. तुला आत्म्याचं स्वरूप विशद करून सांगायला हवें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हा आत्मा रसरहित आहे, तो गंधरहित आणि रूपरहित आहे, अव्यक्त नि लिंगरहित आहे; आणि संस्थान – आकाररहित आहे.

आत्मा हा पुद्गल द्रव्यांपासून वेगळा आहे. तो स्पर्श, रस, गंध आणि वर्ण या पुद्गलाच्या गुणांपासून वेगळा आहे. तो रसनेंद्रियातीत असल्यानें रसरहित आहे. पण रसांचा जो अनुभव येत आहे, तोहि आत्म्याचा नाहीं. कारण, आत्म्याचा अनुभव सामान्यपणें एक आहे. सर्व विषयांमध्यें विशेष रीतीनें तो जाणवत असला तरी अनुभव एकच आहे. त्या अर्थी रसाचा अनुभव हा विशेष झाला. हा अनुभव आत्म्याचा नाहीं. सारें ज्ञेय आत्मज्ञानांत झळकत असलें तरी ज्ञान व ज्ञेय एकरूप होऊं शकत नाहीं. ज्ञानांत प्रतिबिंबित होत असलें, रसपरिणमन होत असलें, तरी आत्मा रसरूप नाहीं.

* * *

– ५० –

तूं ज्या शरिरांत राहतोस त्याची तुला संपूर्ण माहित्ती आहे काय ? तूं ज्या घरांत राहतोस, त्या घराचा मालक म्हणून तूं सर्वांना सांगतोस; पण त्या घराची तुला पूर्ण माहिती आहे काय ? तें कसं उत्पन्न झालं हें तूं जाणतोस ?

कर्मांनीं, तुझ्या शुभाशुभ परिणामांनीं आत्म्याच्या प्रदेशाचें परिस्पंदन होतें. त्याचा परिणाम म्हणून कर्म-वर्गणांचे अनेक समूह आत्मप्रदेशावर येऊन चिकटतात. यालाच पारिभाषिक शब्दांत बंध असें म्हणतात. या अष्टकर्मांपैकींच एक नामकर्म तुझं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शरीर बनवितें ! यावरून तुझ्या ध्यानांत एक गोष्ट आलीच असेल कीं तुझ्या देहनिर्मितीच्या कार्यांत नामकर्म पूर्णत: सहभागी आहे.

या कर्मांचं कार्य तूं जर पहाशील तर तूं सध्या पहात असलेल्या वैज्ञानिक कार्यापेक्षां त्यानें अधिक आश्चर्यचकित होशील. हें कार्य कोण करतं असं विचारशील तर त्याला नैसर्गिक रीत्या प्रत्येकजण जबाबदार आहे. आकाशांत मेघ येणें, त्याचं पावसांत रूपांतर होणें; पृथ्वीवर वनस्पति उगवणें नि त्यांना पानं, फुलं नि फळं येणें हें सर्व सृष्टीचें वैभव कोणीं केलं? चंद्राचं चांदणं, फुलांचं हंसणं, मेघांचं गरजणं ह्या गोष्टीचे जनक कोण आहेत ? या गोष्टी निसर्गत: होतात.

आत्म्याचे व कर्मांचे संबंधहि असेच अनादिकालापासूनचे आहेत. शांत जलाशयांत दगड टाकतांच अनंत जलवलयें निर्माण व्हावींत; वादळानें अफाट समुद्रांत लाटा निर्माण व्हाव्यात, त्याप्रमाणें आत्म्याचे रागादिक परिणाम झाले कीं अनंत पुद्गल-परमाणु समुदाय निर्माण होऊन त्याच्याकडे येतात. हें निर्माण झालेलं कर्म आठ गटांत विभागलं जातं. पूर्वी आत्म्याशीं बद्ध असलेले नि फल देऊन मोकळे झालेले कर्म-परमाणु नि:सत्त्व बनतात नि आत्म्यापासून भ्रमण करीत करीत, जलवृष्टि न करतां पुढें जाणाऱ्या पांढऱ्या शुभ्र ढगाप्रमाणें, आत्म्यापासून विलग होतात. एखाद्या सरोवरांत पोहणाऱ्या माणसानें हातवारे करतांच थोड्या वेळाकरितां तेथें पोकळी पोकळी निर्माण व्हावी आणि ती तावडतोब दुसरीकडील पाण्यानें भरून काढावी त्याप्रमाणें जुने कर्मपरमाणु गेल्यामुळें निर्माण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

झालेली पोकळी आत्म्याच्या शुभाशुभ परिणामांमुळें नवीन कर्म-परमाणु भरून काढतात. हीं सर्व कर्में गुपचुप होत असतात. प्रत्येक क्षणाला होत असलेल्या या अदृश्य कर्मांचें कार्य फार मोठें आहे.

* * *

— ५१ —

या नश्वर देहाची तुला थोडक्यांत माहिती सांगितली. नामकर्मांच्या भट्टींतून मानवांचे किंवा जीवांचे किती शारीरिक आकार होतात म्हणून सांगूं? नामकर्मांच्या रंगभूमीवर नाना आकाराचीं सोंगं नाचूं लागतात. कोणी काळे, कोणी पिवळे, कोणी तांबूस तर कोणी गोरे असतात. त्यांच्या रंगांतली विविधताहि नामकर्मांमुळेंच निर्माण होत असते. कांहींचीं शरीरं सुगंधीं आणि बहुतेकांचीं दुर्गंधीं असतात याचंहि कारण नामकर्मंच होय. जिभेला तिखट, कटु, गोड, आंबट हे रस प्रतीत होतात याचंहि कारण नामकर्म ! आणि या नामकर्मांच्या प्रतापानें शरिराला हलके, भारी, कोमल, कठोर, उष्ण, थंड हे गुण अनुभवावयास मिळतात या नामकर्मांचा गोतावळा बराच आहे. त्याचे ९३ प्रकार आहेत.

व्यवहारानें हे सर्व जीवाचे भेद आहेत. कारण त्याशिवाय जीवाची ओळख होत नाहीं. परंतु तुला खरं सांगूं का ? निश्चयनयानें ते जीवाचे भेद नाहींत. ते पुद्गलाचे भेद आहेत. कारण आत्मा फक्त ज्ञानानुभूतीनेंच युक्त आहे. आत्म्याचें हें शुद्ध लक्षण तूं जाण !

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– ५२ –

शरीर आपल्यापासून वेगळें आहे याची तुला चटकन् खात्री पटेल ! पण रागादिभाव मात्र जीवाचेच आहेत अशी तुझी खात्री झाली आहे. व्यवहार-नयाच्या अपेक्षेनें किंवा अशुद्ध दृष्टीनें हें तुझं म्हणणं बरोबर आहे. पण खऱ्या अर्थानें हे कर्मांचे भेद आहेत. तुला आतां सर्व कर्मांची थोडक्यांत ओळख करून देतें. आठ कर्मांपैकीं प्रमुख कर्म आहे मोहनीय. त्याचें चारित्र्य-मोहनीय आणि दर्शन-मोहनीय असे दोन प्रकार आहेत. त्यांपैकीं दर्शन मोहनीय कर्मानें मिथ्यात्वाचा उदय होतो. चारित्र्य मोहनीय कर्मानें अविरती, प्रमाद, कषाय, योग हे निर्माण होतात. कर्म तर पुद्गल आहे. कर्माच्या उदयानें हे भाव होत असल्यानें ते सर्व पौद्गलिक आहेत. आदिकारण पौद्गलिक आहे. अन् पुद्गल अजीव आहे. पुद्गलापासून पुद्गल आणि जीवापासूनच जीव निर्माण होत असतात. जीवामुळें पुद्गल आणि पुद्गलानें जीव यांची निर्मिती होऊं शकत नाहीं.

कर्में पौद्गलिक असल्यानें तीं जीवाचीं नाहींत. त्यांच्या उदयानें होणारें कार्यहि पौद्गलिकच असल्यानें तें जीवाचें होऊं शकत नाहीं. ज्या ज्या कारणांनीं नि साधनांनीं कर्मबंध होतो तीं सर्व कारणें नि साधनें पौद्गलिक होत.

* * *

– ५३ –

तुझ्या गुणांवर आवरण टाकणाऱ्या कर्मपटलांची तुला पूर्ण ओळख नाहीं. कर्मपटल पुद्गल आहेत; अन् पुद्गल तर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जड आहेत. स्पर्श – रस – गंध आणि वर्ण या गुणांनीं सहित पुद्गल द्रव्य असतें. याचे अणु व स्कंध असे दोन भाग आहेत. एक मोठा पुद्गल स्कंध घे! त्याचे तुकडे करीत जा! असंख्य किंवा अनंतानंतहि तुकडे होतील. शेवटचा एक तुकडा असा होईल कीं त्याचे पुन्हा तुकडे होणार नाहींत. या सर्वांत लहान तुकड्याला अणु म्हणतात. दोन किंवा दोहोंपेक्षां अधिक पुद्गल अणूंच्या समुदायाला स्कंध म्हणतात. या स्कंधाचेंहि पुष्कळ प्रकार आहेत.

तुला तीव्र--मंद कर्मांचा जो रस अनुभवावयास मिळतो – जीं फळें मिळतात, तीं सर्व घाति नि अघाति कर्मांचीं अनुभाग – स्थानें होत. जीवाचीं नव्हेत. कारण तीं पौद्गलिक अशा कर्मांच्या उदयानें होणारीं आहेत. अन् हें अंतरात्मन्! ह्या कर्मांचें फल जें सुख-दुःखरूप असतं तें पण पौद्गलिकच होय.

* * *

– ५४ –

तूं प्रत्येक क्षणाला – समयासमयाला – जें कर्म बांधतोस त्याला मुख्य कारण म्हणजे तुझ्या आत्म्याचें परिस्पंदन होय. आत्म्याचें परिस्पंदन म्हणजे त्याचें हलन-चलन होय. हें परि-स्पंदन तुझ्या मन, वचन आणि काय या तीन योगांच्या द्वारें होतें. हे योग म्हणजे मनोयोग, वचनयोग आणि कामयोग होत. योग ही आत्म्याची शक्ति आहे. वीर्यांतराय कर्माच्या क्षयोप-चयानें ही शक्ति निर्माण होते. या योगाच्या द्वारें म्हणजे आत्म्याच्या परिस्पंदनामुळें त्याच्या हलन–चलनानें कर्मवर्गणा त्याच्याकडे येत असतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शरिरांत आत्म्याच्या प्रदेशाचें सारखें हलन–चलन चालूं असतें. आत्म्याचे प्रदेश शरिराच्या सर्व भागांत सतत फिरत असतात. प्रत्येक इंद्रियाचा क्षयोपचय सर्व शरिरांत नि आत्मप्रदेशांत व्यापून आहे. आत्म्याच्या प्रदेशाचेहि तीन प्रकार आहेत. कांही चल आहेत, कांही अचल आहेत आणि इतर चलाचल आहेत. शरिराच्या मध्यभागीं आत्म्याचे जे आठ प्रदेश असतात ते अचलच असतात. द्रव्येंद्रियांना बाह्य इंद्रियांद्वारें निरनिराळें ज्ञान होतें. आत्म्याचे प्रदेश फिरत असतां त्या त्या इंद्रियाच्या ठिकाणीं आकार होऊन पुढें परिणमित होतात. याला अभ्यंतर निवृत्ति म्हणतात. म्हणजे आत्मप्रदेशाचे आकार इंद्रियरूप बनणें म्हणजे अभ्यंतर निवृत्ति होय.

या सर्व गोष्टी व्यवहारनयाच्या अपेक्षेनें जीवाच्या आहेत. कारण त्या जीवाशिवाय इतर ठिकाणीं होत नाहींत. या योगस्थानामुळें म्हणजे द्रव्येंद्रियें आणि भावेंद्रियें यामुळें आत्म्याची ओळख होते. पण शुद्ध निश्चयनयानें पाहिलें तर आत्म्याच्या एकमेव अखंड ज्ञानाशिवाय हीं सर्व योगस्थानें पुद्गलनिर्मित असल्यानें पौद्गलिक आहेत.

* * *

–५२–

आतांपर्यंत तूं अनेक जन्म घेतलेस. या जन्मजन्मांतरीं तूं कसा भटकत राहिलास हें कांही आठवतं तुला ? निव्वळ घाण्याच्या बैलाप्रमाणें डोळ्यांवर पट्टे ओढून आंधळ्यासारखं भटकण्यांत काय अर्थ आहे ? या अनेक भावांत तुझ्या कोण-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कोणत्या अवस्था झाल्या हें तूं कधीं समजून घेण्याचा प्रयत्न केलास का ? याचा कधीं शोध केलास काय ? अरे ! जगाच्या संशोधनाकरितां अहोरात्र झटतोस. अणु-परमाणूंच्या संशोधनाकरितां काय तुझा अव्याहत प्रयत्न चालू आहे ! पण वेड्या ! आत्म्याच्या क्षेत्राची विशालता कधीं तुझ्या ध्यानांत आली आहे ? त्याचं संशोधन करशील तर सुखाभासासाठीं चाललेली तुझी व्यर्थ धडपड सन्मार्गाकडे लागेल आणि अनेक जन्मांचीं तुझ्यावरचीं कर्मपटलं गळून ढगांवर मात करून तळपणाऱ्या प्रखर सूर्याप्रमाणें तूं तेजाळूं लागशील. अणु-परमाणूंच्या संशोधनानें ही वसुंधरा घशाखालीं घालण्याचो स्वार्थी धडपड पाहिलीस ना ? प्रत्येक मानवाचा आशेचा खड्डा एवढा विशाल आहे कीं त्यांत वसुंधरा एखाद्या अणुप्रमाणें वाटते, अन् पृथ्वीवरील सर्व मानवांची आशापूर्ति करायची झाली तर वसुंधरेची किती वाटणी करायची ? बाह्य जगताच्या संशोधनानें तुझ्या दुःखाची मर्यादा वाढतच जाईल.

* * *

–५६–

रे अन्तरात्मन !

तुला बांधणाऱ्या कर्मांच्या स्थितीचा तूं विचार करशील तर तुला अचंबा वाटेल. अनादि कालापासून तूं कर्मांनीं बद्ध आहेस. हो कर्मांची बंदीशाळा फार मोठी आहे. तुला बंदिस्त करणारा महाप्रबल आहे. आतांपर्यंत तूं इतके अपराध केले आहेस, कीं कोटयवधि काल लोटला तरी त्यांचें क्षालन होणें कठीण आहे. सतत कर्मबंधनांत राहिल्यानें ती बंदीशाला आतां तुला आवडूं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लागली आहे. पिंजऱ्यांतल्या पोपटाला गगनांतील स्वैरसंचार न आवडतां पिंजऱ्यांतलं गुलामी जिणंच आवडावं, तसा तुला मुक्तीचा स्वैरविहार आवडेनासा होऊन संसारांतील बद्धावस्थाच सुखद भासूं लागली आहे.

* * *

– ५७ –

एकेंद्रिय, द्वींद्रिय, त्रींद्रिय, चतुरिंद्रिय, संज्ञी, असंज्ञी व पचेंद्रिय हे क्रमानें सूक्ष्म व बादर किंवा पर्याप्त व अपर्याप्त या अपेक्षेनें जीवांचे चौदा प्रकार होतात. त्यांनाच चौदा जीवसमास असें म्हणतात. व्यवहारनयानें हे जीवांचे चौदा भेद आहेत. निश्चयनयानें कांही ते जीवाचे भेद नाहींत. बादर शरीर म्हणजे ज्या शरिरानें दुसऱ्या शरिरास आघात होतो, तें शरीर. ज्या शरिरानें दुसऱ्या शरिरास आघात होत नाहीं तें शरीर म्हणजे सूक्ष्म शरीर. सहा पर्याप्तींपैकीं ज्याची शरीरपर्याप्ति पूर्ण होते, त्यास पर्याप्तक असें म्हणतात. अन् शरीरपर्याप्ति पूर्ण न होतां मृत्यु पावणाऱ्या जीवास अपर्याप्तक म्हणतात.

जीवसमासाच्या चौदा अवस्थेंतून तूं अनेक वेळां गेला आहेस. तूं या सर्व प्रकारांशीं पूर्ण परिचित आहेस.

मिथ्यात्व, सासादन, मिश्र – अविरत सम्यक्त्व, देशविरत सम्यक् दृष्टि, संयतासंयत, प्रमत्तसंयत, अप्रमत्तसंयत, अपूर्वकरण, अनिवृत्तिकरण, सूक्ष्मसांपराय, उपशांतमोह, क्षीणमोह, सयोग-केवली, अयोगकेवली हीं ज्याचीं लक्षणें आहेत; अशीं चौदा गुणस्थानेंहि आत्म्याचीं नाहींत. तीं आत्म्याच्या अनुभूतीपासून भिन्न आहेत.

– ४

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

या सर्व गोष्टींतून तूं आपलं लक्ष बाहेर काढ. अन् निर्विकार, अभेद, शुद्ध आणि अखंड अशा आत्मिक सुखांत स्थिर रहा !

* * *

–५८–

तूं आतां ज्ञानी झाला आहेस. गुणस्थानापर्यंतचे भाव पर्यायाश्रित असल्यामुळें व्यवहारनयाच्या अपेक्षेनें जीवाचे आहेत. कारण जीवाचा व पुद्गलाचा अनादि कालापासूनचा संबंध आहे. जीव बद्धावस्थेंत आहे. त्यामुळें कार्माण वर्गणाच्या निमित्तानें होणारे भाव म्हणजे पराच्या निमित्तानें होणारे भाव व्यवहारतः जीवाचे आहेत. वाऱ्याच्या निमित्तानें समुद्रांत लाटा निर्माण होतात, त्यामुळें समुद्राचें पाणी खालीवर होत असतें. लाटा एका ठिकाणाहून दुसरीकडे जात आहेत असंहि आपण म्हणतों. पण तें व्यवहारतः खरें आहे. वस्तुतः पाणी एका ठिकाणाहून दुसरीकडे जात नाहीं. तेथल्या तेथें खालीवर होत असते. लाल रंगानें माखलेला कपडा लाल दिसतो. वस्तुतः कपडा व लाल रंग भिन्न आहेत. पण लाल कपडा असं व्यवहारतः म्हटलं जातं. निसर्गतः पाणी शुद्ध असतं. पण माती व घाण यांच्या मिश्रणानं गढूळ होतं. त्यामुळेंच तें दुर्गंधयुक्त गढूळ होतं. त्यास दुर्गंधयुक्त गढूळ पाणी असं आपण म्हणतों. तसंच कर्मानें हा जीव बद्ध असल्यानें कदाचित् तो मूर्तिक, पौद्गलिक म्हटला जातो अन् व्यवहारतः तें खरं आहे. तें प्रत्यक्ष तसं दिसतं आहे. पर्याप्त म्हणजे जीवाच्या बदलणाऱ्या अवस्था. या विस्तीर्ण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विश्वाच्या रंगभूमीवर जीव अनेक अवस्था धारण करून वावरत असतो. तो कधीं नारकी होतो; कधीं मनुष्यप्राणी म्हणून जन्म घेतो; कधीं पशुपक्षी होतो नि गगनाच्या विस्तीर्ण जागेंत संचार करतो; तर कधीं देव होऊन अप्सरांच्या सहवासांत रममाण होतो. तसं तो कधीं क्रोधी तर कधीं मानी होतो; त्याच्या इच्छाहि सरडयाच्या रंगाप्रमाणें पदोपदीं बदलत जातात. रुचि-भेद तर अनेकदां पहावयास मिळतो. त्याला कधीं गोड पदार्थ आवडतात तर कधीं तिखट; कधीं आंबट तर कधीं खारट ! तो कधीं कृष्णवर्णीय दिसतो तर कधीं गौरवर्णीय ! पुद्‌गलाच्या संयोगानें ह्या वेगवेगळया अवस्था होतात. या दृष्टीनें पाहिल्यास वर्णादि भाव वगैरे त्याचे जे भाव आहेत ते बरोबर आहेत. कारण ते मानल्याशिवाय जगाचा व्यवहारच चालत नाहीं. मनुष्य त्याच्या नांवावरून, गांवावरून, उंचीवरून, वर्णावरून ओळखला जातो. त्यामुळेंच जगाचा व्यवहार सुरळीत चालू आहे. सर्व जीवांना नांवानें हांक न मारतां 'आत्मा' म्हणून संबोधिलं तर जगाचा व्यवहारच थंडावेल. फूल सजीव आहे; झाडावरील फळांत जीव आहे; गाईंत आत्म्याचा निवास आहे; माणसांत जीव आहे. या सर्वांना वेगवेगळया नांवांनीं हांक न मारतां 'आत्मा' या एकाच नांवानें हांक मारूं लागलों, तर फारच गोंधळ माजेल. म्हणून व्यवहाराच्या अपेक्षेनें, त्याच्या पर्यायाच्या नि अवस्थेच्या अपेक्षेनें त्याला त्या त्या नांवानें हांक मारावी लागते. जीव कर्मांनीं बद्ध असला कीं तो मूर्तिक नि रूपी असतो. त्याला तसं म्हणणं भाग आहे. म्हणून हा व्यवहार-नय योग्य आणि खरा आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शुद्ध द्रव्यार्थिक नयानें पाहिलें तर आत्मा शुद्ध आहे. तो ज्ञायक आहे. त्याचं खरं स्वरूप ज्ञान-दर्शनच आहे. द्रव्याश्रितता व्यवहारतः खरी असते. तशी दृष्टि ठेवल्यानेंच आत्मा शुद्ध दशेला प्राप्त होतो.

* * *

– ५९ –

तूं अजूनहि जीव आणि वर्णादिक भाव यांच्यासंबंधीं साशंक आहेस. ही संभ्रमावस्था सोडून दे ! तूं राजहंस बन ! खरं नि खोटं यांतील भेद तत्काळ जाण ! पाणी व दूध यांचें मिश्रण राजहंसापुढें ठेवलें तरी राजहंस त्यांतील भिन्नत्व जाणतो नि फक्त त्यांतील दूध अलग करून तें प्राशन करतो. अग्नि व उष्णता यांचा जसा तादात्म्य संबंध आहे तसा संबंध दूध आणि पाणी यांचा नाहीं, हें राजहंसपक्षी ताबडतोब ओळखतो. त्याचप्रमाणें मीं हें जें वर्णादिक वगैरे सांगितलें त्यांचा व जीवाचा अग्नि आणि उष्णता यांच्याप्रमाणें तादात्म्य संबंध नाहीं. तो संयोगी किंवा एका क्षेत्रामध्यें राहणारा आहे.

राजहंस पक्ष्याप्रमाणें तूं विवेचक बन ! खरं नि खोटं यांच्यांत अभिन्नत्व न मानतां त्यांतील भिन्नत्व जाण ! तुझं शुद्ध रूप तूं जाण.

* * *

– ६० –

व्यवहार व निश्चयनयांतील फरक जाणल्यानें त्यांच्यांत विरोध निर्माण होईल असं मानण्याचं कारण नाहीं. तुला एका उदाहरणानें ही गोष्ट पटवून देतें. या दोन नयांत विरोध निर्माण होत नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

'चोर बाजार' हें नांव तूं ऐकलंच असशील वस्तुतः बाजार थोडाच चोर असतो ? पण चोरीचा माल तेथें मिळत असल्यानें त्याला चोरबाजार असं म्हणण्यांत येतं ! हा व्यवहार आहे. त्यानें त्या बाजाराच्या मूळच्या स्वरूपांत फरक पडण्याचें कांहीएक कारण नाहीं. तसंच मार्गणा, रागादिक भाव, गुणस्थान हे जीवाचे मानले जातात. तो व्यवहार आहे. अन् व्यवहाराच्या अपेक्षेनें तो खरा आहे. ★ ★ ★

– ६१ –

शरीर, रंग, रागादिभाव, संस्थान, संहनन, गुणस्थान वगैरे व्यवहारनयाच्या अपेक्षेनें जीवाचे आहेत; निश्चयनयाच्या अपेक्षेनें ते जीवाचे नाहींत. त्यांच्या संसर्गानें जो 'मीपणा' निर्माण होतो तो अयोग्य आहे. ते रागादि भाव क्षणिक असल्यामुळें जीवाचे नाहींत.

तुला निमित्त–नैमित्तिक संबंधाची माहिती आहे काय ? जीव अनेक वेळां कधीं क्रोधानें, तर कधीं मोहानें, रागद्वेषांनीं युक्त बनतो. यांत रागभाव हा जीवाचा. हा रागभाव नैमित्तिक म्हणतात. पण हे भाव कर्मांच्या निमित्तानें झाले म्हणून कर्म निमित होत. हाच निमित्तनैमित्तिक संबंध होय. तो अनादि कालापासून चालत आला आहे.

तुला एक व्यावहारिक उदाहरण सांगतें म्हणजे ही गोष्ट तुला नीट कळेल. कुंभार तुला ठाऊक आहेच. तो मातीच्या साह्यानें अनेक भांडीं तयार करतो. तीं निरनिराळ्या आका-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राचीं नि वेगवेगळ्या नक्षींचीं असतात. यांत कुंभार, चाक, काठी हे निमित्तमात्र होत आणि माती हें नैमित्तिक होय. या दोन्ही नयांत विरोध येण्याचं कांही कारण नाहीं * * *

– ६२ –

सिद्धांतादि ग्रंथांत वर्णादिक भाव जीवाचे आहेत म्हणून सांगितलें आहे अर्थात् व्यवहारनयानें तें वर्णन केलें गेलें आहे. निश्चयनयानें जीव शुद्ध उपयोगात्मक आहे पण व्यवहारनयानें केलेलें वर्णन असत्यार्थच आहे असं समजूं नकोस. तुला हें वेगळ्या दृष्टांतांनीं समजावून देण्याचं कारण नाहीं. ज्या वेळेला एका द्रव्याच्या असाधारण गुणस्वभावाचे अभेदानें वर्णन केलें जातें त्या वेळेला परस्पर निमित्तनैमित्तिक भाव व निमित्तानें होणारे पर्याय हे सर्व गौण समजावेत. एका अभेद दृष्टामध्यें वर्णादिकांचा प्रतिभास होत नाहीं; म्हणून हे सर्व भाव असत्यार्थ सांगितले आहेत. सर्वथा असत्यार्थ सांगितले असते तर व्यवहाराचा लोप व्यक्त झाला असावा.

स्याद्वादरूप-कथन हें सम्यग्ज्ञान करून देतें, यावर आतां तुझा विश्वास बसलाच असेल * * *

– ६३ –

तुझ्या स्वरूपाचें कितीतरी प्रकारांनीं मीं वर्णन केलं आहे. तुझं अंतरंग उघडं केलं आहे पण तरीहि तुझ्या स्वरूपाविषयीं तुला शंका येतच आहेत. झोपीं गेलेल्या माणसाला जागं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करतां येईल; पण झोपेचं वेड पांघरणाराला कसं जागं करायचं ? अज्ञानाचं वेड पांघरून तूं जाळ्यांत अडकूं पाहतोस. तुझं म्हणणं असं आहे, 'अग्नि आणि उष्णता यांच्या संबंधाप्रमाणें जीवाचा व जड पदार्थांचा तादात्म्य संबध कां असूं नये ?''

तुला एक उदाहरण देतें. उज्जैनी नगराचा प्रसिद्ध श्रेष्ठी चारुदत्त तुला ठाऊकच असेल. त्या नगरांत अशी एकहि संस्था नव्हती जिथें चारुदत्ताच्या औदार्यानें प्रवेश केला नसेल, तो धनाढ्य होता तेव्हां त्याचं घर अनेक आप्तांनीं नि हितचिंतकांनीं गजबजून गेलेलं असे. पण दुर्दैवाच्या फटकाऱ्यानें चारुदत्त दारिद्र्याच्या खाईंत लोटला जातांच सर्व आप्तेष्ट त्यास सोडून गेले. फक्त त्याचा मित्र मैत्रेयच त्याच्याबरोबर अखेरपर्यंत राहिला. यावरून चारुदत्ताचा खरा मित्र किंवा हितचिंतक कोण होता तें तूं सहज सांगूं शकतोस. सुखाच्या वेळीं सुख भोगणारा आणि दुःखाच्या वेळीं दुःख वाटून घेणाराच खरा मित्र ! इतर लोक स्वार्थी जाणावेत !

रागादिक आणि वर्णादिक भाव संसारावस्थेंतच जीवाबरोबर असतात. मुक्तावस्थेंत ते नसतात. जे गुण संसारावस्थेंत आणि मुक्तावस्थेंत जीवाबरोबर असतात तेच जीवाचे खरे गुण होत. त्यांचाच जीवाशीं तादात्म्य संबंध असतो.

* * *

– ६४ –

वर्णादिकभाव जर तूं जीवाचे मानतोस तर जीव आणि पुद्गल यांत फरक कोणता राहिला ? जगांत सहा द्रव्यें आहेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल हीं तीं सहा द्रव्यें होत. यांतलं प्रत्येक द्रव्य स्वतंत्र आहे. एकाचा दुसऱ्याशीं कांहींच संबंध नाहीं. आपल्या असाधारण लक्षणानं प्रत्येक द्रव्य आपलं निराळं वैशिष्टच राखीत असतं. वर्णादिक आणि रागादिक भाव पुद्गल द्रव्याचें असाधारण लक्षण होय. तें जर जीवाचेंहि मानलें तर जीव आणि पुद्गल यांत फरक कोणता राहिला? दोन्हीं द्रव्यें एक झालींत! पण हें तुला पटतं काय? ही विचित्र-मैत्री खरी वाटते काय?

हे वर्णादिक भाव तुझ्या शत्रूचे सांगाती आहेत. त्यांना तूं 'आपले' म्हणून संबोधूं लागलास तर शत्रूमित्रांत फरक काय राहिला? तुझा व पुद्गलाचा तादात्म्य संबंध प्रस्थापित होईल. असं झालं तर सज्जन व दुर्जन, शत्रु आणि मित्र यांत कांहीहि फरक न मानतां त्यांचं एकच लक्षण मानावें लागेल. पण हें तुला पटतें काय याचा नीट विचार कर!

★ ★ ★

– ६५ –

कांहीजण तुला सांगतील, 'रागादिक भाव संसारावस्थेंत जीवांचे असतात. त्यांचा जीवाशीं तादात्म्य संबंध असतो. मुक्तावस्थेंत जीव दुसरे भाव ग्रहण करतो आणि त्यांच्याशीं तादात्म्य पावतो.'

ही तुझी शुद्ध फसवणूक आहे. तिला तूं बळी पडूं नकोस. अरे! रागादिक भावांशीं तादात्म्य पावलेलें द्रव्य पुद्गलच असतं. तें तर रूपी आणि जड असतं. जर ते भाव जीवाचे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मानले तर जीव देखील रूपी आणि जड बनेल! असं झालं तर चैतन्य हें जड असतं असं म्हणण्यासारखं झालं, हा वदतोव्याघात झाला.

अंतरात्मन! अशा भूलथापांना बळी पडूं नकोस! तुझं स्वरूप तूं नीट समजावून घे!

★ ★ ★

– ६६ –

शत्रूच्या भूलथापांना बळी पडून त्याच्याबरोबर प्रवाहपतिताप्रमाणें तूं वाहवत गेलास तर निर्वाणपदाच्या सोपानाची पहिली पायरीहि तूं ओलांडूं शकणार नाहींस. तूं जड म्हणून ओळखला जाशील. मेंढरांच्या कळपांत वाढून आत्मस्वरूप विसरून गेलेल्या शेळपट सिंहासारखी तुझी स्थिति होईल. जीवन समुन्नत होण्यासाठीं झालेले तुझे सारे प्रयत्न व्यर्थ ठरतील.

तुझी धडपड मोक्षांतील अखंड आनंदाच्या प्राप्तीसाठीं चालूं होती! पण वरीलप्रमाणें तुझं आचरण घडूं लागलं तर मुक्तिसौख्याची अवीट गोडी तुला केव्हांच चाखतां येणार नाहीं. विषालाच अमृत मानून, मृत्यूलाच जीवन समजून, अंधारालाच प्रकाश समजून तुला जगावें लागेल.

याचा तूं गंभीरपणें विचार कर!

★ ★ ★

– ६७ –

एकेंद्रिय, द्वींद्रिय, त्रींद्रिय, चतुरिंद्रिय, पंचेंद्रिय, बादर, सूक्ष्म, हीं प्रत्येकीं पर्याप्त आणि अपर्याप्त अशीं १४ जीवस्थानें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होत. नाम कर्माच्या उदयानें तीं होत असल्यानें पौद्गलिक आहेत. कारण नामकर्म हें पौद्गलिक आहे.

ही साधी गोष्ट तुझ्या ध्यानांत येत नाहीं. सोन्याचें एक भांडें आपण तयार केलें तर तें 'सुवर्णाचें भांडें' असं आपण म्हणतों ना ? चांदीचें पात्र जर तयार केलें तर तें चांदीचें पात्र म्हणूनच ओळखलं जाणार ! सुवर्णाचें पात्र हें चांदीचें पात्र होईल काय ? ज्याची वस्तू बनते तिला त्याचेंच म्हणावें लागतें. जसें – कारण असेल तसेंच कार्य बनत असतें !

* * *

– ६८ –

रागादिक नि वर्णादिक भाव व १४ जीवस्थानें हीं नामकर्माचीं आहेत असें जाण ! तूं त्यांना जीव मानूं नकोस. कारण ते जीव होऊं शकत नाहींत; त्यांत चेतना निर्माण होऊं शकत नाहीं. याविषयीं तूं पुन्हा साशंक बनूं नकोस.

शुद्ध द्रव्यार्थिक नयाच्या अपेक्षेनें जीव आत्माज्ञानानें परिपूर्ण भरलेला आहे. चेतनेनें तो युक्त आहे याशिवाय आत्म्याचें वेगळें स्वरूप नाहीं.

तुझ्यापुढें शुद्ध द्रव्यार्थिक नयाचें ध्येय आहे. परिपूर्ण ज्ञान प्राप्त करून घेण्याचें ध्येय तुझ्यापुढें आहे त्याचा तूं विसर पडूं देऊं नकोस.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– ६९ –

शास्त्रांत पर्याप्त-अपर्याप्त इ० जीवाचे भेद आहेत म्हणून सांगितलं आहे. व्यवहारत: तें सत्य आहे; भूतार्थ आहे. तसं म्हटल्याशिवाय व्यवहार चालूं शकत नाहीं.

शास्त्रांत नामविक्षेप, स्थापनाविक्षेप, द्रव्यविक्षेप आणि भावविक्षेप असे चार भेद व्यवहाराचें निरूपण करण्याकरितां सांगितले आहेत गुणांची अपेक्षा न ठेवतां व्यवहार चालण्याकरितां नामाभिधान ठेवणें यास नामविक्षेप म्हणतात. जसे महावीर, भरत, जवाहर, सोनुबाई इ० याप्रमाणें नांवें ठेवलीं नसतीं तर जीवाजीवांतला फरक ध्यानांत आला नसता. पदार्थ असो किंवा नसो त्याची तदाकार किंवा अतदाकार स्थापना करणें यास स्थापनाविक्षेप म्हणतात. पाषाणाच्या मूर्तीला 'महावीर' म्हणणें किंवा कोणत्याहि दगडाला महादेव वगैरे म्हणणें. भूतकालीन व भविष्यकालीन पदार्थाचा वर्तमानकालीन पदार्थामध्यें आरोप करणें यास द्रव्यविक्षेप म्हणतात. राज्य लयाला गेल्यानंतर देखील एखाद्या व्यक्तीस राजा म्हणणें हा द्रव्यविक्षेप झाला. तसेंच पुढें राजा होणाऱ्या राजपुत्रास आतांच राजपुत्र म्हणणें यासहि द्रव्यविक्षेप म्हणतात. आणि ज्या. काळीं एखाद्या पदार्थाचे जे भाव असतील त्यावेळेस त्याला तसं म्हणणं यास भावविक्षेप म्हणतात.

शुद्ध नयाच्या अपेक्षेनें जीवाचे कोणतेच भेद नाहीत. तो शुद्ध ज्ञानमय आहे व्यावहारिक भेदाभेदाच्या पारतंत्र्यांतलें दुःख तूं सुख मानतोस पण आत्म्याच्या अभेदावस्थेंतील स्वातंत्र्य·

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सुखाची तुला काय कल्पना असणार? स्वातंत्र्याचं मोल समजून घेण्याकरितां पारतंत्र्यालाहि जाण! त्यामुळेंच स्वातंत्र्याचें खरें मोल तुला कळून येईल. ✱ ✱ ✱

- ७० -

संसाराच्या शृंखलांनीं बद्ध झालेला मनुष्य आत्मस्वातंत्र्याला मुकतो. या पारतंत्र्याच्या शृंखला तोडण्यासाठीं बाह्य शस्त्रास्त्रांची जरुरी नाहीं; कोणत्याहि बाह्य साधनांची आवश्यकता नाहीं. तुझ्या अतरंगांतील रागादिक भाव तुझ्या दास्यशृंखला निर्माण करतात. हे अंतरंगांतील भाव तुझे नव्हेत. ते मोहकर्मानें उत्पन्न होत असतात. दर्शनमोह व चारित्रमोह यामुळें ते निर्माण हातात. कर्म पुद्गल असल्यानें त्यानें निर्माण झालेले भावहि पौद्गलिक आहेत. असं असतां ते भाव तूं तुझे कसे मानतोस? तुला इष्ट वाटणाऱ्या पदार्थांच्या प्राप्तीनें तुला आनंद होतो; त्यांच्या वियोगानं दुःख होतं. तुला अनिष्ट वाटणाऱ्या पदार्थांच्या संयोगानें तूं दुःखी होतोस आणि त्यांच्या वियोगानें सुखी होतोस. सुख आणि दुःख, द्वेष आणि अनुराग पौद्गलिक आहेत. ज्या कार्माणवर्गणांनीं हे भाव निर्माण होतात, ते पौद्गलिक असल्यानें, त्यांच्यामुळें निर्माण झालेले भावहि पौद्गलिकच होत. पुद्गल आणि आत्मा यांचीं लक्षणं मूलतःच भिन्न असल्यानें दोन्ही वेगवेगळे आहेत. म्हणून पुद्गलानें निर्माण झालेले भाव जीवाच्या दृष्टीनें 'मळ' होत. शुद्ध नि स्वच्छ पाण्यांत माती टाकतांच तें गढूळ होतं. गढूळपणा कांही

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पाण्याचा गुणधर्म नव्हे. कापसाचा रंग पांढरा शुभ्र असतो. पण त्यापासून लाल, पिवळें इ० अनेक रंगांचं कापड तयार होतं. कापड लाल दिसलं म्हणून काय झालं? त्याचा मूळचा रंग पांढराच आहे.

दुःखस्वरूप व आकुलता आत्म्याचीं नाहींत. कारण आत्म्याचं स्वरूप म्हणजे नित्य अनंत ज्ञान, अनंत सुख असं आहे. या आनंदस्वरूपी आत्म्याच्या स्वरूपांत तूं लीन हो आणि त्याच्या निर्विकल्प समाधीचें सुख भोगत रहा. * * *

– ७१ –

गांव नि घर अस्वच्छ राहिलेलं तुला खपत नाहीं! तुझे कपडे अस्वच्छ झाले तर तें तुला खपत नाहीं! पण तुझं जीवन निर्मळ बनविण्यासाठीं तूं प्रयत्नशील नाहींस ही दुःखाची गोष्ट नाहीं का? शरीर स्वच्छ राहण्यासाठीं तूं तें साबणानें धुवून काढतोस! पण अंतरंग स्वच्छ करण्याचा प्रयत्न तूं कां करीत नाहींस? 'नाहीं निर्मळ जीवन काय करील साबण?' तुझं जीवन निर्मळ ठेवण्यासाठीं साबण उपयोगीं पडणार नाहीं. त्यासाठीं तुला तुझ्या अंतरंगांतले विकार काढून टाकावे लागतील. ते तूं काढून टाक! उन्नत जीवन हेंच आत्मिक उत्थानाचें प्रमुख साधन आहे.

जोंपर्यंत तुझी दृष्टि आत्माभिमुख होत नाहीं तोंपर्यंत तुझ्या आत्म्यावरील मल तसाच सांचत राहील. हा मल कशानें सांचतो हेंहि तुला अंतर्मुख झाल्याशिवाय कळणार नाहीं. आत्म्यावर बसणारा कर्मास्त्रवाचा मल तूं ओळखणार नाहींस

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तोंपर्यंत तुझ्या अज्ञानामुळें तो मल अधिकाधिकच सांठत जाणार! या सांठत गेलेल्या कर्ममलानें तुझा आत्मा फारच मळकट झाला आहे. साबणानें बाह्य देह स्वच्छ झाल्यासारखा दिसेल. पण त्यानें आत्मा कांही शुद्ध होणार नाहीं. त्याकरितां अखंड तपश्चर्या, आत्मिक शुचिता, पवित्र भावना, उदात्त विचार यांचीच आवश्यकता आहे. त्यांचा तूं अंगीकार कर आणि जीवन समुन्नत कर. ☆ ☆ ★

– ७२ –

तूं क्रोधादिक भावनांशीं आणि तज्जनित कर्मांशीं एकरूप झाला आहेस. तळचांतलं मूळचं पाणी आणि बाहेरून येणारं पाणी दोन्ही एकरूप व्हावींत त्याप्रमाणें तूं नवागत कर्मांशीं एकरूप झाला आहेस. या एकरूपतेच्या भावनेमुळेंच तूं बद्ध आहेस. अज्ञान टाकून दे म्हणजे तूं बद्ध होणार नाहींस.

ही मलीनता, हा कर्मसंचय कशानें येतो तें जाणून घे. त्याच्या मुळाशीं अज्ञान हेंच कारण आहे. कर्मसंचय नाहींसा करण्याचा प्रयत्न कर. आत्मा कर्मातीत झाला म्हणजे त्यामुळें लाभणारा आनंद दिव्य असाच राहील. त्यानं लाभणारं समाधान अलौकिक असंच राहील. त्याची तूं प्राप्ति करून घे. ☆ ☆ ★

– ७३ –

प्रथम तुझी मलिन दृष्टि स्वच्छ कर. बाह्य मोहांत गुंतलेली दृष्टि अंतर्मुख कर. त्यानें तुला कळून येईल कीं तुझा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आत्मा ज्ञानस्वरूपी आहे. हे क्रोधादिक भाव पुद्‌गलाचे म्हणजे परद्रव्याचे आहेत. दोन्ही एकरूप असते तर त्यांचा सहवास अखंड आणि अविच्छेदात्मक असा राहिला असता. पण तसं तर घडलेलं दिसत नाहीं. ज्या वेळेस ज्ञान जागृतावस्थेंत असतं त्या वेळेस क्रोधादिकांचं अस्तित्व नाहींसं होतं. ज्या वेळेस क्रोधादिक भाव असतात त्यावेळीं ज्ञानाचं अस्तित्व नष्ट होतं. अर्थात् ज्ञानाच्या वेळीं ज्ञानाचेंच परिणमन होतें, क्रोधादिकांचें नव्हे. क्रोधादिकांच्या वेळीं क्रोधादिकांचेंच परिणमन होतें, ज्ञानाचें नव्हे.

★ ★ ★

– ७१ –

रे अंतरात्मन ! आजचें जीवन हा मलिन भावनांचा खेळ आहे ! रागादिक भावनांच्या म्हणजेच दुष्ट कर्मांच्या संगतीनें मानवा-मानवांत झालेल्या विपरीत भावनांमुळें ही दुःखांतिका घडून येत आहे. गत कर्मांच्या उदयानें ही दुःखांतिका घडून येत आहे. एक युद्ध दुसऱ्या युद्धाचें बीज असतें असें म्हणतात; पण हें म्हणणेंहि थोडें वरवरचें झालें ! त्याचें मूळ स्वरूप असें आहे. गत जन्मीच्या कर्मांत हें युद्ध झालं, या युद्धां-तल्या कर्मं जीवन वाईट भावनांमुळें पुढील वाईट भावना सुप्तावस्थेंत कां होईना पण निर्माण झाल्या ! त्यांचें व्यक्त स्वरूप जेव्हां दिसेल तेव्हां आणखी एका युद्धाचें दृश्य आपणांस दिसेल.

बडबड करीत वेडीवांकडीं पावलं टाकीत जाणारी ही व्यक्ति पाहिलीस का ? येणाऱ्या जाणाऱ्या स्त्रीस तो कधीं 'आई'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म्हणतो; कधीं 'मुलगी' समजतो आणि लहर फिरली कीं तिला 'पत्नी' मानतो! सर्व व्यसनांत तो दंग असल्यानें त्याचा बुद्धीभ्रंश झाला आहे. आणि बुद्धीभ्रंशाचें फळ कोणतं असतं हें तुला सांगायला हवें का? बुद्धीभ्रंशानें मनुष्याचा नाश ठरलेलाच असतो!

* * *

-७५-

रे अंतरात्मन्! तूं पाण्यासारखा शुद्ध आहेस. दर्पणासारखा निर्विकारी आहेस. कमळासारखा निर्ममत्वी आहेस. समुद्रासारखा विशाल नि गंभीर आहेस. ज्ञान, दर्शन इत्यादि गुणरत्नांनीं भरलेला आहेस. आकाशासारखा विशाल नि अनंत आहेस. सूर्यापेक्षांहि तेजःपुंज आहेस. तुझी आत्मज्योत नित्य प्रकाशमान आहे. तूं मेरुपर्वतासारखा अविचल आहेस.

रे भाग्यवंता! तुला आतां खऱ्या स्वातंत्र्याच्या सुखाची कल्पना आली. तूं आतां चित्ताची एकाग्रता करून सर्व संकल्पविकल्प झुगारून दे. रत्नत्रयमय निर्मलानुभूतीचें तूं ग्रहण कर, व सदैव सुखी रहा. हेंच तुझें सत्तेचें घर आहे. तेथेंच तुला खरी निर्विकल्प समाधि मिळेल.

* * *

-७६-

रे अंतरात्मन्! हें लाखेनें वेष्टिलेलें पिंपळाचें झाड पाहिलेंस का? पिंपळाच्या झाडावरच लाख उत्पन्न झाली, पण शेवटीं तीच घातक ठरली; नि तिनें पिंपळाचा घात केला. पिंपळाचें झाड वध्य ठरलें. पिंपळानें मित्र म्हणून तिचा सांभाळ केला, पण तो शेवटीं घातक ठरला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पिंपळ आणि लाख यांच्या संबंधाप्रमाणेंच जीव आणि पुद्गल यांचा संबंध आहे अनादि आत्म्याबरोबर आत्स्रावाची मैत्री सुरूं झाली. पण ही मैत्री म्हणजे बिळचा-भोपळचाचें सख्य होय. ती अहि-नकुलाची मैत्री. त्यानें जीवाचा घातच होणार. आत्स्रावाचीहि कृति खरोखर अजबच म्हटली पाहिजे.

क्षणिक वस्तूची कोणता शाहणा मनुष्य आस्था बाळगेल ? नित्य, शाश्वत, अनश्वर अशा तुझ्या आत्म्याबद्दल आस्था बाळग.

★ ★ ★

–७७–

रे अंतरात्मन् ! आज तूं बराच धांदलींत दिसतोस. गांवाच्या मध्यभागीं तूं बांधलेल्या टोलेजंग बंगल्याचा आज उद्घाटन समारंभ आहे असं वाटतं. तूं बांधलेल्या राजेशाही राजवाडचाचा किती अभिमान आहे तुला ! तें घर बांधण्याच्या अहंकारांत आणि आनंदांत किती गढून गेला आहेस तूं !

हा अभिमान किती दिवस टिकून राहणार आहे ? जगांत आपल्या वैभवानें गाजलेल्या अनेक संस्कृति धुळीस मिळाल्या ! अनेक दिव्य आणि भव्य कला मातीमोल ठरल्या. अन् तूं तुझ्या भव्य वाडचासंबंधीं कोणत्या आधारावर अभिमान बाळगतोस ?

अज्ञानावर आधारलेली तुझी ही कल्पना काढून टाक. तूं जेथें रागादिक भावांचा आणि तुझ्या शरिराचा कर्ता नाहींस, तेथें तुझ्या घराचा कर्ता तूं कसा होऊं शकशील ? तूं ज्ञाता आहेस. जाणणें एवढेंच तुझें कार्य ! पण त्यामुळें होणारे सुख-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दु:खादि परिणाम आणि अहंकार हे मात्र तुझे नव्हेत. त्यांचा धनी होणं म्हणजे पर्यायानें पापाचा धनी होणें होय ! म्हणून त्यांच्या प्राप्तीनं तूं फुगून जाऊं नकोस. बाह्य कर्मांच्या सुख-दु:खांत रमून जाऊं नकोस. * * *

–७८–

मातीचे कलश बनवितांना कुंभारास कष्ट पडतात. त्यामुळें तो दु:खी होतो. पण कलश पूर्ण होतांच त्याचे दु:खरूप परिणाम बदलतात, आणि तो सुखी होतो. तूं म्हणशील 'कुंभ-काराचे असे परिणाम कलशानेंच बनविले'. म्हणजे कुंभकाराच्या परिणामाचा कर्ता कुंभ आहे.

हें तुझं म्हणणं चुकीचं आहे. कुंभकाराच्या परिणामांचा कर्ता कुंभकारच आहे. त्याच्या ज्ञानाचा कर्ताहि तोच आहे. तो परद्रव्याला जाणतो, पण तत्स्वरूप होत नाहीं. ज्ञान्याला होणाऱ्या ज्ञानांतच प्राप्य, विकार्य आणि निर्वत्य अशा अवस्था होतात. तो आपल्याच भावाला ग्रहण करतो; आपल्याच भावरूपानें परिणमतो; आपल्याच नवीन भावांना उत्पन्न करतो.

तूं ज्ञानी आहेस. तूं परद्रव्याचा कर्ता नसून ज्ञाता आहेस. तूं तुझ्या भावांचा, तुझ्या परिणामांचा कर्ता आहेस. कर्मांच्या उदयाला तूं जाणतोस, पण तत्स्वरूप बनत नाहींस.

तूं आपले परिणाम पहा. ते सतत शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न कर.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

— ७९ —

आतां तूं ज्ञानी झालास. धर्माचं स्वरूप नि त्याचं कार्य तुझ्या ध्यानांत आलं. समयासमयास कर्म उदय पावतं नि त्याचं फळ म्हणून अनेक सुखदुःखं लाभत असतात. हीं कर्माचीं फळं तुझी नव्हेत. तुझी कीर्ति झाली, कीं सारेजण तुझी वाखाणणी करतात. तूं श्रीमंत झालास आणि सर्व विषयांची तुला अनुकूलता लाभली तर स्वतःला तूं फार सुखी समजतोस. पण तुझी अपकीर्ति झाली, तूं दरिद्री झालास, तुझ्या आवडत्या वस्तूचा वियोग झाला कीं तूं दुःखी होतोस, पण हें सर्व कर्मजनित आहे. हीं सुखदुःखं पुद्‌गल पदार्थांच्या निमित्तानें मिळत असल्या कारणानें पौद्‌गलिक आहेत. मातीनें सुंदर कलश तयार होतो. सुंदर कलश मातीचें फळ होय. वृक्षाला गोड फळें येतात. तीं वृक्षाचीं होत. तीं कांही तुझीं नव्हेत. त्यांच्याशीं तुझा कांही तादात्म्य संबंध नाहीं. परद्रव्याचें फल परच समजावें.

रे ज्ञानवंता ! ख्याति, पूजा, लाभ, भोग, आकांक्षा यांचा तूं कर्ता किंवा भोक्ता नाहींस. त्यायोगें तुझ्या मनांत उठणारे विकल्प तुझे नव्हेत. स्वच्छ व गोड पाण्यानें भरलेल्या कलशाप्रमाणें तूं शुद्ध भावनांनीं परिपूर्ण आहेस. आत्म्याच्या निर्विकल्प आनंदाचा तूं कर्ता आहेस. त्या आनंदांतच तूं रममाण हो.

* * *

— ८० —

रे अंतरात्मन् ! रोजच्या रोज तत्त्वज्ञानाचे घोट तुला किती पाजूं ? निजात्मस्वरूप समजून देखील तूं बाह्य वैभवानें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिपून जातोस; हें महदाश्चर्य आहे ! तुझे सारे प्रयत्न, सगळे व्यवहार, संपूर्ण क्रिया आत्मशोधनांत नि आत्मचिंतनांत लागू पडल्या पाहिजेत; पण व्यर्थ ! नळींत घातलेल्या श्वानाच्या शेपटीप्रमाणें शास्त्र, गुरु, देव यांच्या सान्निध्यांत तुझे परिणाम सरळ असतात. पण नळीचा आश्रय तुटतांच पुन्हा वक्र होणाऱ्या शेपटीप्रमाणें तूं पुन्हा बाह्य वैभवानें फसून सन्मार्गविन्मुख होतोस.

* * *

–८१–

रे अंतरात्मन् ! अज्ञानी माणसं अज्ञानांतच सुख मानतात. अज्ञानांत सुख मानावं हें त्यांच्या मनोवृत्तीला धरूनच आहे. पण तुझ्यासारखा ज्ञानी मनुष्यहि जेव्हां अज्ञानांतच सुख मानूं लागतो तेव्हां मात्र आश्चर्याचे अनेक धक्के बसतात. अरे ! तूं ज्ञानी असूनहि सुखदुःखाच्या कल्पनेनं गोंधळून कां जातोस ? असा चिंताग्रस्त कां ? पुन्हां कांही शंका तुझ्या मनांत उभ्या आहेतच.

तूं म्हणतोस या सर्व सुंदर नि मोहक वस्तु सुख देतात आणि त्यांच्यामुळें आनंद निर्माण होतो. या वस्तूंच्या सहवासानें मी हर्षित होतों, त्यांच्या उपभोगानें माझी तृप्ति होते, हें मी प्रत्यक्ष अनुभवीत आहे. माझंच कां ? हा कुंभकारच पहा ना ! घट बनवीत असतां होणाऱ्या त्रासानें हा दुःखी होत होता, पण पूर्ण घटाच्या रूपानं त्याच्या प्रयत्नांचीं फळं जेव्हां त्यास मिळालीं तेव्हां तो सुखी झाला.

कोणतेंहि कार्य असो; त्याच्या निर्मितींत उपादान व निमित्त हीं दोन कारणें आवश्यक आहेत. मुख्य कारण उपादान

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आणि गौण निमित्त होय. हीं गौण कारणं अनेक असतात. कार्य होण्यास कारणीभूत असणारा एकच पदार्थ (उपादान कारण) असतो. पण तें कार्य होण्यास निमित्तं मात्र अनेक असतात. पण उपादानशिवाय हजारों निमित्तें एकत्रित केलींत तरी त्यांच्यानें कांही कार्य होत नाहीं.

★ ★ ★

– ८२ –

रे अंतरात्मन् ! जीव-अजीवाचें, जडाजडाचें, चेतना-चेतनेचें कोडें कोणाला लवकर उलगडत नाहीं. मोठमोठे वैज्ञानिकहि यापुढें हतप्रभ झाले आहेत. हें कोडें उलगडण्याचे पुष्कळांनीं प्रयत्न केले, मोठमोठे वादविवाद झाले, एवढेंच काय पण युद्धेंहि झालींत. अनेक पंथीयांनीं निरनिराळे मार्ग शोधून काढले. पण कोणालाहि कर्माचं कोडं उलगडलं नाहीं. अरे ! याकरितां बाह्य शोध आणि बाह्य विज्ञान यांची काय आवश्यकता ? अंतरंग प्रवेश करूनच हें कोडं उलगडणार. ज्यांनीं अंतरंगांत प्रवेश करून सूक्ष्म शोध केला ते वीतरागी भगवंतच या कार्यांत यशस्वी झाले. त्यांनींच हें कोडं उलगडून दाखविलं.

★ ★ ★

– ८३ –

रे अंतरात्मन् !

हा फुललेला बगीचा पाहिलास का ? कोणी फुलवला आहे ? तूं चटकन् म्हणतोस, 'माळ्यानें फुलवला'. समर्थ-अशा निमित्तास किती महत्त्व आहे हेंच यावरून सिद्ध होतें. यालाच व्यवहार म्हणतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रे अंतरात्मन् ! 'परद्रव्याचा मी कर्ता आहे' असा तुझा जो समज आहे तो किती व्यर्थ आहे हें तुझ्या ध्यानांत आलेंच असेल. पण हा समज काढून टाक. तूं स्वस्वभावाचा कर्ता आहेस. त्याचेंच कार्य चालूं दे ! पण हें करीत असतां समर्थ व असमर्थ कारणांचा अव्हेर करूं नकोस. या साऱ्या पर निमित्तांचा अनादर करूं नकोस; झिडकारूं नकोस. त्यांतली आसक्ति टाकून दे व त्यांचा योग्य उपयोग करून घे. शरिरावरील ममत्वभाव सोडून त्याचा तुझ्या कार्यासाठीं चांगला उपयोग करून घे. तुझें इच्छित कार्य पूर्ण होण्यास तें साह्यकारीच ठरेल. बाह्य वस्तु तुला कांही घातक नाहीं. त्यांसंबंधीं तुझी जी आसक्ति आहे, ती घातक आहे. परद्रव्याच्या कर्तेपणाची, अहंकाराची वृत्ति घातक आहे. ही वृत्ति नाहींशी कर. ★ ★ ★

— ८४ —

रे ज्ञानवंता !

हा उफाळता समुद्र पहा ! त्याच्या लाटा त्याच्याच छातीवर तांडवनृत्य करीत आहेत. तुला वाटत असेल, कीं वाऱ्यानें त्या लाटा निर्माण झाल्या. पण निश्चयत: तें चूक आहे. व्याप्य व व्यापक या भावांच्या अपेक्षेनें अंत, मध्य वा बाहेर चलनवलन करणें, उसळणें हा समुद्राचा धर्म आहे. कमी जास्त होणें, भरती-ओहोटी होणें या क्रियेचा कर्ता तोच आहे. त्या भावाचा भोक्ताहि समुद्रच आहे.

रे अंतरात्मन् ! तुझी दृष्टि आतां शुद्ध झाली. त्याच दृष्टीनें आत्मा व कर्म यांचं कोडं सोडवीत जा ! शुद्ध व अशुद्ध

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उपादानमात्रांचा तूंच कर्ता व भोक्ता आहेस; पण जाणूनबुजून अशुद्धाची वाट तूं कां धरावीस? शुद्ध मार्गाचा अवलंब करून स्वसंवेद्य अशा निर्विकल्प समाधीचें सुख तूं अनुभवीत जा! जाणूनबुजून अशुद्धाची वाट धरूं नकोस!

★ ★ ★

– ८५ –

व्यवहारनयानें तुझा आत्मा या सर्व पुद्‌गल प्रकारांचा नि त्याच्या सर्व अवस्थांचा कर्ता आहे.

रे ज्ञानवंता, पुरातन कालापासून तूं अज्ञानांत गुरफटला आहेस. या अज्ञानामुळेंच पौद्‌गलिक गोष्टींचा तूं स्वतःस कर्ता समजतोस; पण या गोष्टींचा तूं निमित्तक आहेस. मी या सर्व गोष्टींचें साधन आहे आणि कर्ता नाहीं, हें तूं स्वतः विसरून जातोस. निमित्तालाच कर्ता मानून तूं स्वतः आनंद मानीत आहेस. या सर्व घडामोडींचा कर्ता पुद्‌गल आहे, हें मीं तुला सांगत आलें. उपादान कारण पुद्‌गलच आहे; तूं फक्त साहाय्यक आहेस.

★ ★ ★

– ८६ –

"मी अज्ञानाचा अनुभव घेतों म्हणून ज्ञानाचा कर्ता आहे आणि बाह्य जड गोष्टी निर्माण केल्या आहेत म्हणून त्यांचाहि कर्ता आहे असं तुला वाटतं म्हणून तूं व्यवहारप्रिय झालास.

रे ज्ञानवंता! कोणतेंहि द्रव्य एकदम दोन कार्यें करूं शकत नाहीं. हा सिद्धांत ज्ञानी लोकांनीं व प्रत्यक्ष

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सर्वज्ञांनीं सांगितला आहे, त्यावर विश्वास ठेव. प्रत्यक्ष नित्याच्या अनेक उदाहरणांवरूनहि तुला याची प्रचीति येईल. म्हणून या सर्व गोष्टींचा तूं विचार कर! अन् अज्ञानाच्या प्रवाहाबरोबर वहात जाऊं नकोस. त्या मार्गाचा चुकूनहि विचार करूं नकोस.

रे शुद्धदृष्टि! तूं शुद्ध उपादान असलेल्या निजानंदाचा आस्वाद घेणारा रसिक आहेस. तुझी रुचि चांगलीच असणार. अशा अवस्थेंत जडाचा किंवा पुद्गलाचा आणि रागादि भावांचा आस्वाद तुला कसा आवडेल?

* * *

– ८७ –

तूं शुद्ध ज्ञानाचा कर्ता आहेस. तें ज्ञान तर तुझ्याजवळच आहे. त्याचा सांभाळ दुसरें कोण करणार? त्याचें रक्षण तुलाच करावें- लागणार. अरे! एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचें रक्षण करूं शकत नाहीं.

रे ज्ञानवंता! प्रत्येक वस्तूचं परिणमन स्वतंत्र आहे. त्याचे भेद नि त्याचा विस्तार स्वतंत्र आहे. दोन द्रव्यांचा एक कर्ता कधीं होऊं शकणार नाहीं. एका द्रव्याचे दोन कर्ते होऊं शकत नाहींत. आत्मा व शरीर, कर्म, अकर्म इत्यादि सर्व भिन्न भिन्न आहेत. त्याचे गुणधर्म भिन्न आहेत.

रे ज्ञानवंता! तूं मेरुसारखा अचल आहेस; समुद्रासारखा गंभीर आहेस. सम्यक् ज्ञानाच्या वज्रानें मिथ्यात्वाचे तुकडे तुकडे कर. तुझं उज्ज्वल ज्ञान यांतून तेजाळून बाहेर पडूं दे.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

-८८-

रे ज्ञानवंता ! तुझ्यासमोर असलेला हा आरसा पहा ! त्यापुढें मयूर नृत्य करीत आहे. त्याचं त्या आरशांत प्रतिबिंब पडलं आहे. आतां तें प्रतिबिंब कोणाचं आहे तें सांगशील ? तें मोराचंहि आहे आणि आरशाचंहि आहे. आरशांतलं प्रतिबिंब मयूरासारखं दिसतं म्हणून तें मयूराचं आहे आणि तें आरशांत पडलं आहे म्हणून तें आरशाचें देखील आहे. तूं नीट न्याहाळून पहा ! थोडासा विचार कर. तुला दुसरें एक उदाहरण देतें. हें गोंडस मूल येथें रांगतें आहे पहा ! तें कोणाचें आहे सांग पाहूं ! तें आईचें आहे कां वडिलांचें आहे ? तुझं उत्तर येईल, 'दोघांचें आहे.'

आरशांतील मोर वेगळा आहे. त्याचें तें प्रतिबिंब वाटत असूनहि ते जड आहे. बाहेरचा मोर जिवंत आहे. दोन्ही प्रतिबिंबांचें स्वरूप वेगवेगळें आहे. म्हणूनच कर्मांच्या निमित्तानें जीव विभावरूप होतो, चैतन्याचा हा जो विकार झाला, तो जीवाचा आहे. मिथ्यात्व, कषाय वगैरे सर्व जीवांचे विकार आहेत; परंतु जे पुद्गल मिथ्यात्वादि कर्मरूप परिणमविते ते पुद्गलाचे परमाणू होत.

* * *

-८९-

रे अंतरात्मन् !

मिथ्यात्व, योग, अविरति, अज्ञान हे सर्व अजीवाचे म्हणजे पुद्गलाचे आहेत, याची तुला आतां कल्पना आली आहे आणि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हे भाव जीवाचे आहेत असं जेव्हां म्हटलं जातं तेव्हां तें चैतन्याचें विकृत स्वरूप आहे असं समजावं हें भेदज्ञान तूं नीट ओळख !

रे ज्ञानवंता ! शुद्धात्म्याच्या स्वभावाविरुद्ध जे विपरीत उपयोगात्मक परिणाम होतात तें म्हणजे अज्ञान होय. निर्विकारी नि शुद्ध स्वरूपापासून च्युत झालेले परिणाम म्हणजे अव्रत होय. तिलाच अविरति असं म्हणतात आणि शुद्ध आत्म्यादि द्रव्यांबद्दल विपरीत अभिनिवेश बाळगणें, त्यांविषयीं विपरीत श्रद्धा ठेवणें म्हणजे मिथ्यात्व होय. हे जीवाचे परिणाम जाहेत. ★ ★ ★

– ९० –

रे अंतरात्मन् !

तूं पुन्हा गोंधळल्यासारखा दिसतोस, तूं म्हणतोस, 'मूलतः जीव शुद्ध असतांना तो विकारी केव्हांपासून झाला ?'

रे ज्ञानवंता ! अनादि कालापासून हा जीव विकारी आहे. तो केव्हांपासून विकारी झाला याला निश्चित उत्तर देणें अशक्य आहे. म्हणूनच त्याच्या कालाची गणना 'अनादि अनंत' या शब्दांनीं करावी लागते. हा जीव पूर्वी शुद्ध होता आणि नंतर अशुद्ध झाला असं नाहीं. जीवाचं स्वरूप शुद्ध झालं कीं तो जीव या संसारांत राहणें शक्य नाहीं. तो मुक्तच होतो. पण संसारावस्थेंत असलेला जीव पूर्वीपासूनच अशुद्ध आहे.

खाणींत असलेल्या सुवर्णाप्रमाणें अनादि कालापासून आत्मा कर्मांनीं बद्ध आहे, तेव्हांपासून तो मिथ्यात्वी आहे, अविरती आहे, नि अज्ञानी आहे. अनादि कालापासून तो मोहयुक्त आहे. ★ ★ ★

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– ९१ –

रे बुद्धिवंता ! तूं मूळचा रागादि भावांनीं रहित असा शुद्ध आहेस. ज्ञानावरणादि कर्मरजांनीं रहित असा निरंजन आहेस; परंतु अनादि कालापासून तूं मोहानें नि विकारांनीं युक्त असल्यानें आणि अष्ट कर्मांनीं बद्ध असल्यानें प्रत्येक समयाला मिथ्यात्व, अविरति आणि अज्ञान या तीन उपयोगांचा बनतोस. म्हणून त्या उपयोगांचा तूं कर्ता आहेस; पण द्रव्य कर्मांचा तूं कधीं कर्ता होऊं शकत नाहींस. स्फटिक जर सुवर्णपात्रांत ठेवलें तर तें पिवळें दिसतें. हिरव्या किंवा नीलपात्रांत ठेवलें तर तें हरित किंवा नील दिसेल. मेघांतून पृथ्वीवर पडणारं पाणी शुद्ध असतं; पण तें समुद्रांत पडलं तर खारट होतं, चिखलांत पडलं तर गढूळ दिसतं, शेवाळांत पडलं तर हिरवं दिसतं, गंगेच्या प्रवाहांत पडलं तर पवित्र बनतं. त्याचप्रमाणें जर क्रोध करूं लागलास तर तूं क्रोधाचा कर्ता किंवा क्रोधी म्हणविला जाशील. अभिमान करूं लागलास कीं, मानी म्हणून ओळखला जाशील.

* * *

– ९२ –

ज्यावेळीं जसे तुझे भाव होतील, त्यावेळीं त्या भावांचा तूं कर्ता आहेस. एकदां तुझे विशिष्ट भाव झाले कीं, तुझ्या आत्म्याच्या भोंवती स्थित असलेले अनंत पुद्गल परमाणु कर्म-रूप होण्यासाठीं तयार असतात. त्या अपरिपक्व कर्मवर्गणास विस्रसोपचय असें म्हणतात. आत्म्याचे रागादिक भाव झाले कीं, तत्काळ त्या विस्रसोपचयांचे त्या त्या कर्मांत रूपांतर होते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हें कार्य निसर्गनियमानुसार होतें म्हणून तें नैसर्गिक आहे. वसंतऋतु आला, कीं आपोआप झाडांना पालवी फुटते. पर्जन्य-वृष्टि झाली कीं वनराजी टवटवीत होते, आणि कांही दिवसांनीं पुष्पमंडित होते. सूर्य उगवला कीं, पृथ्वी नि पाणी ही दोन्ही तप्त होत असतात. औषधाची मात्रा दिली कीं रोग्याचें परिवर्तन होतें. विजेचें बटन दाबलें कीं दिवा प्रकाशतो. त्याप्रमाणेंच जीवाचे शुभाशुभ परिणाम झाले कीं विस्रसोपचयाचे त्या त्या भावाप्रमाणें कर्मांत रूपांतर होत असतें.

रे बुद्धिवंता ! तुझ्या बुद्धीचा उपयोग चेतनेचें कोडें उघडण्यासाठीं कर.

* * *

– ९३ –

रे बुद्धिवंता ! मी सुखी आहे असं म्हणणं जितकं असत्य तितकंच मी दुःखी आहे म्हणणंहि असत्य आहे. मी रंक आहे असं म्हणणं जितक खोटं तितकंच मी राव आहे असं म्हणणंहि खोटं आहे. हें घर, ही शेती, ही संपत्ति माझी आहे आणि नाहीं असं म्हणणंहि व्यर्थ आहे. हे माझे मित्र, बंधू, आप्त आणि माता-पिता आहेत हें म्हणणं जसं अभूतार्थ आहे तसंच हे माझे शत्रू, वैरी आहेत आणि मी निराधार आहे असं म्हणणंहि अभूतार्थ आहे.

रे बुद्धिवंता ! ही तुझी बुद्धि तूं सोड. पदार्थांचें सम्यक् स्वरूप तूं जाण !

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

-९४-

रे ज्ञानवंता !

पांडवांच्या निर्वाणाची कथा तुला ठाऊक आहे का? पांडव आपल्या अंतिम-क्षणीं शत्रुंजय पर्वतावर कार्योत्सर्ग ध्यान धरून बसले होते. त्याच वेळीं दुर्योधनाच्या वंशांतील एक पुरुष तेथें आला आणि त्याला पूर्ववैराची स्मृति येऊन फारच क्रोध आला. त्या युद्धावस्थेंतच त्यानें पांडवांवर अनेक उपसर्ग केले; पण ध्यानमग्नावस्थेंत असणाऱ्या पांडवांवर त्याचा कांहीच परिणाम झाला नाहीं. हें पाहून त्यानें तप्त लोखंडाचे मुकुट आणि सळचांचीं कडीं त्यांच्या डोक्यावर नि गळचांत अडकविलीं. पण शरीर हें कर्मोपाधींचें कारण समजून आत्मध्यानांत लीन असणाऱ्या पांडवांनीं थोडीहि चलविचल दर्शविली नाहीं. ते जळून भस्मसात् झाले. पण त्यांचे आत्मे? ते तर अमर बनून राहिले. त्यांनीं सिद्धावस्थेची वाट धरली. पण भीम, अर्जुन आणि धर्मराज़ यांना त्या उपसर्गांचा त्रास होत असेल – ह्या असहाय्य वेदना ते कशा सहन करतील – याबद्दल हळहळ व्यक्त करणारे नकुल आणि सहदेव मात्र मोक्षाला न जातां स्वर्गांत गेले. मुक्तावस्था मिळविण्याच्या अवस्थेंत पोहोंचले असतांहि भावांविषयीं थोडासा मोह दाखविल्यामुळें त्यांना हें फळ मिळालें.

रे अंतरात्मन्! सोड हा मोह! त्याच्या जाळचांत पुन्हा अडकूं नकोस.

★ ★ ★

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– ९५ –

तुझ्या विकारांचा तूं कर्ता आहेस. ज्या विषयाकडे तूं तुझा उपयोग लावशील त्या विषयाचा तूं कर्ता आहेस. तुझ्या मनाविरुद्ध एखादी घटना घडल्यास तूं क्रोधानें लाल होशील. 'माझं डोकं तापलं आहे' असं तूं म्हणतोस. दुःखद बातमीनें तूं दुःखी होतोस आणि सुखद बातमीनें सुखी होतोस. रंगभूमीवरील दुःखद दृश्यांनीं तूं दुःखी होतोस आणि सुखद दृश्यांनीं आनंद मानतोस. याप्रमाणें सुख दुःखादि विकारांचा तूं कर्ता आहेस.

* * *

– ९६ –

रे ज्ञानवंता ! अध्यात्माच्या विशुद्ध मार्गानें तूं जाऊ इच्छितोस ! पण कृति मात्र त्याच्या उलट घडते. जर तूं असाच वागूं लागलास तर इच्छा आणि कृति यांचा मेळ जमणें कधीं शक्य होणार नाहीं. तूं व्यवहार साधूं इच्छितोस. व्यवहारासाठीं मनाविरुद्ध कांही गोष्टी कराव्यात असं तुला वाटतं. व्यवहाराच्या दृष्टीनें हें ठीक आहे. पण व्यवहार सांभाळतांना दृष्टि परमार्थाकडे असायला हवी. ती नसेल तर तुझ्या जन्माचें सार्थक कसें होईल ? घार आकाशांत अति उंच उडत असते ! एवढ्या अंतरावर असूनहि नेहमीं तिचं लक्ष खालीं झाडावर असलेल्या घरट्यांतील पिलांकडे असतें.

व्यवहारांत रमला असतांनाहि जर तूं परमार्थाकडे लक्ष ठेवलंस तर व्यवहारहि साधेल आणि परमार्थहि.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– ९७ –

रे ज्ञानवंता ! पारसमणीच्या स्पर्शानं लोखंडाचंहि सोनं होतं. सम्यक् ज्ञानाच्या स्पर्शानं मिथ्यात्वाचं सम्यक्त्वांत रूपांतर होतं ! पण जर अज्ञानाचा स्पर्श झाला तर सम्यक्त्वाचं मिथ्यात्वांत रूपांतर व्हावयास वेळ लागणार नाहीं. या अज्ञानाच्या स्पर्शामुळेंच तू स्वतःस परपदार्थांचा कर्ता समजतोस. मात्र या अज्ञानाचा जर उच्छेद झाला तर तूं स्वतःस परपदार्थांचा आणि परभावांचा कर्ता समजणार नाहींस. * * *

– ९८ –

तूं मोठा व्यवहारप्रिय आहेस. तुझ्या व्यवहारचातुर्याची सर्व लोक स्तुति करतात. ही तुझी कीर्ति साऱ्या दिगंतांत पसरली आहे. तुझा गोतावळाहि फारच मोठा आहे. तुझ्या कीर्तीस कारणीभूत ठरणारी ही तुझी सुगृहिणी. तुझ्या यशांत तिचा फारच मोठा वाटा आहे. तुझं कौटुंबिक नि मानसिक स्वास्थ्य राखण्याचं कार्य तिनंच केलं आहे. हें स्वास्थ्य तुला लाभलं नसतं तर तूं व्यवहारांत यशस्वी ठरला नसतास. हीं तुझीं सिंहासारखी पराक्रमी मुलं ! तुझ्याप्रमाणें तींहि पराक्रमी आहेत. चंदनाप्रमाणें सुवास पसरविणाऱ्या सौम्य नि शांत स्वभावाच्या ह्या तुझ्या मुली, अंगणांत खेळणारे हे तुझे पणतु-नातु, हे तुझे मित्र नि हितचिंतक – इतका मोठा गोतावळा आहे तुझा ! तूं मोठा भाग्यवान् ठरलास खरा ! ही तुझी टोलेजंग हवेली, हा लवाजमा, ह्या मोटारी पाहिल्यानंतर तुझ्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व्यावहारिक यशाची सर्वांनाच खात्री पटते, ह्या तुझ्या यशांत अधिक भर पडावी म्हणून तूं रात्रंदिवस झटतोस ! ह्या सर्व गोष्टींचा तुला भारी अभिमान !

रे व्यवहारप्रिय ! जगांत तुझ्यासारखा भाग्यवान् तूंच आहेस काय ? हें वैभव भोगणारा तूंच एकमात्र आहेस काय? कित्येकांच्या वाट्याला हें वैभव आहे. पण हें खरं वैभव नव्हे.

रे अंतरात्मन् ! निष्कलंक ज्ञान आणि चारित्र्य हेंच तुझं वैभव ! त्यांतच तूं रममाण हो.

★ ★ ★

–९९–

रे ज्ञानवंता !

आत्मा पुद्गलादि परद्रव्यांचा कर्ता कसा होईल ? आत्म्याच्या ठिकाणीं परद्रव्याचं कर्तृत्व मानलं तर तो द्रव्याशीं तन्मय व्हावयास पाहिजे; पण असं झालेलं तर कधीं दिसत नाहीं. असं जर झालं तर चेतन द्रव्याचा नाश होईल किंवा जडाचं अस्तित्व तरी नष्ट पावेल. एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यस्वरूपाचं होत नाहीं. उपादानरूपाचें एक द्रव्य अन्य द्रव्याचा कर्ता होत नाहीं. एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यस्वरूपाचं होणं हें पूर्वी कधीं घडलं नाहीं, आतां घडत नाहीं, आणि पुढेंहि घडणार नाहीं.

★ ★ ★

–१००–

रे लोकप्रिय ! जीवाचे योग आणि उपयोग हे दोन प्रकार होतात. योग म्हणजे मन, वचन आणि कायेची प्रवृत्ति. मनांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शुभ किंवा अशुभ विचार आले, कीं तो मनोयोग झाला. मनोयोग म्हणजे मनाचें हलनचलन. चांगली किंवा वाईट वाणी मुखावाटें बाहेर पडली, कीं तो वचनयोग झाला; आणि चांगल्या किंवा वाईट कृति शरिराकडून घडल्या कीं तो काययोग झाला. अंतरंगांत प्रत्येक समयासमयाला उठणारे विकल्प म्हणजे उपयोग होत. हे विकल्प अनित्य आहेत. प्रत्येक समयाला ते उत्पन्न होतात, आणि तसेच विलीनहि होतात. समुद्रांत वाऱ्याच्या स्पर्शानें लाटा निर्माण होतात आणि त्या विलीनहि पावतात. अर्थात् व्यवहारत: हे जीवाचे भाव आहेत. या भावांच्या निमित्तानें जीवाचें परद्रव्यामध्यें परिणमन होतें. त्यामुळें जीव हा घटादिकांचा, घराचा, मुलांचा, क्रोधादिक अहंकारांचा व ज्ञानावरणादि कर्मांचा आणि शरीररूप कर्मांचा कर्ता ठरतो. व्यवहारानें ही गोष्ट सत्य आहे. कारण व्यवहारांत प्रत्यक्ष तसं दिसतं. या कर्तृत्वामुळें तूं व्यवहारांत लोकप्रिय झालेला आहेस.

रे आत्मन् ! द्रव्य दृष्टीनें एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचा कर्ता होऊं शकत नाहीं. पर्याय दृष्टीनें एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याला निमित्त होऊं शकतें. हा निसर्गाचा सिद्धांत भरत चक्रवर्ती जाणत होता. म्हणूनच आपल्या निर्मलानुभूतीचा विशुद्ध रसास्वाद तो घेऊं शकला.

रे अंतरात्मन् ! कर्में करीत असतांनाच त्यांतून मुक्त होण्याच्या उपायांचा तूं विचार कर. असं घडलं तर तुझ्या आत्म्याच्या विकासाकरितां तुला निराळा प्रयत्न करण्याची आवश्यकता भासणार नाहीं.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

-१०१-

रे ज्ञानवंता ! तूं आकाशांतील ढगांकडे आणि त्यांच्या परिवर्तनाकडे कुतूहलानें पाहतोस ! पण असाच कुतुहलजनक खेळ तुझ्यांतहि चाललेला आहे. तो मात्र तूं पहात नाहींस. तुझ्यांत नि तुझ्याजवळ असलेल्या ज्ञानावरणादि कर्मांकडे पहा. त्या कर्मांमध्यें पुद्गल द्रव्यांचे नानाविध रंग ओतले आहेत. आकाशांतील मेघांत दिसणारे रंग त्या मानानें कांहीच नव्हेत. पुद्गल द्रव्यांचें कर्मरूपानें होणारें परिमणन तूं जर पाहशील तर आश्चर्यानें थक्क होशील. शांत स्वभावाचा भद्र पुरुष जर या कर्मांच्या तडाख्यांत सांपडला तर एकदम रुद्रावतार धारण करतो; दानी जीव लोभी होतो; दयावान मनुष्य निर्दयी आणि निष्ठुर होतो.

या कर्मांच्या सान्निध्यानें तूं देखील जगाच्या रंगभूमीवर रंगीबेरंगीं सोंगें घेऊन वावरतो आहेस. पण त्यांतच तूं फसूं नकोस. कारण तूं कांही अष्टकर्मांचा कर्ता नाहींस. तुला पकडण्यासाठीं पसरलेलें तें कर्मांचें जाळें तूं नीट ओळख. त्याचे सर्व तंतू तोडून तूं त्यांतून मुक्त हो.

* * *

-१०२-

शुभाशुभ भावनांचा तूं कर्ता आहेस. पण द्रव्य कर्मांचा मात्र तूं कर्ता होऊं शकत नाहींस. व्यवहारांत असद्‌भूत व्यवहारनयानें तूं द्रव्य कर्मांचा कर्ता मानला जातोस. व्यवहार सुरळीत चालण्यासाठीं व व्यवहार ओळखण्यासाठीं सर्व नयांचा उपयोग

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करावयाचा असतो. नैगम, संग्रह, व्यवहार, ऋजुसूत्र, शब्द, समाभिरूढ व एवंभूत हे सात नय व्यवहार सुरळीत चालण्या-साठीं आणि वस्तूचं स्वरूप समजावून घेण्यासाठीं आहेत. ज्याप्रमाणें सप्त स्वरांनीं सुरेल संगीत निर्माण होतं, त्याचप्रमाणें वरील सात नयांनीं जगांतील पदार्थांचें खरें ज्ञान होतें. सतारींत सप्त स्वर असतात. त्यांतली एक तार जरी बरोबर नसली तरी बेसूर निर्माण होतो. सप्त स्वरांतला एक सूर जरी बदसूर झाला तरी संगीतांत विसंगति निर्माण होते.

ही विसंगति योग्य विचारानें टाळून तूं सुखी हो ! * * *

– १०३ –

तूं ज्ञानी झालास ! एका द्रव्याचा गुण दुसऱ्या द्रव्याचा होऊं शकत नाहीं. मोराचं नृत्य नि त्याचं आरवणं ह्या गोष्टी प्रयत्न करूनहि कोंबड्यास करतां येतील काय ? किंवा पोपटाचं बोलणं मोरास जमेल का ? माणसाचा पुतळा बनविला तर तो माणसासारखा बोलेल का ? त्यांत चैतन्य येईल का ? त्यांत ज्ञान शिरेल का ?

रे मूढ, वस्तूच्या मूळ स्वभावाप्रत जा. त्याचा स्वभाव ओळख; म्हणजे तुला कळेल, कीं एका द्रव्याचं दुसऱ्या द्रव्यांत संक्रमण होत नाहीं. जर संक्रमण होत नाहीं तर तत्स्वरूपीं तें द्रव्य कसं बनेल ? तुला हें कसं कळणार ? तूं ज्ञानी झालास म्हणजे याची तुला पूर्ण कल्पना येईल. म्हणून तूं प्रथम ज्ञानी हो.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– १०४ –

रे ज्ञानवंता ! उपादान आणि निमित्त हीं दोन कारणं तुला अजून नीट समजलीं नाहींत. या बाबतींत चाललेला तुझा गोंधळ कांही संपुष्टांत येत नाहीं. मडकें तयार होण्यास माती हें उपादान-कारण आहे, आणि कुंभार निमित्त-कारण आहे. कुंभाराशिवाय घट होत नाहीं, ही गोष्ट खरी आहे; पण कुंभार खऱ्या अर्थानें घटाचा कर्ता होऊं शकत नाहीं. कारण घट तयार झाल्यानंतर कुंभार जगला काय किंवा मेला काय, घट आहे तसाच राहतो; पण त्यांतली मातीच गेली कीं, घट हा घट म्हणून राहणार नाहीं; म्हणून मातींतच घट होण्याचा गुणधर्म आहे. तोच गुण हें घट बनण्याचें प्रमुख कारण. कुंभार हें कारण गौण आहे. कुंभार खऱ्या अर्थानें घट निर्माता नाहीं. कारण तो चेतन आहे. मडकें अचेतन आहे. चेतन अचेतन कसें होईल ? एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यस्वरूपाचें होत नाहीं. तसेंच द्रव्यकर्मांचा कर्ता जीव होऊं शकत नाहीं. जीव द्रव्यकर्में बदलूं शकत नाहीं. द्रव्यांत किंवा त्याच्या गुणांत थोडा देखील फरक करूं शकत नाहीं, म्हणूनच तो त्याचा कर्ता होऊं शकत नाहीं.

रे ज्ञानवंता ! ज्ञानी सदैव असाच विचार करतो.

★ ★ ★

– १०५ –

रे अंतरात्मन् !

ज्ञानावरणादि आठ कर्में तुझ्याशीं बद्ध होतात याला कारण तुझे रागादि भाव हेच होत. असं असतां जीवानें हें कर्मं बांधलं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असं जें म्हटलं जातं तो उपचार होय. निमित्त-नैमित्तिक आणि कार्यकारण-भाव तुला समजत नाहींत, म्हणून तूं अज्ञानानें कारणालाच कार्य म्हणून संबोधितोस.

रे वेडचा ! निमित्त-नैमित्तिक व उपादान-निमित्त यांचें ज्ञान तूं करून घे निमित्ताचा संबंधहि अज्ञानपणाचा आहे. 'मी हें सर्व करीत आहे, कर्म बंधन आहे, कर्म करीत आहे.' असं म्हणणं अज्ञानपणाचं किंवा निर्विकल्प-भ्रष्टतेचं द्योतक होय. 'हें सर्व उपचारानें म्हटलं जातं.' असंच ज्ञानी मनुष्य समजतो.

* * *

– १०६ –

रे अंतरात्मन् ! जगांतील विपरीत व्यवहारांचीं किती उदाहरणं द्यायचीं ! सैन्य युद्ध करीत असतं. सैन्यानं हल्ला चढविलेला असतो. पण व्यवहारांत काय म्हटलं जातं ? 'अमुक राजानं युद्ध सुरू केलं आहे; अमुक देशानें स्वारी केली आहे.' अन् हें सर्व खरं मानून लोकव्यवहार चालतो. यांत सत्य अभावानें आहे याची कोणाला कल्पनाहि येत नाहीं. ज्ञानावरणादि कर्में आणि शरिरादि नोकर्में यांचा कर्ता जीव नसतांनाहि तो कर्ता म्हणविला जातो हा व्यवहारहि अशाच प्रकारचा आहे. कर्म आणि नोकर्म यांचा कर्ता पुद्गल आहे.

* * *

– १०७ –

भरत चक्रवर्तीच्या ठिकाणीं व्यवहार आणि निश्चय यांचा मनोहर संगम झाला होता. तो आत्मज्ञानाच्या आनंदाचं सुख

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनुभवीत असला तरी पूर्ण व्यवहारी देखील होता. म्हणून तो नयाचा खरा ज्ञाता होता. व्यवहार आणि निश्चय यांतला फरक समजल्यानं त्याच्या वागण्यांत आणि संसार करण्यांत विसंगति, विरोध किंवा आसक्ति आढळली नाहीं. लोक त्याला पृथ्वीचा अधिपति मानीत; साऱ्या साम्राज्याचा तो भोक्ता होता, असं समजत; पण लोकांच्या म्हणण्यांतील तथ्यांश तो जाणत होता. म्हणूनच षट्खंडांचा अधिपति असूनहि तो निर्विकारी नि निरासक्त राहिला षट्खंडांतील सर्व परिग्रह त्याच्या मालकीचा असूनहि तो अपरिग्रही मानला गेला. बाह्यतः हा वदतोव्याघात वाटला तरी वस्तुतः तो तसा नाहीं. कारण वासनेलाच परिग्रह म्हटलं आहे वासनेचा तर त्याच्या ठिकाणी पूर्णपणें अभाव होता. म्हणूनच पाण्यांत राहूनहि त्याचा संस्पर्श टाळणाऱ्या कमलाप्रमाणें संसारांत राहूनहि तो त्यापासून अलिप्त होता.

रे ज्ञानवंता! आतां तुला कळलं का मी काय म्हणतें तें? अज्ञानी स्वतःस परद्रव्याचा कर्ता मानतो. ज्ञानी मात्र या बाह्य गोष्टींचा कर्ता किंवा निर्माता म्हणून स्वतःस म्हणवून घेत नाहीं. तसंच तो त्यांचा भोक्ताहि म्हणवून घेत नाहीं. * * *

– १०८ –

रे व्यवहारकुशल !

जगांत कांही राजे होऊन गेले कीं ज्यांची कारकीर्द भाग्यशाली ठरली. त्यामुळें त्यांचा काळ सुवर्णकाळ ठरला गेला. याचं सारं श्रेय राजाला दिलं जातं. या उलट राज्यांत सतत कांही वर्षें दुष्काळच पडला आणि त्यामुळें राज्यांत हलाखीची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्थिति निर्माण झाली कीं त्याचा दोषहि राजालाच दिला जातो. सुस्थिति आणि दुःस्थिति यांचं कर्तृत्व राजाकडेच दिलं जातं. त्याचप्रमाणं जीव देखील पुद्‌गल द्रव्यांच्या गुणांचा कर्ता म्हटला जातो.

ज्ञानी ज्ञानालाच कर्ता मानतो. अज्ञानी परद्रव्याला कर्ता मानतो. हा फरक भरत चक्रवर्ती नि अज्ञानी मनुष्य यांच्या उदाहरणांवरून लक्षांत ठेव. * * *

— १०९ —

कर्मबंधाचीं मुख्य कारणें चार आहेत. मिथ्यात्व, अविरति, कषाय, आणि योग हीं तीं चार कारणें होत. यांवरच सर्व कर्मं अधिष्ठित आहेत. कर्ममंदिराचे हे चार आधारस्तंभ आहेत, असं म्हटलं तरी चालेल. कोणत्याहि मंदिराला चार आधारस्तंभ असतातच. मिथ्यात्व, अविरति, कषाय आणि योग यांच्याद्वारेंच कर्माचं कार्य सतत चालूं असतं. मिथ्यात्वामुळेंच कोणत्याहि कार्यांत तुला सम्यक् दृष्टि लाभत नाहीं. अविरतीमुळें तूं अनाचारी बनतोस; कषायानें क्रोधी बनतोस, अभिमान बाळगतोस, मायाचार करतोस आणि लोभ बाळगतोस. यामुळें तयार झालेली कार्माण वर्गणा मनोयोग, वचनयोग आणि काययोग यामुळें कर्मरूप होऊन तुझ्याकडे येते. आणि तुझ्या आत्म्याशीं बद्ध होते. यानंतरच संसारांतील न संपणाऱ्या सुखदुःखांची परिपाटी चालूं होते.

अज्ञानी आपल्या उपभोगांत या कर्मांच्या उदयाचा रसास्वाद घेतो आणि मिथ्यात्व, अविरति, कषाय आणि योग यांच्याद्वारें कर्म बांधतो. * * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– ११० –

उपयोग हें तुझं लक्षण ! तुझ्या जीवनसागरावर निर्माण होणाऱ्या क्रोध, मान, माया आणि लोभ ह्या लाटा होत. सागरांत लाटा निर्माण होतात म्हणून लाटांनाच कोणी समुद्र मानला आहे का ? कर्मांमुळं क्रोधादिक भाव निर्माण होतात म्हणून त्यांना आत्म्याचे गुण कसें मानतां येईल ? उपयोग आणि क्रोधादिक भाव यांचा अविनाशाभावी संबंध कसा मानतां येईल ? पाणी आणि चिखल तळ्यांत एकत्र असतात म्हणून पाणी आणि माती यांना एकरूप मानतां येईल का ? पावसाळ्यांत सारे ढगच आकाश व्यापून टाकतात, म्हणून ढग आणि आकाश एकच का ? हिरवीगार पानं आणि शुष्क पानं यांत फरक नाहीं का ? सुवासिक फूल नि कोमजलेलं फूल एकच का ? रत्न आणि कांच ही एक कशी होतील ?

कुसुमकोमल 'सुकुमार मुनीं'ची कथा तुला ठाऊक आहेच. दिव्याचा प्रकाशहि त्याला सहन होत नसे म्हणून रत्नाच्या प्रकाशांत तो वावरणार ! फुलापेक्षांहि तो सुकुमार ! पण आयुष्याची रेषा तीन दिवसांनीं तुटणार आहे हें ध्यानांत येतांच आत्मज्ञानाच्या शोधार्थ हा श्रेष्ठीपुत्र सुकुमार रानांत निघाला. पण राजवाड्यांत काय किंवा वनांत काय कर्म हें कोणालाच सुटलेलें नसतें. पूर्वायुष्यांत वैरत्व पत्करणाऱ्या कोल्हीणीनें ध्यानस्थ असलेल्या सुकुमाराचा देह खाऊन टाकला. पण अशा कठीण प्रसंगींहि वैरभाव मनांत न धरतां सुकुमार कार्योत्सर्गांत रममाण होता. तो आपल्या चैतन्याच्या उपयोगांतच रममाण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होता. कारण क्रोधादिक भावांचें जड स्वरूप त्याला ठाऊक होतें. ज्ञानी माणसें याप्रमाणेंच चेतन व जड यांतील फरक जाणत असतात. अन् आपल्या निर्विकल्प स्वसंवेदन उपयोगांत – ज्ञानानंदांत मग्न होतात.

* * *

– १११ –

रे अंतरात्मन् !

क्रोध हा भाव तुझा नाहीं याची तुला आतां कल्पना आली. तसंच माया, लोभ इ. जड भावहि तुझे नाहींत, वा या भावांमुळें निर्माण होणारीं कर्मेंहि तुझीं नाहींत, हें तुला पटलं. मग कर्मांमुळें (नामकर्मानं) निर्माण झालेलं शरीरच तूं आपलं कां मानावंस हेंच मला कळत नाहीं. तसंच बाह्य चेतन आणि अचेतन पदार्थांशींहि तुझा कसलाच संबंध नाहीं. सागरांत योगायोगानं दोन लाकडं एकत्र यावींत आणि तीं पुन्हा अलग व्हावींत त्याप्रमाणं एका जीवाचा दुसऱ्या जीवाशीं संबंध येतो; आणि जसा येतो तसाच तो सुटतोहि ! म्हणून योगायोगानें तुझ्या संगतींत आलेले हे सर्व बाह्य पदार्थहि तुझे नाहींत याची तूं खात्री बाळग !

* * *

– ११२ –

ज्ञानवंता !

आतां तूं खरा ज्ञानी झालास. ज्ञानी मनुष्य उथळ स्वभावाचा नसतो, हें तुला नव्यानं सांगायला हवें का ? खळबळरहित प्रशांत सागरासारखा तो नेहमीं शांत असतो. त्याच्यांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चलबिचल निर्माण होत नाहीं वाऱ्याच्या झोतासरशीं शांत सागर हलावा, त्याप्रमाणें कामक्रोधादि विकारांनीं मनुष्य चलायमान होतो. इंद्रियांना भुलविणारे पदार्थ जगांत काय कमी आहेत ?

तूं खरा ज्ञानी हो. वाऱ्याचा स्पर्श जसा अचानक जाणवतो तसंच तुझं मनहि तुला नकळत मोहांत फसवेल. तें तूं ताब्यांत ठेव त्यासाठीं उपाय म्हणजे मोहादि विकार काढून टाकणें हाच होय. हे क्रोधादि विकार तुझे नसून तुझं लक्षण उपयोगात्मक म्हणजे चेतनात्मक आहे. चेतनेंतच तूं रत रहा.

* * *

– ११३ –

जीव पुद्गलाशीं बद्ध होतांच संसाराचा न संपणारा प्रवास सुरूं होतो. कर्माच्या नाजूक धाग्यांनीं उभयतां बद्ध होतात. अनेक कर्मांच्या अखंड परिभ्रमणानें देखील त्यांना बांधणारा बंध तुटत नसल्यानें जीवाची संसारयात्रा अखंड चालूच राहते ! पुद्गलाच्या संसर्गानें क्रोधादि विकार निर्माण होतात. विकारांनीं कर्मबंध होतो. कर्मबंधानें शरीर नि इंद्रिय प्राप्त होतात. त्यामुळें विकारांची निर्मिति होते. याप्रमाणें संसारचक्र अखंडपणें चालूं रहातें. तसेंच पुद्गलाचें आहे. पुद्गलाच्या अणु-परमाणूंचें कर्मरूप परिणमन होतें. हा बदल होणें पुद्गलाचा स्वभाव आहे. कर्मरूपांनीं जीवाशीं तो नैसर्गिक रीतया बांधला जातो.

ज्ञानवंता ! तुझं ज्ञान सर्व पदार्थांचं स्वरूप जाणण्यांत खर्च कर. त्या सर्व पदार्थांविषयीं तुझी दृष्टि सम्यक् होऊं दे !

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ती विकृत होणार नाहीं याची खबरदारी घे. त्यांतच तुझ्या यशाचा मार्ग लपला आहे. रात्रीच्या गर्भांत उद्यांचा उषःकाल असावा त्याप्रमाणें सम्यक् दृष्टींत उन्नत जीवनाचा यशोमार्ग आहे.

* * *

– ११४ –

वाऱ्याच्या आवर्तांत सांपडलेला पाचोळा त्याच्या वलयांतच उडत रहावा, त्याप्रमाणें अज्ञानाच्या वलयांत तूं गुरफटल्यानं सतत चुकीचेच विचार तुझ्या डोक्यांत येतात. त्यामुळें कोणत्याहि गोष्टीचा घेतलेला निर्णय खरा नसतो. संभ्रम झालेला मनुष्य ज्याप्रमाणें वागतो, त्याप्रमाणें तूं वागत आहेस.

बुद्धिवंता ! पुद्गल द्रव्य सर्वथा नित्य नि अपरिणामी मानलं तर संसाराचा कारभारच आटोपला. तूं मिथ्याज्ञानी बनूं नकोस, सत्य दृष्टीनं साऱ्या वस्तूंचें निरीक्षण कर.

* * *

– ११५ –

'जीव पुद्गलांत बदल घडवून आणतो.' याची अज्ञानामुळें तुला खात्री पटली आहे. कांही लोकांच्या अशा प्रचाराला बळी पडून तूंहि त्याचप्रमाणें बरळूं लागला आहेस. व्यवहारांतल्या उदाहरणांनीं तुझ्या मनाला बळकटी आली आहे. 'मी घर बांधलें, सरकारनं धरण बांधलं, मी किल्ला जमीनदोस्त केला, मी पुत्राला जन्म दिला.' इत्यादि उदाहरणं तुझ्या मनाला बळकटी आणतात यांत शंका नाहीं. पुद्गलांत उलथापालथ करण्याचं कार्य जीव करतो असं तुझं मत आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जरा विचार कर. प्रत्येक द्रव्यांत परिणमन होतें ही गोष्ट खरी आहे. पण हें परिणमन एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचं करूं शकत नाहीं. ज्या त्या द्रव्यांत बदल आपोआपच होतो. तूं थोडासा विचार कर म्हणजे तुलाहि याची स्पष्ट कल्पना येईल. आधीं तूं सूज्ञ हो ! नंतरच तुला यथार्थ ज्ञान येईल.

* * *

– ११६ –

पुद्गल द्रव्यांत परिणमन होतें तें त्या द्रव्यांतील परिणमनशील शक्तीनें; पुद्गलापासून कर्म बनण्याची शक्ति पुद्गलांतच आहे. जीवाच्या आसक्तीमुळें तें कर्म जीवाशीं बांधलं जातं एवढंच ! जें सधन राष्ट्र स्वतःच आपल्या देशांतील योजना पार पाडण्यास समर्थ आहे तें दुसऱ्या राष्ट्राच्या मदतींची अपेक्षा करील काय ? पुद्गलांत परिणमन शक्ति अस्तित्वांत असतांना त्यांत दुसऱ्या द्रव्यानं बदल घडवून आणण्याचं कांही एक कारण नाहीं. बदल ज्या त्या द्रव्यामुळेंच होतो. इतर द्रव्यें सहाय्यभूत होऊं शकतील.

रे ज्ञानवंता ! वस्तूंत अनेक शक्ति आहेत. त्या त्या द्रव्यांतील शक्तीचं कार्य जाणून घे. तिचा बोध करून घे. त्या शक्तीची मर्यादा अफाट नि विशाल आहे. तुझ्याजवळील ज्ञानाचा उपयोग तुझ्या शक्तीचं स्वरूप जाणून घेण्यासाठीं कर; तुझी दृष्टि तीक्ष्ण नि तुझं पाहणं सूक्ष्म असूं दे.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– ११७ –

तूं विचारी आहेस. पुद्गल द्रव्याचा तूं साधक-बाधक विचार केला आहेस, त्यासंबंधीं तुझ्या साऱ्या शंका फिटल्या आहेत. तूं आतां, 'पुद्गल द्रव्यांत परिणमनशील शक्ति आहे; त्यांच्यांत बदल होतो, तें द्रव्य कर्मरूप बनतं, ज्ञानावरणादि आठ कर्मं नि शरिरादि नोकर्मं हीं पुद्गल द्रव्याचींच निरनिराळीं स्वरूपं आहेत,' या निर्णयापर्यंत येऊन पोहोंचला आहेस. हीं स्वरूपं होण्याकरितां पुद्गल इतर कोणत्याच द्रव्याचं सहाय्य घेत नाहीं. हेंहि तुला कळून चुकलं आहे. परिणमन होण्याची शक्ति ज्या त्या द्रव्यांतच असते. कलश, कुंडल, कपडा, सळई, कपाट हीं सर्व पुद्गल द्रव्येंच आहेत. माती, सोनं, कापड, लोखंड नि लांकूड यांच्या आकारांत बदल करून वरील वस्तु बनल्या आहेत. निर्माण झालेल्या वस्तु नि निर्मितीस कारणीभूत होणाऱ्या वस्तु ह्या पुद्गल आहेत. यावरून पुद्गलामध्यें बदल घडवून आणण्याची शक्ति पुद्गलांतच आहे ही गोष्ट स्पष्ट होईल. जीव वरील बदल घडवून आणण्यास केवळ कारणीभूत ठरला आहे.

रे विचारवंता! पुद्गलाच्या परिणमनशील शक्तीविषयीं असलेला तुझा संशय आतां फिटला ना?

* * *

– ११८ –

पुद्गलाविषयींचा तुझा संशय फिटला याबद्दल आनंद मानण्याच्या स्थितींत असतां जीवाविषयीं तूं संशय घेतल्यानं त्या आनंदांत विरजण पडलं! जीवाच्या परिणमनशीलत्वाविषयीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तुला आतां संशय आला आहे. माणसाची पारख त्याच्या मित्रा-वरून करतां येते असं म्हणतात. कार्याची बरीच कल्पना कारणांवरून होऊं शकते असंहि म्हणतात. ज्याअर्थी तुझ्या मनांत संशयाचं भूत पुन्हा पुन्हा जाग होतं त्याअर्थी तूं संशयानं पछाड-लेल्या लोकांच्या सहवासांत रहात असशील अशी शंका येते, त्यामुळंच संशयाचं भूत पुन्हा पुन्हा तुझ्या मानगुटीवर स्वार होतं.

'आत्मा नित्य व अपरिणामी म्हणजे न बदलणारा आहे.' आत्म्याच्या या स्वरूपाबद्दल तुझा दृढ विश्वास झाला आहे.

दगडानें बांधलेला भोपळा पाण्याच्या तळाशीं असतां तो स्वतंत्र आहे असं म्हणण्यांत काय अर्थ आहे? वाळलेला भोपळा पाण्यावर न तरंगतां तळाशीं असतो असं विचित्र मत प्रतिपादन करण्यांत काय अर्थ आहे? आत्मा परिणमनशील असल्यानंच तो पुद्‌गलाशीं म्हणजे पर्यायानं कर्मांशीं बद्ध झाला. त्यामुळंच संसार निर्माण झाला. संसारांतला प्रत्येक जीव कर्मबद्ध आहे; अन् म्हणूनच तो संसारांत आहे. त्याचं परिणमनशीलत्व मानलें नाहीं तर जग किंवा संसार न मानण्यासारखं आहे. आणि प्रत्यक्ष उघडया डोळयांनीं दिसणारी वस्तु पाहण्याकरितां चष्मा लावण्याची यातायात कोण बरें करील?

* * *

— ११९ —

उलट विचार प्रतिपादन करण्याची तुला संवयच जडली आहे. पुद्‌गल द्रव्य कर्मरूप बनतं हें तुझं म्हणणं ठीक आहे. क्रोधादि भावहि पुद्‌गलाचींच रूपं आहेत हें तुझं म्हणणंहि खरं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे; पण जीवाला पुद्‌गलच क्रोधस्वरूपी करते हें तुझं विचित्र म्हणणं ऐकलं कीं हंसूं येतं! तुझ्या अगाध ज्ञानाचं वर्णन करायचं झालं तर 'तूं पढतमूर्ख आहेस' या शब्दांनींच करावें लागेल.

तुला चांगलंच पढविण्यांत अलं आहे. अरे! जीवामध्यें परिणमन घडून येण्याची शक्ति नाहीं; तर पुद्‌गल द्रव्य त्याला कसं बदलूं शकेल? पुद्‌गल द्रव्य पुद्‌गलांत बदल घडवून आणूं शकेल. जीव द्रव्यांतहि परिणमनशील शक्ति आहे; म्हणूनच सम्यक्त्वी जीव मिथ्यात्वी होऊं शकतो. हा बदल कर्मांच्या सहाय्यानं जीव घडवून आणतो एवढेंच. जसा जीव पुद्‌गलांत बदल घडवून आणूं शकत नाहीं, त्याप्रमाणें पुद्‌गलहि जीवांत बदल घडवून आणूं शकत नाहीं. जीव द्रव्यांत परिणमनशील शक्ति मानणार नसशील तर त्याच्या शुद्ध स्वरूपांत बदल होणार नाहीं. जीव शुद्धच राहिला तर त्याच्यांत विकृति निर्माण होणार नाहीं. विकृति निर्माण झाली नाहीं तर त्याच्याजवळ कर्में येणार नाहींत. कर्में आलीं नाहींत तर जीवाशीं त्यांचा बंध होणार नाहीं. कर्मबंध झाला नाहीं तर 'संसार' निर्माण होणार नाहीं. अन् जर असें घडलें तर जीव शुद्ध स्वरूपाचा असल्यानें सतत सिद्धावस्थेंतच राहील.

* * *

– १२० –

जीव द्रव्यांत अनंत शक्तींचा वास आहे. अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत शक्ति, अनंत सुख इत्यादि त्याचीं स्वरूपें आहेत. ह्यांपैकीं प्रत्येक शक्ति समयासमयाला बदलत असते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बदल होत असतांना त्या शक्ति मूळचं आपलं स्वरूप सोडीत नाहींत; स्वभाव सोडीत नाहींत. लाकूड आणि खुर्ची यांत आकाराचाच फरक आहे; पण द्रव्य मात्र एकच ! ज्ञानी आणि अज्ञानी दोघेहि जीवच ! पण त्यांच्या ज्ञानाची व्याप्ति निराळी आहे ! हें भिन्नत्व म्हणजे पर्याय किंवा अवस्था ! ह्या अवस्था प्रत्येक जीव स्वत:च करून घेत असतो. जीवाचें लक्षण म्हणजे ज्ञान ! जीवाचा उपयोग म्हणजे प्रत्येक समयाला ज्ञेय पदार्थांचें करून घेतलेलें ज्ञान ! शुद्ध द्रव्यार्थिक अपेक्षेनें जीव अपरिणामी आणि नित्य आहे. पण अवस्था किंवा पर्याय यांच्या अपेक्षेनें पाहिल्यास तो परिणामी आहे. जीव जर अपरिणमनशील मानला तर त्याला क्रोधी बनविण्याचें कार्य पुद्गल करीत असतें, असें तरी कसें म्हणतां येईल ? ज्यांत बदलच होत नाहीं त्यांत कोणताहि उपाय योजला तरी बदल कसा होईल ? पुद्गल जीवाला बद्ध करते असें मानलें तर जीव सदा-सर्वकाळ शुद्ध नि मुक्त मानावा लागेल. पण हें कसें शक्य आहे ?

अस्थिर बुद्धि सोड ! स्थिर बुद्धीनें विचार कर.

* * *

– १२१ –

आत्मा स्वत:च कोणाच्याहि मदतीवांचून परिणमतो असें जर तूं मानूं लागलास तर, पुद्गल किंवा कर्म आत्म्याला परिणमवितें, असें जें तुझें म्हणणें होतें तें खोटें ठरेल. पुद्गल द्रव्य जीव द्रव्यांत परिणमन करीत नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण पुद्-लाच्या सहाय्यावांचूनहि त्यांत परिणमनहि होत नाहीं हीहि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri
5199

गोष्ट तितकीच खरी आहे. जीवाच्या ठिकाणीं गमन करण्याची शक्ति आहे पण कर्म द्रव्याशिवाय जीव गमन करूं शकत नाहीं. हें जसें खरें आहे त्याप्रमाणेंच जीव कर्माच्या मदतीनें स्वतःच परिणमतो हेंहि खरें आहे. ज्या त्या द्रव्यांत परिणमन घडवून आणण्याचें कार्य जें तें द्रव्यच करीत असतें. म्हणून जीवद्रव्य स्वतःच कर्मबद्ध होतें व स्वतःला क्रोधादि भावरूप परणमवितें !

जीवद्रव्याच्या परिणमनशीलत्वाचें कोडें या पद्धतीनें तुला उलगडावें लागेल ! तूं आधीं आपली भ्रामक समजून काढून टाक ! योग्य विचारांची खोली अधिक वाढव ! ज्ञान नि विचार सखोल बनव.

* * *

– १३२ –

जड आणि चेतन यांचें कोडें उलगडणं कठीण आहे, असें तुला वाटत होतें. पण तूं आपल्या ज्ञानानें तें उलगडलेंस ! शुद्ध दृष्टीनें आत्मा शुद्ध आहे आणि पुद्गलहि शुद्ध आहे. अन् परिणमन होणें हा दोघांचाहि स्वभाव आहे. क्रियाशक्तीनें दोघेहि परिणमनशील आहेत. आत्मा आपल्या शुभ-अशुभ, शुद्धाशुद्ध, ज्ञान आणि अज्ञानमय भावांचा कर्ता होतो. ह्या क्रिया त्याच्यांत होतात. पुद्गलाणूमध्यें स्कंधरूप बनण्याची शक्ति आहे अणूंचेहि असंख्य प्रकार आहेत. आजच्या विज्ञानानें अणूंचे प्रकार शोधून काढल्याचें तुला ठाऊक आहेच ना ! अन् त्या अणूंत किती संहारक किंवा उपयुक्त शक्ति असते हेंहि तुला माहीत आहे. परंतु जीवात्म्याचा परमात्मा कसा होतो, हें कुणासहि ठाऊक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होत नाहीं. तेंच मी तुला सांगतें. जीव बद्ध होण्यास पौद्‌गलिक कर्मांचा उदय कारण आहे, अन् पुद्‌गलाचें कर्मांत रूपांतर होण्यास आणि नंतर ते जीवाशीं बद्ध होण्यास जीवाचे अज्ञानजन्य असे शुभाशुभ भाव कारणीभूत आहेत.

* * *

– १२३ –

तुला आणखी एक शंका आली आहे. आत्मा भावांचा (विचारांचा) कर्ता आहे, ही गोष्ट तुला पटली. पण ज्ञानी आणि अज्ञानी आत्म्याचे भाव तूं सारखेच समजतोस आणि त्यामुळेंच मिळणारें फळहि तूं एकच मानतोस. पण हें कसें शक्य होईल ? शुभाशुभ भावांचें फळ एकच कसें असणार ? साखर आणि मीठ ह्यांच्या दोन्ही रसांचा स्वाद एकच कसा असेल ? गोड आंब्याचा रस आणि आंबट आंब्याचा रस यांचा स्वाद एकच असेल काय ?

अज्ञानजन्य कर्मांचें म्हणजे रागादिक भावांचें फळ निराळें नि ज्ञानजन्य कर्मांचें फळ निराळें ! रागादिक भावांमुळें आत्मा स्वतःस ‘ मी क्रोधी आहे, मींच हें घर बांधलें, मींच याचें भलें केलें, या सर्व गोष्टींस मीच कारणीभूत आहे ’ असें समजतो. म्हणजे स्वतःच्या आणि दुसऱ्याच्या सुखदुःखांच्या फलांचा कर्ता तो स्वतःस मानतो किंवहुना रागादिक भाव म्हणजेच मी आहे; माझ्यांत आणि रागादिक भावांत कांही फरक नाहीं असें तो मानतो.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– १२४ –

'बीज तैसें फळ' हा नियम सर्वकाळीं सत्य आहे. बीज शुद्ध असेल तर त्यांतून रसाळ फळांची निर्मिति होते. अन् ज्याचें बीज असेल त्याचेंच फळ येणार. आम्रफळाचें बीज पेरल्यास त्यातून आंब्याच्या झाडाचा अंकुर बाहेर येईल. त्याचें आम्र-वृक्षांत रूपांतर होऊन आम्रफळेंच लागतील. निंबाचें बीज पेरलें तर त्यांतून आम्रवृक्षाचे अंकुर फुटणार नाहींत किंवा पुढें त्यास आम्रफळंहि लागणार नाहींत. त्यास निंबोण्याच लागणार. क्रोधी माणसाचे रागद्वेषात्मक भावच निर्माण होणार ! शांत मनुष्याचे परिणाम शांतच असणार. तसेंच ज्ञानी मनुष्याचे भाव ज्ञानमयच असणार. म्हणजेच ज्ञानी मनुष्याचे सर्व भाव, सर्व विचार, सर्व वागणें ज्ञानमयच असणार; म्हणूनच त्यास कर्मबंध नाहीं.

★ ★ ★

– १२५ –

चांगल्या बीजाचें फळ जसें चांगलेंच असणार तसें वाईट बीजाचें फळ वाईटच येणार. निंबाच्या बीजाचें फळ कडूच असणार. तसेंच अज्ञानी माणसाचे भाव अज्ञानमयच असतात. मिथ्यात्वी मनुष्याचे मिथ्यात्वभावच असणार.

हा रस्त्यानें बडबडत जाणारा दारुड्या पाहिलास का ? दारूनें त्याच्या बुद्धीवर अंमल चढविला आहे. त्यामुळें सत्यासत्य स्वरूप तो विसरून गेला आहे. आईस बायको, बायकोला बहीण, बहिणीस मुलगी समजून त्याप्रमाणें तो वागतो.

अज्ञानी मनुष्य आपल्या परिणामानें अज्ञानच निर्माण करतो.

★ ★ ★

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– १२६ –

सर्व वैभवाचा मूळ पाया म्हणजे सम्यक् दर्शन होय! सम्यक् दर्शनाची प्राप्ति झाली कीं मनुष्याची विकासक्रिया चालू होते तेव्हांपासून तीर्थंकर पदापर्यंत शुद्धात्मस्वरूपाचें चिंतन केल्यानें जीव हळूहळू आपल्या तपःसामर्थ्यानें संसारच्छेद करून चार ज्ञानाचे धारक बनतात. तदनंतर हे जीव पुण्य-पाप भावनेनें रहित होऊन निरंतर शुद्ध ज्ञानांत आणि शुक्लध्यानांत रत असतात. रत्नत्रयांच्या प्राप्तीमुळं स्वात्मभावनेपासून उत्पन्न झालेल्या अमृतसुखाचें ते प्राशन करतात. त्यामुळें लोकत्रयाला पूज्य नि परम अचिंत्य असें कैवल्य जीवाला प्राप्त होतें.

* * *

– १२७ –

अज्ञानाचें फळ म्हणजे दारिद्रय! दुःखं हीं अज्ञानाच्या वृक्षाला लागलेलीं फळं होत! अज्ञान्याच्या साऱ्या क्रिया अज्ञानमयच असतात. असा मनुष्य सतत अन्यायानें, अनाचारानें नि स्वच्छंद वागतो. विषयलंपटतेंत तो सदा गुरफटलेला असतो. त्यामुळंच पावित्र्य, त्याग, विवेक, वैभव इत्यादि साऱ्या सद्‌गुणांना तो पारखा होतो. त्यामुळं त्याचा संसार दुःखाचा होऊन त्याला पदोपदीं मानहानी स्वीकारावी लागते. त्यामुळं अशीं माणसें लोकनिंदेला घाबरून आत्महत्त्येसारख्या अनुचित मार्गाला लागतात. यामुळं या जन्मांत आणि परलोकांत या दुष्कृत्यांमुळें त्यांना यातना भोगाव्या लागतात. आत्महित आणि अहित यांचं ज्ञान नसल्यानं असा माणूस उन्मत्तासारखा वागूं लागतो,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आणि आपल्या समुन्नत जीवनाचं वाटोळं करतो. बाह्य वैभवाच्या पाठीमागें लागून, आणि त्याची प्राप्ति झाली नाहीं तर आत्यंतिक निराशेच्या पोटीं अविचार जन्म घेतो नि त्यामुळं आत्मनाश घडून येतो. गत जन्मीच्या पुण्यानं जरी वैभवाची प्राप्ति झाली, भव्य वाडे, सुखवस्तु जीवन इत्यादिकांची प्राप्ति झाली, तरी अज्ञानामुळें तो या साऱ्या वैभवाला वंचित होतो. अशा स्वच्छंदी जीवनाचं फळ म्हणजे नरकवास

अज्ञान आणि अज्ञानजन्य भाव यांचा तूं त्याग कर. सम्यक् ज्ञानाचा स्वीकार कर.

* * *

– १२८ –

ज्ञान ही प्रचंड शक्ति आहे. हिचा आविष्कार होतांच जगांत अनेक आश्चर्यकारक गोष्टी निर्माण होतात. ज्या राष्ट्रांत ज्ञान घेणें आणि देणें यावर कसलेच निर्बंध नसतात तें राष्ट्र कधींच गुलाम बनत नाहीं. म्हणूनच ज्ञानाची महति अगाध आहे.

अज्ञानाच्या उदयानें तूं विपरीत जाणूं लागलास ! दोरीस साप समजणें हें काय ज्ञानी पुरुष असल्याचं लक्षण आहे ? तूं जडास अजड आणि अजडास जड समजतोस. कर्म, नोकर्म, क्रोधादि भाव हे चैतन्य आहेत अशी तुझी पक्की धारणा झाली आहे. तुला उपदेश देणारेहि मूढ असले पाहिजेत किंवा मूढतेच्या पांघरुणाखालीं तुझं अहित करण्यासाठीं तरी ते तुला जाणून-बुजून वाममार्गाकडे नेत असावेत. त्यामुळें तुझी बुद्धि सन्मार्गा-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कडे लागत नाहीं. जडाचं विवेचन करणारीं पुस्तकं वाचून तुझं ज्ञान विपरीत झालं आहे; त्यामुळें मृगजलामागें धावणाऱ्या हरिणीप्रमाणं तूं आभासाकडे धावतोस ! ध्येयप्राप्तीपासून च्युत होतोस !

'जोंपर्यंत आपण आहोंत तोंपर्यंत सुखानं जगावं; सांपत्तिक स्थितीच्या अभावीं जर तें शक्य झालं नाहीं तर कर्ज काढून सुखानं जगावं.' या नीतीची तुझ्यावर भुरळ पडली आहे. आत्म्याचं अस्तित्व अमान्य करून केवळ शरीरसुखाचा विचार करणाऱ्या तत्त्वाची तुझ्यावर मोहिनी पडावी हें कशाचं द्योतक आहे ? हें तुझ्या अज्ञानाच द्योतक आहे मनुष्यहत्त्येला नि युद्धासारख्या संहारक तत्त्वाला अशामुळेंच उत्तेजन मिळतं नि त्यामुळं न संपणाऱ्या दुःखांची मालिका सुरू होते.

* * *

– १२९ –

'सुख संयमांत असतं' हें आर्यवचन तूं विसरून गेलास. संयम हाच जीवनाचा सुखी मार्ग आहे. स्वच्छंदी नि स्वैराचारी वृत्ति म्हणजे दुःखी जीवनाचा मार्ग होय. अनंत अशा विश्वाप्रमाणें आपल्या वासना देखील अमर्याद बाळगणें म्हणजे दुःखांना स्वतः होऊन आमंत्रण देणें होय. प्रत्येक मानवाचा आशेचा खड्डा फारच मोठा आहे. त्यांत विश्वाचा सर्व भाग जरी समाविष्ट केला तरी तो एखाद्या परमाणू एवढाच भासेल. अशा परिस्थितींत जगाची वाटणीच करायची झाली तर, प्रत्येकास त्याचा किती भाग मिळेल ? अणूएवढं विश्व गिळंकृत करण्याची मानवाची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

काय ही धडपड ! अन् त्याची प्राप्ति झाली नाहीं म्हणून किती घोर निराशा होते त्याची ! 'मानव फक्त भाकरीवरच जगत नसतात. आशा त्यांच्या जीवनांत असते. म्हणूनच दुःखद जीवनाचा प्रवास तो करूं शकतो,' ही गोष्ट खरी आहे; पण आशेची पूर्ति झाली नाहीं म्हणून जीवन निराशेनं काळवंडून जाण्याच काय कारण ? याचा अर्थ माणसानें महत्त्वाकांक्षी बनूं नये असा नव्हे ! पण आपले विचार हे अविचारी बनूं नयेत. यासाठीं ज्याप्रमाणें विवेकाची आवश्यकता असते, त्याप्रमाणें महत्त्वाकांक्षेसहि संयमाची आवश्यकता असते. हिरा मूळचाच दैदीप्यमान असतो. ही गोष्ट खरी, पण त्याला पैलू पाडून तो सुवर्णकोंदणांत बसविला तर त्याची कांति काय वर्णावी ! त्याच प्रमाणें संयमी जीवनाचें असतें.

* * *

– १३० –

रे चंचल ! अस्थिर राहणें हाच तुझा स्वभाव ! वाऱ्याच्या साध्या झुळकीनं अथांग सागरांत लहरी निर्माण व्हाव्यात त्याप्रमाणें थोडयाशा मोहानेंहि तुझ्यांत चलविचलता निर्माण होते. त्यामुळें तुझी सारखी हालचाल चालूंच आहे. मनाला नेहमी सागराचा उपमा देतात. सागरांत चंचलता निर्माण झाली; तो खवळला कीं ज्याप्रमाणें अनेक अनर्थ घडून येतात त्याचप्रमाणं मनांत चंचलता निर्माण झाली कीं जीवनांत अनेक अनर्थ घडून येतात.

तुझं मन माकडासारखं चंचल आहे. एक क्षणभर तरी तूं मनावर ताबा ठेवतोस काय ? तुझ्या तोंडाची बडबड सतत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चालूं असते. अन् त्याबरोबर शरिराची हालचालहि चालूंच आहे तूं समाधीच्या मार्गाला निघालास; पण मन-वचन-काय या त्रयींच्या हलनचलनानें ती समाधी साधूं शकली नाहीं या तुझ्या शुभ किंवा अशुभ मन, वचन, कायेच्या प्रवृत्तींमध्यें तूं दंग आहेस. कधीं पुण्यरूप किंवा कधीं पापरूप अशा तुझ्या चेष्टा चालूंच आहेत. अशा स्थितींत निर्विकल्प समाधि कशी साधणार? मन, वचन, काय या त्रयींची गुप्ति केल्याशिवाय — त्यांना स्थिर केल्याशिवाय तुला चित्ताची स्थिरता मिळणार नाहीं.

रे समाधिप्रिय! ही चंचलवृत्ति सोड. अत्यंत स्थिर होऊन समाधिसुखाचा अनुभव घे.

* * *

– १३१ –

जीवाच्या रागादिक परिणामाला कर्माचें निमित्त लागतें, हें मान्य आहे; परंतु पुद्गल कर्माहून जीवाच्या रागादिक परिणामांची जात वेगळी आहे. कित्येक वर्षें एकाच ठिकाणीं बसून आपल्या सर्व भावना नियंत्रित ठेवणारा साधु दुर्दैवानें चंचल दृश्य पाहून चलायमान होतो नि त्याचे शांत परिणाम नष्ट होऊन ते उन्मादक स्वरूप धारण करतात. पण हजारों वर्षें एकाच ठिकाणीं असलेल्या दगडामध्यें अशा दृश्यांनीं परिवर्तन होणें शक्य आहे काय? म्हणून जीवाचे रागादिक परिणाम वेगळे आहेत. जीव आणि कर्म यांच्या मिश्रणानें निर्माण झालेली तिसरी एकरूप अवस्था म्हणजे रागादिक परिणाम अशी तुझी समजूत असेल तर ती चुकीची आहे. जीवाचे रागादिक परिणाम

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वेगळेच आहेत. त्यास पुद्गल कर्म फक्त निमित्त-कारण आहे; म्हणून या निमित्त-कारणाला उपादान (मुख्य) कारण मानूं नकोस.

* * *

— १३२ —

पुद्गलांचें कर्मांमध्यें परिणमन होण्यास जीवाचे रागादि परिणाम केवळ निमित्त आहेत. हळद आणि तुरटी यांच्या मिश्रणानें ज्याप्रमाणें लाल रंग तयार होतो, त्याप्रमाणें पुद्गल आणि जीवाचे रागादिक परिणाम मिळून कर्मे तयार होतात असें मानणें चुकीचें आहे. कर्म म्हणजे जीवाचे रागादिक परिणाम आणि पुद्गल यांची मिश्रावस्था आहे. पुद्गलाचें कर्मरूप परिणमन आपल्याच उपादानानें होतें. जीवाचे रागादिक परिणाम त्यास फक्त निमित्तमात्र आहेत.

रे अंतरात्मन् ! पुद्गलाचें कर्मरूप परिणमन होण्यास जीव निमित्तमात्र आहे, हें तूं नीट लक्षांत ठेव ! यासंबंधीचें सम्यक् ज्ञान झालें कीं जीवाचे पुढील सर्व व्यवहार सुरळीत पार पाडतील.

* * *

— १३३ —

रे अंतरात्मन् !

जीव मूर्तिक आहे असेंहि त्याचें वर्णन करण्यांत आलें आहे, किंबहुना तो जडहि वर्णिला गेला आहे; पण या वेळीं वर्णन करणारानें निराळ्या दृष्टिकोनांतून त्याचें वर्णन केलेलें असतें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जीव कर्माशीं बद्ध झाला कीं व्यवहारनयानें तो मूर्तिक आणि जड म्हणून म्हटला जातो. त्याशिवाय व्यवहार चालत नाहीं. अनेक चांगलीं नि वाईट नांवें धारण करणारीं माणसें आहेत; पण आपापल्या नांवाचें तीं सार्थक करतातच असें नाहीं. पण परस्परांपासून स्वतंत्र अस्तित्व ओळखण्याकरितां असा व्यवहार करावा लागतो.

* * *

– १३४ –

पक्षातीत अवस्था हीच स्थितप्रज्ञावस्था ! स्थितप्रज्ञच वस्तूंचें खरें स्वरूप पाहूं शकतो. एकाच पक्षाकडे तो झुकत नाहीं. तो फक्त ज्ञाता आणि द्रष्टा म्हणूनच राहतो. सूर्य आपल्या प्रखर तेजानें जगावर प्रकाश पाडतो, संपूर्ण जग पाहतो, सर्व वस्तु जाणतो; पण जगांतील व्यवहाराचे पडसाद त्याच्यावर पडत नाहींत. अंधारांत दिवा आणतांच अंधार पळून जातो. दिव्याचा अंधारावर परिणाम झाला; पण अंधाराचा दिव्यावर झाला नाहीं. प्रकाशांत जगांतील बरेवाईट व्यवहार उजेडांत येतात, पण जगांतील बऱ्यावाईट व्यवहाराचा दिव्यावर परिणाम होत नाहीं, तो सर्वांनाच सारखा प्रकाश देतो. तो कधीं असें म्हणणार नाहीं, 'मी अमकाच भाग प्रकाशित करतो; दुसऱ्या भागांत प्रकाश देणार नाहीं'; म्हणून दिव्याला किंवा सूर्यचंद्राला निर्विकारी, निर्विकल्प, पक्षातीत आणि स्थितप्रज्ञ म्हणायचें. स्थितप्रज्ञ माणसाचे व्यवहार देखील असेच असतात. बऱ्यावाईटाचा त्याच्यावर कांहीच परिणाम होत नाहीं.

तूं स्थितप्रज्ञ हो ! निर्विकल्प नि पक्षातीत हो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– १३५ –

तुझ्या सूक्ष्म निरीक्षणानें शुभ किंवा अशुभ कर्मांचं अंतिम फल तूं नीट जाणतोस. दोन्हींचं फल एकच आहे. तुरुंगांतल्या माणसाच्या हातांत लोखंडाची बेडी घातली म्हणूनच त्रास होतो आणि सोन्याची बेडी घातली म्हणून सुख होतं, असं थोडंच आहे ? पिंजरा लोखंडाचा असो किंवा सुवर्णाचा असो, पक्ष्यांच्या गुलामगिरींत कांहीं अंतर पडत नाहीं. दोन्ही सारखेच बंधन-कारक आहेत. सोन्याची बेडी घातली म्हणून हर्षानं फुलून गेलेला आणि लोखंडाची बेडी घातली म्हणून दुःखानं आक्रोश करणारा माणूस पहावयास मिळेल का? त्याच्या दुःखाच्या दृष्टीनें दोन्ही गोष्टी सारख्याच ! त्याचप्रमाणें शुभ नि अशुभ भाव दोन्ही कर्मोत्पत्तीस आणि कर्मबंधास सारखेच कारणीभूत आहेत याची तुला कल्पना आली आहे. तूं अंतर्ज्ञानी झाल्यानें कर्माचं विचित्र जाळं उलगडूं शकलास अज्ञानी माणसें शुभ कर्माला भुलून कर्माच्या जाळ्यांत फसतात. पण तूं ह्यासंबंधीं सूक्ष्मपणें निरीक्षण केल्यानें आतां तूं त्यांत फसणार नाहींस.

हें तुझें निरीक्षण असेंच चालूं दे !

* * *

– १३६ –

दान करणें, पूजा करणें, कुळाची कीर्ति वाढविणें, जाती-जातींत वैमनस्य न वाढविणें, स्वतःचं नि देशाचं बळ वाढविणें, तपश्चरणपूर्वक वाईट गोष्टींचा त्याग करणें इत्यादि गोष्टी चांगल्या आहेत. पण त्यांचा गर्व करणें हें मात्र वाईट आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जो स्वार्थी वृत्तीनें दान करतो, कोणत्या तरी वैषयिक, सांसारिक भावनेनें पूजा करतो, कीर्तीच्या लोभानें संपत्तीचा व सेवेचा विनियोग करतो व या गोष्टींची प्रौढी मिरवितो तो स्वतःची प्रसिद्धी करून घेतो. या सर्व कृतीचें नि भावनांचें त्याला कोणतें फळ मिळणार ? त्याचें सारें लक्ष फळावर — कीर्तीवर व वैषयिक सुखोपभोगांवर असणार. त्याची ही आसक्ति त्याच्या शुभ क्रियेचें फळ म्हणून दुःखच देणार ! कारण त्याच्या या क्रिया स्वार्थी, ममत्वानें मंडित झालेल्या असतात. हेतु मनांत धरून किंवा मोह बाळगून केलेल्या कोणत्याहि गोष्टी 'मूढता' (मूर्खपणा) या सदरांत मोडतात. मूढतेचें फळ चांगलें कसें मिळणार ? म्हणून वरील दान, पूजा, तप या गोष्टी करतांना कोणत्याहि फळाची आसक्ति ठेवतां कामा नये ! निरासक्तपणें केलेल्या कार्याचें फळ आत्मोद्धारास सहाय्यभूत ठरणारं आहे !

कोणत्याहि फळाची अपेक्षा न ठेवतां तूं शुद्ध भावनेनें कार्य कर.

* * *

- १३७ -

स्वार्थी भावनेनें केलेल्या शुभाशुभ कार्याचं फळ म्हणजे कर्मबंधच होय. अशा अनेक कृत्यांनीं कर्मबंध अधिकाधिक घट्ट होत जाणार. स्वार्थी भावनेनें केलेल्या शुभ कार्यांत निर्दयता, क्रूरता सामावलेली असते. दया, अहिंसा, वीतरागता, निरिच्छपणा यांचा तेथें मागमूसहि नसतो.

ज्याप्रमाणें ज्ञानी हत्ती त्यास पकडण्याकरितां आणलेल्या हत्तिणीच्या मोहांत न फसतां तें बंधन आहे असं समजून त्यापासून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अलिप्त रहातो, त्याप्रमाणें तूं अज्ञानानें ग्रासलेल्या, स्वार्थानें भरलेल्या व अहंकारानें मंडित झालेल्या दुष्ट कर्मजालांत फसूं नकोस. तुझं अंतर्ज्ञान जागृत ठेव! तुझा विवेक जागा ठेव! त्यास या दुष्ट कर्मांचा संपर्कहि लागूं देऊं नकोस. ★ ★ ★

– १३८ –

त्यागांतच आनंद मानणाऱ्या निसर्गदेवतेचा आदर्श तुझ्या-पुढें असूनहि तूं भोगांत रमला आहेस; अन् संग्रह करण्यांतच पराक्रम मानत आहेस; ही खरोखर आश्चर्याची गोष्ट आहे. सुख काय किंवा वैभव काय मनुष्याच्या सावलीप्रमाणें असतात. पुढें पुढें गमन करणाऱ्या मनुष्याच्या मागोमाग त्याची सावली येत असते! पण सावलीकडे धावणाऱ्या मनुष्यापासून ती लांब लांब पळत असते. संपत्तीकडे किंवा वैभवाकडे निरिच्छ बुद्धीनें पाहणाऱ्या नि त्याकडे अभिलाषारहित बुद्धि ठेवणाऱ्या मनु-ष्याकडंच सुख धावत येतं! अभिलाषा न धरतां निवांतपणें पहुडलेल्या विष्णूच्या गळ्यांतंच लक्ष्मीनं माळ घातली आहे हें कशाचें द्योतक आहे? तूंहि तुझ्या भावना निरिच्छ कर नि तुझ्या क्रिया अनासक्त असूं देत!

आसक्तीनें, ममत्वानें व स्वार्थी बुद्धीनें केलेल्या क्रियांचे परिणाम म्हणजे कर्मबंध होत; व निरासक्तीनें, वीतरागतेनें नि निर्ममत्वानें केलेल्या कार्याचं फळ म्हणजे बंधमुक्तता होय. यानेंच कर्मांचे बंध तटातट तुटतात. ही ज्ञानपूर्वक क्रियाच मुक्तिदायिनी ठरते. ★ ★ ★

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– १३९ –

ज्ञानापेक्षां अनमोल असं कांहीच नाहीं. ज्ञानानेंच कर्मांचीं बंधनं तुटतात नि त्यानेंच मोक्षाचं द्वार खुलं होतं ! मोक्षपथावर भ्रमण करीत असणाऱ्या जीवांना ज्ञान म्हणजे जणूं शिदोरी होय.

ज्ञान म्हणजेच आत्मा ! संपूर्ण विकल्प-संकल्पातीत असलेली वस्तु म्हणजे ज्ञान होय. शुद्ध ज्ञानालाच शुद्धात्मा म्हणतात. संसाराच्या गुलामगिरींत अडकून पडलेल्या जीवांना स्वतंत्र करणारं ज्ञान परतंत्र कसं असणार ? तें स्वतंत्रच आहे. परावलंबनत्व नि परधार्जिणत्व याचं त्यास वावडं आहे ! अशा शुद्ध ज्ञानाचें मनन करणारा म्हणजे मुनि !

अशा पवित्र ज्ञानामध्यें स्थित असणारे महाभागच निर्वाणाला जातात. त्यांनाच मुक्तीचं शाश्वत सुख अनुभवण्यास मिळतं !

* ★ *

– १४० –

किती कठीण तपश्चरण चालूं आहे तुझं ? मन स्थिर करून, सर्व इंद्रियें ताब्यांत ठेवून तुझी अखंड धारणा चालूं आहे. कोणत्या स्वर्गसुखाची किंवा कसल्या भोगाची तूं अपेक्षा बाळगली आहेस ? ही कसली महान् साधना चालूं आहे ? ही साधुवृत्ति, हें संन्याशाचं जिणं म्हणजे महान् असिधाराव्रतच आहे ही महातपस्या करून तूं कसलं पुण्य मिळविणार आहेस ? ही तुझी सारी धडपड संसारांतल्या क्षुद्र सुखोपभोगांच्या प्राप्तीसाठीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चालली आहे संसारांतल्या अस्थिर सुखोपभोगांसाठीं तूं एकाग्र चित्तानें स्थिर तपस्या करावीस याचं आश्चर्य वाटतं! पण याच्या शतांशपटीनें जरी तूं मुक्तीसाठीं प्रयत्न केले असतेस तरी तुला चित्सुखाची प्राप्ति झाली असती.

तुला आत्मसाक्षात्कार झाला नाहीं, आत्मानुभव आला नाहीं; कारण अज्ञानपूर्वक केलेली तपश्चर्या दुःख परंपरेलाच कारणीभूत ठरते.

दुःख परंपरेला निमित्तभूत ठरणारी ही अज्ञानी वृत्ति सोड! ती सम्यक् ज्ञानमय बनव! त्यानं तुझ्यांत वसत असलेल्या चित्-ज्योतीची प्राप्ति करून घे. त्याच्या सुखद प्रकाशाचा अनुभव घे! पण आधीं तुझी अज्ञानी वृत्ति सोड.

★ ★ ★

– १४१ –

बाह्य तपाचं आचरण न करतां ज्ञानानं मोक्ष मिळतो, याबद्दल तुझ्या मनांत संशय निर्माण झाला आहे. केवळ ज्ञानानेंच मोक्ष मिळतो, असं सांगणाऱ्या एकांतवाद्यासारखं हें मत आहे असं तुला वाटतं, म्हणून तूं गोंधळांत पडला आहेस. पण असा गोंधळांत पडूं नकोस. जे ज्ञानी निर्विकल्प समाधिरत असतात, त्या व रत्नत्रयांनीं युक्त असणाऱ्या महाभागालाच मोक्ष मिळतो. ज्ञानानें अंतरंग शुद्ध झालें असतां बहिरंग अशुद्ध राहील का?

भरत चक्रवर्ती गृहस्थ होता! पण त्याचें अंतःकरण सदैव स्वच्छ होतें. शुद्ध बीजाच्या पोटीं जशीं रसाळ नि गोमटीं फळं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दडलेलीं असतात, त्याप्रमाणें शुद्ध अंत:करणांतच आत्मानुभवाचा स्वाद दडलेला असतो. म्हणूनच भरतानें बाह्य वस्त्रें काढतांच त्यास केवल-ज्ञान झालें नि तो मोक्षाचा अधिकारी बनला.

* * *

– १४२–

पुष्कळ मुमुक्षु लोक संन्यास घेतात. संपूर्ण परिग्रहांचा त्याग करतात व निर्विकल्प समाधीची प्रतिज्ञा करतात; पण दुर्विचार अशा बलवान् कर्मांचा नाश करण्यास असमर्थ ठरल्यानें प्रतिज्ञाभंग करतात अन् निराशेनें चुकीच्या मार्गाकडे वळतात. 'स्थूल संक्लेश परिणाम नाहींसे केले; पृथ्वीसारखी क्षमा धारण केली म्हणजे मोक्ष मिळेल' असं मानतात; पण सूक्ष्म कषायांकडे त्यांचं लक्ष नसतं. सूक्ष्म राग हा बंधाला कारण आहेच; पण त्याकडे लक्ष न देतां अज्ञानी माणसं आत्मिक ज्ञानाच्या प्राप्तीच्या अभावी पुण्याची इच्छा करून दान, पूजा, व्रत, तप या क्रियांत रत असतात, त्यांतच आत्मिक सुख मानतात. पण अज्ञानी मनुष्य कर्मबद्धाला कारणीभूत असलेल्या शुभ क्रिया मोक्षाला कारणीभूत मानतो.

* * *

– १४३ –

पुण्यकर्म संसाराला कारणीभूत आहे म्हणून पुण्यकर्मे करण्याचें सोडून देऊं नकोस अन् स्वच्छंदी बनूं नकोस. जोंपर्यंत तुला आत्मसाक्षात्कार होणार नाहीं, आत्मानुभवाचा स्वाद येणार

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाहीं, निर्विकल्प समाधीचं नि आत्मिक सुखाचं अमृत लाभणार नाहीं, तोंपर्यंत पुण्योदय वाढविणाऱ्या दान, पूजा, स्वाध्याय, तप इत्यादि आवश्यक शुभक्रिया सोडूं नकोस. तूं ज्ञानी बनल्यावर, निर्विकल्प समाधीमध्यें रत झाल्यावर, स्वाभाविक दशा प्राप्त झाल्यावर, या बाह्य क्रिया सर्पाच्या अंगावरील कातीप्रमाणें आपोआपच गळून पडतात. ज्ञानी झाल्यावर अज्ञानाच्या क्रिया आपोआपच बंद पडतात.

* * *

– १४४ –

सम्यक् दृष्टि, सम्यग्ज्ञान व सम्यक् चरित्र या तिहींची एकता होणें हाच मोक्षाचा मार्ग होय ! जीवादिक नवतत्त्वांवर श्रद्धा ठेवणें हें सम्यक् दर्शन होय. त्या नवतत्त्वांचें ज्ञान होणें म्हणजेच सम्यग्ज्ञान होय. रागादिकांचा परिहार करणाऱ्या आचरणाचें ज्ञान होणें हें सम्यक् चारित्र्य होय. म्हणजे ज्ञानच सम्यक् दर्शन आहे, ज्ञानच सम्यक्ज्ञान आहे नि ज्ञानच सम्यक् चारित्र आहे. या तिहींना मिळून रत्नत्रय असं म्हणतात.

रत्नत्रयांचेहि व्यवहार-रत्नत्रय आणि निश्चय-रत्नत्रय असे दोन भेद पडतात. नवतत्त्वांवर श्रद्धा ठेवणें, नवतत्त्वांचें ज्ञान करून घेणें व रागादिकांचा परिहार करणें हा व्यवहार-मोक्षमार्ग होय. आत्म्यावर म्हणजे ज्ञानावरच श्रद्धा ठेवणें, त्या ज्ञानज्योतीचें म्हणजे चित् ज्योतीचें ज्ञान करून घेणें आणि ज्ञानामध्येंच स्थिर रहाणें यास निश्चय-मोक्षमार्ग म्हणतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रे अंतर्दृष्टि ! व्यवहार नि निश्चयाचें ज्ञान करून घे नि निश्चयांतच रममाण हो. तोच तुझ्या नित्य उपयोगाचा ठेवा होय. तुझ्या आत्म्यास सुवर्णत्व करून देणारा पारसमणि तोच होय. ★ ★ ★

– १४५ –

पुद्गल द्रव्याची शक्ति कमी समजूं नकोस. त्यानें निर्माण झालेल्या मिथ्यात्व भावांत प्रचंड शक्ति असते. त्या शक्तीनं तुझ्या आत्म्याची तुलाच ओळख पटत नाहीं. मिथ्यात्वाच्या अचाट शक्तीची तुझ्यावर मोहिनी पडली कीं तुझा आत्मा मळकट वस्त्रासारखा दिसूं लागतो.

पुद्गल द्रव्याकडे नि त्याच्या अचाट शक्तीकडे तूं आश्चर्यानें पाहतोस ! पुद्गलाच्या विराट शक्तीविषयीं आश्चर्य वाटण्याचं कांही कारण नाहीं. तुझी शक्ति त्याहून अचाट आहे. पण मिथ्यात्वानें तुझ्यावर मोहिनी घातल्यानें तुझी शक्ति तुलाच कळत नाहीं. तुझ्या शक्तीकडे तुझं लक्ष न जातां तें पराकडे म्हणजे पुद्गलाच्या शक्तीकडे जाते. स्वतःचें वैभव तूं विसरून गेलास म्हणूनच ही पारतंत्र्याची अवस्था निर्माण झाली आहे. त्यांतच तूं स्वतःस धन्य मानीत आहेस. ★ ★ ★

– १४६ –

अंधभक्तीनें वाट चुकलेले हे भक्त पहा ! कोणी जटा वाढवून त्यांच्या गाठी मारण्यांतच धर्म मानीत आहेत; कोणी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अंगाला राख फासून सभोंवती अग्नि पेटवून प्रखर उन्हांत पंचाग्नितपाची साधना करीत आहेत. कुकल्पना मनांत बाळगून कोणी देहदंड सोशीत आहे. अन् स्वार्थी वृत्ति बाळगून कोणी ढोंगी तपश्चर्या करीत आहेत. अंधभक्तींत हे सारेच दंग आहेत. विपरीत श्रद्धेमुळेंच त्यांच्यांत अंधभक्ति निर्माण झाली आहे. खऱ्या ज्ञानाचा तर यांना गंधहि नाहीं. खऱ्या भक्तीची नि तपश्चर्येची यांना थोडीशीहि ओळख नाहीं. सांसारिक भोगांसाठींच त्यांची भक्ति चालू आहे. त्यांचं तपश्चरण भौतिक सुखांसाठीच चालूं आहे. शारिरिक सौख्यासाठींच त्यांच्या मंत्र-तंत्रादिक क्रिया चालू आहेत. ★ ★ ★

– १८७ –

रे अंतर्दृष्टि! वाट चुकलेले हे अंध भक्त विपरीत आचरण करीत आहेत, हा कांही त्यांचा दोष नव्हे. मिथ्यात्वाचा तीव्र पगडा त्यांच्यावर बसल्यानेंच ते विपरीत आचरण करीत आहेत.

शुद्ध ज्ञानानें तीव्र कर्मांचा हा जटिलबंध दूर होईल. ज्ञानपूर्वक भक्ति हीच मुक्तिदायिनी असते. ज्ञानीच डोळस भक्ति करीत असतो. तोच कर्मबंधनें तोडूं शकतो! तूं ज्ञानी पुरुषांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यालाच अनुसरीत जा. त्यांतच तुझी मुक्ति दडली आहे.

जग कोणत्याहि मताकडे झुकतं. पण त्यांना झुकविणारा पाहिजे! असा मनुष्य भेटतांच त्याच्याभोंवती कृत्रिम तेजोवलय

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निर्माण करून त्याला अनुसरणारे असंख्य लोक जमा होतात. जगांत आजपर्यंत मतमतांची विचित्रता त्यामुळेंच निर्माण झाली आहे. मतमतांच्या बाजारांत अज्ञानी मनुष्य येतांच तो गोंधळून न गेल्यास तें एक नवलच ! रोज नवीन नवीन वाद नि नवे नवे तत्त्ववेत्ते निर्माण होतात. आजच्या तथाकथित बुद्धिवादाच्या युगांत, या वैज्ञानिक काळांत, बुद्धिभेद करणारीं अनेक पुस्तकें रोजच्या रोज प्रकाशित होतात. नवेनवे वाद अनेक रूपं घेऊन निर्माण होत आहेत. त्यांचा पगडा बसून अज्ञानी पुरुषास तें सगळंच खरं वाटूं लागतं. तो रोज एका एका वादाकडे किंवा पक्षाकडे झुकतो आणि नवीन वादाचा पगडा पसरतांच पूर्वीचा पक्ष सोडून देतो. हें त्याचं करणं अनादि कालापासून चालूं आहे. यांत पक्षाचा दोष नाहीं. अज्ञानजन्य कर्मांचा परिणाम आहे. कर्मांचेंच हें कार्य आहे. त्यामुळें त्याची दृष्टि सत्यज्ञानाकडे झुकत नाहीं. त्यामुळें त्यास खऱ्या ज्ञानाची प्राप्ति होत नाहीं. अशा परिस्थितींत अज्ञानी जीवांना मुक्तीची प्राप्ति कशी होणार ?

* * *

– १४८ –

अज्ञानी मनुष्यावर जगांतील अनेक मतांचा पगडा बसतो, नि त्यामुळें त्याच्याकडून विपरीत आचरण घडतं. चरित्रमोहनीय कर्माच्या उदयानें त्याला विपरीत आचरणांतच सत्याची प्राप्ति दिसूं लागते, नि त्याचाच प्रभाव पडून तो खऱ्या आचरणापासून अलिप्त राहतो. एवढेंच नव्हे तर सत्य आचरण करणारे साधु त्याला भेटले, आणि त्यांनीं त्याला सन्मार्ग दाखविला तरी तो

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्याला पटत नाही. खरा देव, गुरु आणि शास्त्र यांवर त्याची श्रद्धाच वसत नाहीं; म्हणूनच तो सदाचरण पाळूं शकत नाहीं, सत्याचरणाकडे त्याची दृष्टि झुकत नाहीं.

★ ★ ★

– १४९ –

शुभाशुभ कर्म सोडल्यावर काय करावें, असा तुला प्रश्न पडेल. तूं प्रथम अशुभ कर्में करूं नकोस. शुभ कर्में करीत असतां त्यांच्या फळाची अभिलाषा तूं मुळींच बाळगूं नकोस. निरनिराळ्या अवस्थेंत निरनिराळीं कर्में तुला करावीं लागणारच; पण तीं करीत असतांना तूं निरासक्त राहिलास, तुझ्यांतले रागभाव काढून टाकले, कीं कोणत्याहि कर्मांच्या बंधनांत तूं राहणार नाहींस. निरासक्तिपूर्वक केलेलीं कर्में मुक्तीला कारणीभूत होतील. आसक्तीनें केलेल्या कर्मांचं फल संसार आणि निरासक्तीनें केलेल्या कर्मांचं फळ मोक्ष आहे; ही गोष्ट तूं निरंतर ध्यानांत ठेव.

नवीन कर्मांचं ओझं तूं आतां स्वीकारीत नाहींस. पूर्वी तूं अज्ञानावस्थेंत असतांना झालेला कर्मबंध नाहींसा करण्याच्या तूं विचारांत आहेस. एखादी गोष्ट दुसऱ्याची आहे, असं समल्यावर शहाणा मनुष्य तिच्यापासून नेहमींच अलिप्त असतो. तसंच सम्यक्दर्शनी कर्म, नोकर्म इत्यादी भावकर्मांपासून दूर असतो. कारण तो नेहमी आपल्या ज्ञानाचाच कर्ता असतो. परद्रव्यांच्या कर्तृत्वाचा अहंकार त्याच्यांत निर्माण होत नाहीं.

तुझ्याकडे येणाऱ्या कर्मास्रवाची कांही विविध उदाहरणें सांगूं? थोर पुरुषांची एखाद्यानें स्तुति केली तर ती तुला खपत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाहीं. विद्वानांची स्तुति तुला कां खपूं नये ? ती ऐकतांच तूं जळफळूं लागतोस. अशा कृत्यानें कर्मास्त्रव होत असतो, हें तूं लक्षांत आण. * * *

– १५० –

तूं सांगितलेल्या ज्ञानामुळें इतर ज्ञानी होतील अन् तुझी किंमत कमी होईल, असें तुला वाटतें. या तुझ्या मत्सरी वृत्तीनें तूं नवीन कर्मबंध बांधीत असतोस. तूं स्वत: तर इतरांना ज्ञान देंत नाहींसच; पण दुसऱ्याकडून कोणी ज्ञान मिळवीत असतील तर तेंहि तुला खपत नाहीं. त्यांच्या ज्ञानग्रहणांत तूं पदोपदीं अडथळे आणतोस. यानेंच तूं कर्मबंधाचा म्हणजे पर्यायानें पापबंधाचा अधिकारी होतोस. तुझ्या वाणीचा उपयोग सज्जनांची स्तुति करण्यांत न होतां तिचा तूं निंदेसाठीं उपयोग करतोस, त्यांचा विनय न करतां जमेल तेथें अविनय करतोस. त्यांच्या गुणांची कधी स्तुति करीत नाहींस. या तुझ्या कृत्यांनीं तूं नित्य ज्ञानावरण आणि दर्शनावरण कर्माचा बंध बांधतोस. ज्ञानी माणसाबरोबर शत्रुत्व करणें, त्यांचा अनादर करणें, शास्त्रबाह्य बोलणें नि तसें वर्तन करणें या गोष्टीहि कर्मबंधाला कारणीभूत आहेत. तुला कर्मबंधांतून मुक्त होण्याची इच्छा असेल तर तूं ज्ञान, पूजा, कुल, ज्ञान, बळ, ऋद्धि, तप किंवा शरीर यांपैकीं कशाचाहि गर्व करतां कामा नये. कोणतीहि मूढता तूं अनुसरतां कामा नये. सम्यक् शास्त्रवचनावर नि:शंकपणें श्रद्धा, कोणत्याहि फलाची अनासक्तता, शरिरावरील ममत्वबुद्धि सोडणें, सज्जन पुरुषां-वरील कलंक धुवून काढणें, तपोमार्गापासून च्युत होणारांना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पुन्हा स्थिर करणें, सर्वांवर पुत्रवत् प्रेम करणें नि सम्यक् वचनांचा आदर करणें इत्यादि कृत्यांनीं कर्मबंध झटकून तूं मोक्षाचा अधिकारी होऊं शकतोस. ज्ञानी मनुष्य या मार्गानें आपली उन्नति करून घेतो; पण अज्ञानी मनुष्य याच्या उलट वर्तन ठेवतो नि आत्मोन्नतीच्या मार्गावर स्वतःच अनेक विघ्नें आणून ठेवतो.

★ ★ ★

– १५१ –

ज्ञानी आणि अज्ञानी यांच्या क्रिया सतत चालूं असतात. उठणें, बसणें, येणें, जाणें या क्रिया दोघेहि करतात; पण अज्ञानी मनुष्यास सुखदुःखाची फलप्राप्ति होते, आणि ज्ञानी मनुष्य मात्र त्यापासून अलिप्त राहतो. पाण्यांत शेवाळेंहि जन्मतें नि पाण्यांतून कमळहि निर्माण होतें; पण कमळ मात्र पाण्याचा स्पर्श टाळतें अन् शेवाळाला तो टाळणें अशक्य होतें. ज्ञानी आणि अज्ञानी संसारांतल्या सर्व क्रियांत भाग घेत असले तरी त्यांच्यांत किती महदंतर पडतें ? याचें कारण म्हणजे वरील क्रिया करीत असतांना अज्ञानी जीव त्या आसक्तीपूर्वक आणि रागद्वेषपूर्वक करीत असतो; पण ज्ञानी मात्र ही गोष्ट कटाक्षानें टाळतो. तो निरासक्त नि निष्काम बनून वावरतो नि अनेक क्रिया करतो. चिकट पदार्थानें जशा वस्तु एकत्र येतात, त्याप्रमाणें आसक्तीनें कर्मास्रव – कर्मबंध होत असतो; म्हणून ज्ञानी हा निरास्रवी म्हटला जातो. मिथ्यात्व, अविरति, कषाय आणि योग हे त्याच्या जवळ नसल्यानें त्याच्याकडे कर्माचा आस्रव होत नाहीं. ज्ञान्या-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कडे कर्मास्रव नसल्यानें त्याला कर्मबंधहि होत नाहीं; म्हणून तो अबंधक म्हटला जातो.

* * *

– १५२ –

ज्ञान हें स्वस्वरूपांत म्हणजे निर्विकल्प समाधीमध्यें किंवा निजानंद स्वरूपांत अन्तर्मुहूर्तापेक्षां जास्त वेळ राहूं शकत नाहीं. अन्तर्मुहूर्तानंतर सविकल्पदशा निर्माण होते. अशा अवस्थेंत कषाय भावांचे अस्तित्व असल्यामुळें ज्ञानगुण बंधाला कारण होतो. अशा वेळीं ज्ञानगुणाचें खरें स्वरूप बदलतें.

या बदलामुळें तुझी निर्विकल्प समाधि जास्त वेळ टिकत नाहीं. अशा वेळीं निर्विकल्प समाधि नसतांना तुला कर्मबंध होतात.

तुझं ज्ञान अजून अल्प आहे. जगांतील यच्चयावत् पदार्थांना जाणण्याचें सामर्थ्य अजून तुला लाभलेलं नाहीं. हेतुपुरस्सर तूं मनांत रागद्वेष आणीत नाहींस. कारण आसक्ति तूं काढून टाकली आहेस. असें असलें तरी अहेतुकपणें मनांत रागद्वेषभाव येतातच. अजाणपणें तूं मोहाला बळी पडतोस. त्यामुळें होणारें नुकसान थोडेंच टळणार आहे ? त्याचें फळ मिळणारच!

तरीहि तूं निराश होऊं नकोस. कैवल्याची प्राप्ति होईपर्यंत तूं तुझी साधना सोडूं नकोस.

* * *

– १५३ –

रे अंतरात्मन् ! तूं बांधलेलें कर्म म्हणजे पुद्गल द्रव्यांचें तुझ्यावरील मोठें कर्ज आहे असें जाण. हें एवढें कर्माचें ओझें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तूं सतत सहन करीत आहेस. अजूनहि तो पुद्‌गल कर्मांचा भार स्वतःचाच आहे असें समजून तूं वागतोस. पण हें अज्ञानामुळें होतें. सत्तेमध्यें असलेल्या कर्मांनीं सुखदुःखात्मक फळ दिल्यानंतर तूं जागा होतोस, पण त्या वेळीं तुझ्याकडून शुभाशुभ भाव प्रकट होतांच पुन्हा नवीन कर्मे बांधलीं जातात. तीं कोणत्या प्रकारचीं असतील, हें सारें तुझ्या त्या वेळच्या विचारांवर अवलंबून आहे. तुझी ज्ञानावरील आवरण काढून टाकण्याची क्रिया चालूं असेल तर तुझें ज्ञान अधिकाधिक विकसित होणार.

कर्मबंधांतून सुटतां सुटतांच हळुं हळूं विकास साधला जातो. हें कर्मबंधाचें ओझें संपूर्णतः नष्ट झालें, कीं कैवल्यावस्था प्रकट होते.

या कैवल्यावस्थेचाच तूं विचार कर. * * *

– १५४ –

तूं आतां सम्यक्‌दृष्टि झालास ! तुझी विकृत दृष्टि नष्ट झाल्याने संसारांतील दुःखापासून मुक्त करणाऱ्या वीतराग आणि केवली भगवानाकडे तूं आकृष्ट झाला आहेस. तूं आतां खोट्या देवाच्या भजनीं लागणार नाहींस, कुगुरूंचा सत्कार करणें आतां तुला आवडत नाहीं आणि लोकांच्या खुळचा कल्पनांवर तूं विश्वास ठेवीत नाहींस. ज्ञान, पूजा, कुल, शक्ति, तप, शरीर यांपैकीं कशाचाहि तुला गर्व नाहीं. तुला संसारांतील मोह आतां झुलवीत नाहींत. आपल्या कृतपापांची तूं मनःपूर्वक निंदा करतोस. सर्व जीवांकडे एकाच पवित्र भावनेनें पाहणारी समता तुझ्यांत आली आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– १५५ –

तूं अज्ञानी असतांना वत्सल भावना विसरून गेला होतास. स्वतःचा स्वार्थ साधण्यांतच तूं गर्क होतास; पण आतां आपल्या धर्मबांधवांकडे आणि त्यांच्या सुखदुःखांकडे तुझें लक्ष लागलें आहे. एवढेंच नव्हे तर तुझं हें प्रेम यच्चयावत् प्राण्याप्रत पोहोंचलें आहे. त्यांच्या सुखदुःखाचाहि तूं विचार करतोस.

सार्‍या जीवसृष्टीवर तूं आतां अनुकंपा करीत आहेस. तुझ्या दयेचें वर्तुळ वाढतच आहे. तें तुझ्या भोंवतींच वेष्टिलेलें होतें. पण आतां तें विकसित होत होत संपूर्ण विश्व व्यापून टाकीत आहे. जगांतील सर्व प्राण्यांप्रत तें जाऊन पोहोंचलें आहे. तुझ्या आत्म्याची ही विशालता जग हें कुटुंब आहे, या वसुधैव कुटुंबाच्या तत्त्वाप्रत पोहोंचली. त्यामुळे सर्व प्राणीमात्र सुखी कसे राहतील, सर्व निरामय कसे बनतील, सर्वांची दृष्टि सम्यक् कशी बनेल याचीच एकमात्र विवंचना तुला लागली आहे.

* * *

– १५६ –

सूर्याच्या प्रखर उष्णतेनें पाण्याची वाफ होणें, ती वर जाणें, थंड वातावरणांत येतांच तिचें ढगांत रूपांतर होणें, आणि त्यानंतर पृथ्वीवर जलवर्षाव होणें ही नैसर्गिक क्रिया आहे. कडक उन्हानें तोंड वासलेल्या शेतांनीं जल पिऊन तृप्त होणें, त्यांतून अनेक अंकुर बाहेर फुटणें, त्यांवर फुलें येणें आणि नंतर त्यांचें फळांत रूपांतर होणें, ही निसर्गक्रियाहि सतत चालू आहे. आकाशांतून पृथ्वीवर पडणाऱ्या जलबिंदूंतून सूर्यकिरण प्रवेश

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करतांच सप्तरंगी इंद्रधनुष्य आकाशाला तोरण बांधून आनंद द्विगुणित करतें. आत्म्याला कसण्याचें, नांगरण्याचें आणि दुःख देण्याचें कार्यंहि क्रोधादि विकार करीत असतात. आत्म्याला जो डूब देतो तो कषाय. कषाय म्हणजे शत्रू ! * * *

– १५७ –

जितका रंग गडद व पक्का तितकाच तो अधिक काळ वस्त्रावर राहतो; तीच गोष्ट क्रोधादि विकारांची. हे विकार जितके तीव्र तितकी विचारविकृति जास्त. जितके हे विकार कमी तीव्र तितकी विकृति कमी. यासाठीच विकाराच्या उद्रेकाच्या वेळीं मनःशांति न भंगूं देण्यासाठीं योगी प्रयत्न करीत असतो. विकारानें आत्म्याची दुर्बलताच प्रदर्शित होत असते. असें तो विचारी माणूस जाणतो. अविवेकी माणसाला मात्र त्या विकार प्रदर्शनांत फुशारकी वाटत असते.

असा अविवेक तूं करूं नकोस. * * *

– १५८ –

हें ज्ञानविज्ञानाचं युग आहे. अश्वयुगापासून उपग्रह युगापर्यंतची विज्ञानाची ज्ञान-प्रगति पाहून तूं आश्चर्यचकित झालास! जगांतील सर्व लोकांना विज्ञानानें आश्चर्याचे अनेक धक्के दिले. अनेक शोधांची सुसंगत माहिती देणं हें विज्ञानाचं कार्य असं अनेकांना वाटतं ! पण प्रचंड शक्तीचा साठा असलेल्या विज्ञानानें केवळ भौतिक शोधांचीच माहिती पुरवावी यापेक्षां विज्ञानाचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अधिक पराभव कोणता ? केवळ जड पदार्थांकडेच वेळ खर्चं करून आत्म्याकडे दुर्लक्ष झाल्यास विज्ञानाचा काय उपयोग ? भौतिक पदार्थांचीं अनेक गूढ स्वरूपं समजणं जितकं आवश्यक, त्यापेक्षां आत्म्याचं गूढ स्वरूप समजून घेणें नि त्याच्या विकासाचा मार्ग दाखविणें हें महत्त्वाचें नि अगत्याचें आहे भौतिक शास्त्रांच्या निर्मितीनें जगाचा विनाशकाल अति वेगानें पुढें पुढें येत आहे.

विनाशाचीं यंत्रें नि आयुधं शोधण्यांत काय पौरुषत्व आहे ? मरण्याची नि मारण्याची कला काय या विसाव्या युगांतच निर्माण झाली ? ती तर अनादि कालापासूनच लोकांना ज्ञात आहे. पण ज्ञानाचं म्हणजे आत्म्याचं व क्रोधाचं म्हणजे जडाचं स्वरूप वेगवेगळें आहे, हें ओळखण्याची भेदनीति ज्यायोगें कळेल तें खरें विज्ञान ! आत्म्याच्या ठिकाणीं होणारी कलुषता किंवा मलिनता का निर्माण होते आणि आकुलता, संकल्प विकल्प इत्यादि कशाचीं स्वरूपं आहेत हें ओळखणं विज्ञानाचं कार्य असलं पाहिजे ! जन्म घेणें नि मरणें ह्या गोष्टी तर नित्य चालूच आहेत; पण जन्ममरणाचा फेरा चुकविणारें शास्त्र म्हणजेच खरें विज्ञानशास्त्र होय. हेंच ज्ञानाचं नि विज्ञानाचं सम्यक् कार्य होय.

* * *

– १५९ –

कोणत्याहि वस्तूचं स्वरूप जसं आहे तसं जाणणं हे सम्यक् ज्ञानाचं कार्य होय. सम्यक् ज्ञानाचं तें एकमेव लक्षण आहे. हें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्याचं स्वरूप कोणत्याहि परिस्थितींत बदलणार नाहीं. तप्ताग्नींत सुवर्णकारानं सोनं घातलं आहे, अग्नीचा प्रचंड ताप असूनहि सुवर्ण आपला स्वभाव सोडीत नाहीं. उलट आपल्यांतील कळकटपणा काढून तें स्वतःस अधिक तेजस्वी बनवितं. ज्ञानी पुरुषहि तीव्र कर्मांचा उदय असूनहि प्रचंड तपाग्नींत स्वतःचीं कर्में जाळून टाकतो नि त्यापासून आत्म्यास मुक्त करतो. कर्मातीत आत्मा मलिनतारहित सुवर्णाप्रमाणें तेजस्वी दिसूं लागतो. जीव कर्मांनीं वेष्टिला गेला तरी तो कर्मस्वरूपाचा होत नाहीं. तो ज्ञानस्वरूपीच बनणार. अनंत विरुद्ध कारणं आलीं तरी तीं कोणत्याहि द्रव्याचं स्वरूप बदलणार नाहींत. म्हणूनच 'स्वभावो दुरतिक्रमः' असं म्हणतात. स्वभाव वस्तूपासून अलग केल्यास वस्तूचा नाश होईल. पण वैज्ञानिक सिद्धांत असा आहे कीं 'जी वस्तु एकदां अस्तित्वांत आली आहे तिचा संपूर्ण विनाश घडत नाहीं. ती कोणत्या ना कोणत्या तरी अवस्थेंत राहणारच.'

* * *

– १६० –

ज्ञानी कर्मांनीं व्याप्त झाला तरी तो रागरूप, द्वेषरूप, मोहरूप होत नाहीं. तो सतत शुद्धात्मस्वरूपांतच लीन असतो. त्याच्या शारीरिक हालचाली देखील मर्यादित राहतात. भोगाच्या प्रवृत्तीस रोखून तो गुप्ति पाळतो. तो मन ताब्यांत ठेवील, अस्थिर मनावर नेहमी चांगल्या विचारांनीं नियंत्रण ठेवील, हित मित आणि प्रिय असंच वचन तो उच्चारील किंवा मौन स्वीकारून वचनयोग रोखील. तसेंच शारीरिक हालचाली रोखून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यावरहि तो ताबा प्रस्थापित करेल. म्हणजेच विषयाभिलाषा सोडून आणि ख्याति, पूजा, लाभ, अभिमान या विषयांची आकांक्षा त्याग करून तो मन, वचन आणि काय यांच्या व्यापाराला रोखेल.

हें विकार रोखण्याचं कार्य तूं नियमित करावं. मनावर ताबा मिळवावा, आपल्या वचनशक्तीवर ताबा मिळवावा हेंच तुझें कार्य आहे. त्यांत तूं सफळ व्हावें व स्वतःचा मार्ग मोकळा करून घ्यावा.

* * *

– १६१ –

इष्ट पदार्थांचा वियोग आणि अनिष्ट पदार्थांचा संयोग झाला कीं अज्ञानी मनुष्य गडबडून जातो नि त्यानंतर त्याच्या ज्या अज्ञानमूलक क्रिया होतात त्यामुळें तो दुःखपरंपराच निर्माण करतो. अनिष्ट पदार्थांचा संयोग झाला कीं त्याच्या मनास शांति अशी लाभत नाहीं. तो अनिष्ट पदार्थांचा संयोग नाहींसा करण्यासाठींच झटत राहील, नेहमीं त्यासंबंधींचे विचारच त्याच्या मनांत घोळत राहतील. या चिंतनास अनिष्टसंयोगज नांवाचें पहिलें आर्तध्यान म्हणतात. अनिष्ट पदार्थ चेतन किंवा अचेतनहि असतील. शत्रू, सर्प, वाघ, सिंह, कजाग स्त्री किंवा दुर्गंध-शरीरी स्त्री यांचा संयोग अनिष्टच ! वरील सर्व पदार्थ चेतन आहेत. यांपैकीं कशाचीहि प्राप्ति झाली तरी मनाचे परिणाम बिघडतात. यावेळीं मनुष्य क्रोधी, रागीट, भयभीत किंवा संतप्त होईल.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– १६२ –

सतत अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत वीर्य आणि अनंत सुख यांत मग्न झालेला आत्मा शुद्ध आत्मा जाणावा. या शुद्धात्म्याप्रत कोण जातो ? शुद्ध आत्म्याचं स्वरूप जाणणारा आणि त्याचा अनुभव करणारा आत्माच शुद्ध आत्म्याप्रत जातो. ज्ञानी जीव आत्म्यामध्यें स्थिर असतो. त्याला विचार-विकृति स्पर्शूं शकत नाहीं, विकल्पांना तिथें थारा नसतो. अशी स्थिरता आत्मचिंतनांत होत असते म्हणूनच तो अशुद्ध होत नाहीं.

हें आत्मचिंतन अविच्छिन्न स्वरूपाचें असलें तर ज्ञानविकृति कधींच संभवत नाहीं. अशी अवस्था प्राप्त व्हायला हवा असणारा इंद्रियनिग्रह व क्रोधादि विकारांचा नाश हें मात्र आवश्यक आहे. ★ ★ ★

– १६३ –

इच्छा हाच तुझा परिग्रह ! अभिलाषा हाच तुझा मोठा संघ ! आत्म्याचं दर्शन होऊं देण्यांत यांचाच मोठा अडथळा येतो. आत्मप्रगतीपथांतले हे मोठे अडथळे होत. त्यांचा त्याग केल्याशिवाय आत्म्याप्रत जाऊन त्यांचं दर्शन घेणं शक्य होत नाहीं. माणसाची आसक्ति चेतन पदार्थांवर आणि अचेतन पदार्थांवर जडत असते. म्हणजे स्त्री, पुत्र, धन, धान्य, मित्र इत्यादिकांवरील आसक्ति बाह्य स्वरूपाची आहे. क्रोध, दान, माया, लोभ इत्यादि विकार अंतरंग स्वरूपाचे आहेत. या दोन्हीवरील ममत्व कमी करून तूं आत्म्याचं दर्शन घे. ★ ★ ★

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– १६४ –

रे अंतरात्मन्! अनादिकालापासून वेगानें वाहणाऱ्या कालप्रवाहांत कोणती गोष्ट स्थिर राहिली आहे? राजाची सत्ता, उन्मत्तांचा उन्माद, सुंदरीचं सौंदर्य, योद्धयाचा पराक्रम, पुरुषाचं कर्तृत्व इ० सर्व गोष्टींना बंधन आहेच ना? यांपैकीं एक तरी गोष्ट कधीं स्थिर राहिली आहे? क्षुब्ध महासागरांत हेलावत जाणाऱ्या बोटीप्रमाणें संसार सागरांतील प्रत्येक गोष्ट अस्थिर नि विनाशी आहे. अंत:करणांतील आशंचा उमाळा उफाळून वर येतांच मनुष्य नाना गोष्टींची निर्मिति करतो. पण क्षणभंगुर वस्तूंना नित्य मानून व्यवहार करण्याची त्याची प्रवृत्ति असल्यानें त्याच्या डोळ्यांदेखत त्या वस्तूंचा विनाश होतांच तो दुःखी होतो. मानवी जीवन आणि त्याच्या आशा शेख महंमदानें लाथ मारतांच ठिकऱ्या ठिकऱ्या उडालेल्या कांचेच्या भांड्याप्रमाणें असतात! निराशेच्या वज्रप्रहारानें त्या आशा भंग पावतात नि त्यांचे अनेक तुकडे पडतात. पाण्यांतल्या बुडबुड्याप्रमाणें हीं मानवीं जीवनं आहेत. विषयोपभोग आणि राज्यें कांचेच्या भांड्याप्रमाणें आहेत. मानवानें आतांपर्यंत आशेनें निर्माण केलेल्या अनेक भव्य कलाकृति भुईसपाट झाल्या आहेत. पृथ्वीवरील प्रत्येक वस्तु पृथ्वीवरील धुळीला येऊन मिळत असते. मनुष्याचा मृत्युक्रम तरी काय सांगतो? जन्मास यावें, धष्टपुष्ट व्हावें व पुनश्च नाशाप्रत जावें अशी प्राणधारी संसारी जीवांची परिपाठी आहे. यापैकीं स्थिर असे कोणीच राहिलेले नाहींत. म्हणून रें आत्मन्! तूं विनाशी देहाचं नि विषयो-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पभोगाचं चिंतन न करतां अक्षय नि नित्य अशा चिरंतन आत्म्याचं ध्यान कर. इद्रियाचे विषयोपभोग कमीअधिक काळ-पर्यंत राहून देखील शेवटीं खात्रीनें नष्ट होतात. ज्या गोष्टी नष्ट होतात त्यांचा आपण होऊन त्याग करण्यांतच अर्थ आहे. तसं केल्यास कर्मबधांतून आणि संसाराच्या परिभ्रमणांतून मुक्ति तरी होईल. विषयोपभोगांचा त्याग केला नाहीं तर शेवटीं तें सोडून जातातच.

* * *

– १६५ –

या जगतांत शरणभूत असें कांहीहि नाहीं. आप्त, बंधु, पुत्र, भार्या, माता, पिता हे सारे सुखाचे सोबती ! संकटाच्या वेळीं यांपैकीं कोणाचाहि आधार नसतो हें जगांतलें कटु सत्य आहे. शेतात पिकें आहेत, तोंपर्यंत पांखरें येतात हें तुला ठाऊक नाहीं ? गूळ आहे तोंपर्यंत मुंग्या येतात, हेंहि तुला ठाऊक आहे. जगांतील कुणीहि या तत्त्वाला अपवाद नाहींत.

* * *

– १६६ –

जग ही रंगभूमि आहे, आणि तूं नटाप्रमाणें अनेक वेषांनीं इतस्ततः भ्रमण करीत आहेस. एकच नट कधीं योगी होतो नि कधीं त्यागी होतो, तो कधीं संन्यासी होतो तर कधीं दरोडे-खोर होतो, तो कधीं एखाद्या स्त्रीचा मुलगा होतो तर कधीं तिचाच नवरा होतो. नटाच्या बाबतींत ह्या गोष्टी दिसून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

येतात. तूं देखील जगाच्या रंगभूमीवर अनेक सोंगं घेऊन वावरत असतोस. पापोदयामुळें तूं तिर्थंच आणि नरकगतींत जन्म घेतोस तर पुण्योदयामुळें मनुष्य नि दैवगतींत जन्मतोस. कधीं पुरुषरूपानें तर कधीं स्त्रीरूपानें वावरतोस. कधीं देव तर कधीं देवी! कधीं पशु तर कधीं कीटक! या संसारांतील पुद्‌गल पदार्थांमध्यें असा एकहि पदार्थ नाहीं कीं ज्याचा तूं वारंवार उपभोग घेतला नाहींस.

* * *

– १६७ –

हें शरीर अनित्य आहे, पण तूं मात्र नित्य आहेस. शरीर अपवित्र आहे, पण तूं मात्र मूलतः पवित्र आहेस. शरीर तर अचेतन आहे; पण तूं मात्र चेतनस्वरूप आहेस. त्याज्य वस्तूंमध्यें तुझी बुद्धि आपोआप प्रवृत्त होते; परंतु उपादेय-शुभ कृत्यांमध्ये अहर्निश प्रयत्न करूनहि तुझी बुद्धि प्रवृत्त होत नाहीं याला कारण अज्ञानभावच आहे. कर्मच आपल्याला शुभ किंवा अशुभ कार्यांमध्यें प्रवृत्त करतें. शुभ कर्मोदय असेल तर मनःप्रवृत्ति शुभ कार्याकडे होते व अशुभ कर्मोदयामुळें पाप कृत्याकडे वळते.

* * *

– १६८ –

परद्रव्यांचा भोग घेत असतां जीवाला सुखरूप अथवा दुःखमय भाव निश्चित होतात. हे भाव परद्रव्यांच्या निमित्तानें होतात. वेदनीय कर्माचे साता व असाता असे दोन भेद आहेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

साता वेदनीय कर्माच्या उदयानें सुख निर्माण होतें. या सुख-दु:खाचे भाव जेव्हां निर्माण होतात तेव्हां मिथ्यादृष्टीच्या ठिकाणीं रागादिक निर्माण होतात.

या वेळेस पूर्वसंचित कर्मांचीं निर्जरा होत असली तरी तिला निर्जरा म्हणत नाहींत. कारण रोगजन्य निर्जरा नवीन कर्मबंधाला कारण ठरते. या उलट सम्यक्‌दृष्टि जीवांचें उदाहरण देतां येईल. त्याचीं पूर्वसंचित कर्में उदय पावून सुखदु:ख देतात; पण त्यावेळीं सम्यक्‌दृष्टीच्या ठिकाणीं अनासक्त भाव असल्यानें उदय पावून निघून जाणारीं कर्में नवीन कर्मबंधास कारण ठरत नाहींत. म्हणून सम्यक्‌दृष्टि जीवाचीं कर्में निघून जाण्याच्या कृतीसच निर्जरा म्हणतात.

कर्माला भोगत असतांहि कर्में न बांधलीं जाणें हें ज्ञाना-नेंच शक्य आहे. ज्ञानाच्या बाबतींत ह्या क्रिया सहज घडून येतात यांत आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. * * *

– १६९ –

हे अनासक्त ! भोग भोगूनहि तूं अभुक्त राहतोस ! विष हें किती भयंकर असतं ! त्याच्या प्राशनानें मृत्यु सत्वर हजर होतो. पण विषवैद्यानें तें प्राशन केलं तर त्यानें तो मरत नाहीं, हीं गोष्ट सर्वांना ठाऊक आहेच. कारण अनेक मंत्र, तंत्र आणि विषमारक औषधांनीं तो स्वत:चें रक्षण करतो नि विषालाच मारतो. त्याचप्रमाणें अज्ञानाच्या बंधाला कारण असलेल्या कर्माच्या उदयाचें फल भोगीत असतांना देखील ज्ञानी आपल्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्ञानाच्या प्रभावानें रागादि भावांचा नाश करून नवीन कर्म-बंधाच्या शक्तीला रोकतो. ही सारी ज्ञानाची किमया आहे.

* * *

– १७० –

रे ज्ञानी ! कोणी पुरुष विषयांचें सेवन करीत असतांना देखील अभुक्त म्हणविला जातो. आणि कोणी पुरुष विषयांचें अजिबात सेवन न करतांहि भोक्ता म्हणविला जातो. ही घटना तुला आश्चर्यकारक वाटेल. एखाद्या व्यापाऱ्याचा नोकर दुकानांतील सर्व व्यवहार पाहतो. पण नफा-नुकसानीचे सर्व परिणाम मालकावर होतात. मालक प्रत्यक्ष कांहीच काम करीत नसतांनाहि नफ्याच्या आसक्तीमुळें आणि नुकसानीच्या दुःखामुळें त्यासच कर्मबंध होतो. नोकराला मात्र कर्मबंधच नाहीं. कारण त्याच्याजवळ कसलीच आसक्ति नसते. तो कोणत्याच विकाराला बळी पडत नाहीं.

* * *

– १७१ –

सम्यक् दृष्टीला नियमानें ज्ञान व वैराग्य ही शक्ति असते. त्या द्वारें तो सतत आपल्या स्वरूपाचें व ज्ञानाचेंच ग्रहण करतो. परद्रव्याचा मात्र कटाक्षानें त्याग करतो. कारण त्याचा आत्म्याशीं नैसर्गिक संबंध नाहीं हें त्याला ठाऊक असतें. त्याची दिनचर्या ज्ञान व वैराग्य यांवरच अधिष्ठित असते. प्रातःकालीं जाग येतांच त्याला आत्म्याचें चिरंतन स्वरूप आठवेल; आत्म-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रभूचीच तो भक्ति करील. सर्व विकार साफ करून ज्ञानाचे विचारच तो आपल्या मनांत आणील. झाडणीनें केर नाहींसा व्हावा त्याप्रमाणें तो आपल्यांतील सर्व दुर्गुण भेदज्ञानानें झटकून टाकील.

जो आत्मस्वरूपाला जाणत नाहीं, तो दुसऱ्याला कसें जाणील ? जो आत्म्याला जाणतो तोच पराला जाणतो. भौतिक संशोधन कितीहि झालें आणि भौतिक सुधारणांचे अनेक शोध लागले तरी आत्म्याचें पूर्ण संशोधन होऊन त्याला ओळखण्याचा शोध जोंपर्यंत लागत नाहीं, तोंपर्यंत पौद्गलिकांचें संशोधनहि अपुरें पडतें. परद्रव्याच्या म्हणजे पौद्गलिक अणुपरमाणूंच्या संशोधनानें पुद्गलाचें पूर्ण ज्ञान होईल व त्यायोगें नंतर आत्म्याचें ज्ञान होईल, हें म्हणणें खोटें आहे. * * *

– १७२ –

तूं अत्यंत शुद्ध असून, चैतन्यमय आहेस. तो आत्मा तुझ्या शांतीचें आणि विश्रामाचें स्थान आहे. तुझें विश्रामधामहि तोच आहे. परद्रव्यें आणि परद्रव्यांपासून होणारे विकार हे कांही तुझे विकल्प नव्हेत.

हा पहा महंत ! दारू पिऊन तो उन्मत्त झाला आहे. आणि उकीरडयावर झोंपला आहे. दारूच्या नशेंत सतत बडबड करीत आहे. त्याचे लोक त्याला जाग आणण्याचा प्रयत्न करीत आहेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अशा घाणींत बेशुद्ध होऊन कां लोळतोस ? सुवर्णानें मढविलेलें सिंहासन तुझें स्थान असतांना उकिरडयावर कां लोळतोस ?

* * *

– १७३ –

रागादि कषाय भावांतच पुन्हा आनंद वाटतो. त्यांतच तूं गढून गेलास. कषायांनीं निर्माण होणाऱ्या दुःखरूपी अंधःकारांतच तूं मग्न झाला आहेस. तुझं शुद्ध स्वरूप शुद्धान्दमय आहे. त्यांत तूं कां रमत नाहींस ?

अज्ञानाच्या महारोगानें तूं जर्जर झाला आहेस. यामुळंच तूं निःसत्त्व नि अशक्त झाला आहेस, ही तुझी दयनीय अवस्था माझ्यानें पाहवेना. हा अज्ञानभाव सोड. तो अस्थायी आणि नाशवंत आहे. पण तूं नित्य आणि अनश्वर ज्ञानभावांत स्थिर रहा. तोच तुझा स्थायीभाव आहे. तूं त्याचाच स्वाद घे. असं ठिकाण तूं शोधून काढ कीं जेथें तुला स्थिर आनंद व विराम मिळेल. नाना संकटांनीं आणि व्याधींनीं भरलेलं ठिकाण तुला किती उपयोगी पडणार आहे ? तूं सध्यां आत्मविन्मुख झाल्यानें तुझें ठिकाणहि संकटांचं माहेरघर बनलं आहे; आकुलतेची जननी बनलं आहे अत्यंत निरामय आणि निर्विघ्न असं ठिकाण म्हणजे तुझा कर्मातीत आत्मा होय. असं कर्मातीत ठिकाण ज्यानं मिळविलं आहे तो ज्ञानानंदांतच मग्न असतो. त्याची गोडी अनंत कालपर्यंत चाखत असतो.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– १७४ –

मतिज्ञान, श्रुतज्ञान, अवधिज्ञान, मनःपर्ययज्ञान आणि केवलज्ञान हे ज्ञानाचे भेद असले तरी ज्ञान एकच आहे. कैवल्य हेंच परिपूर्ण ज्ञान आहे. त्याच्या अस्तित्वांत इतर चार ज्ञान, प्रकारांचा लोप होतो. हात, पाय, डोकें, पोट, पाठ इ० वेगवेगळीं नांवें असलीं तरी एकाच शरिराचे ते सर्व घटक आहेत. त्याचप्रमाणें मति, श्रुति, अवधि इत्यादि 'ज्ञान' या नांवानेंच ओळखले जातात. कैवल्यच तुझें खरें धन, कैवल्य म्हणजे पूर्णत्व-कैवल्य म्हणजे चिरशांति ! कैवल्याच्या प्राप्तीनं त्रिभुवनें क्षुद्र वाटतात. सारे विकार विचार लोप पावतात. अशा कैवल्याचा तूं धनी हो !

★ ★ ★

– १७५ –

तुझ्या संपूर्ण कर्मांचा क्षय व्हावा असें वाटत असेल तर मोक्षाची प्राप्ति करून देणाऱ्या ज्ञानालाच ग्रहण कर. ज्ञाना-पासून पराङ्मुख झालेले लोक पुष्कळ क्रियाकांड करून देखील क्षय न करतां वृद्धीच करीत असतात. अज्ञानानें चाललेला हा त्यांचा खटाटोप व्यर्थ होय. सूर्य उगवतांच अंधार जसा पळून जातो, त्याप्रमाणें ज्ञान प्राप्त होतांच कर्मांधःकार नष्ट होतो. ज्ञानशून्य लोक ज्ञानाचरण, महाव्रत, दान, पूजा, सेवा, त्याग, इत्यादि क्रिया करून देखील आत्मपदाला प्राप्त होत नाहींत. त्यामुळें कर्मांच्या जाळ्यांतून त्यांची सुटका होत नाहीं. कर्मातीत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होण्याची इच्छा धरणारांनीं फक्त ज्ञानमार्गाचेंच अवलंबन केलें पाहिजे. त्यायोगेंच मोक्षपदाची प्राप्ति होते.

* * *

– १७६ –

बाह्य अवडंबरामध्यें कालाचाच व्यर्थ विनियोग कां करतोस ? कीर्तीसाठीं दान देतोस; धार्मिक म्हणून मिरविण्यासाठीं पूजा करतोस, देशभक्त म्हणून वदवून घेण्यासाठीं सेवेचें ढोंग करतोस, अनेक दिवस उपवास करून, खडतर तपश्चर्या करून व शरिराला कष्ट देऊन महातपस्वी म्हणवून घेतोस. औषधालयें आणि पाठशाला उघडून नांवलौकिक मिळवितोस; पण या सर्व क्रिया कीर्तीच्या हव्यासावर अधिष्ठित आहेत, त्यामुळें त्या ढोंगीपणाच्या ठरतात. हें सर्व बकध्यान ठरतें. यांत तुझी स्वतःची फसवणूक आहेच; पण दुसऱ्याचीहि फसवणूक होते. पण निरासक्त आणि ज्ञानपूर्वक या गोष्टी करशील तर अनेक जन्मांत सांचलेलीं तुझीं सर्व कर्में भस्मसात होतील.

* * *

– १७७ –

ज्ञानी पुरुष कोणता संकल्प बाळगतो तें मी तुला सांगतें, तो म्हणतो–

"माझा आणि परद्रव्यांचा कांहीच संबंध नाहीं. परद्रव्यास मी माझा परिग्रह मानला तर माझं अस्तित्व नष्ट पावेल आणि अजीव होईन. परंतु मी तर ज्ञाता आहे. अजीवद्रव्य ज्ञाता नाहीं. म्हणून परद्रव्य माझा परिग्रह नव्हे. जर मी अजीवास ग्रहण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करीन तर अजीव माझें 'स्व' बनेल. जें 'स्व' असेल त्याचाच मालक होतां येते. अजीवास मी 'स्व' मानलें तर मी अजीवाचा मालक बनेन. तसं झालें तर माझ्यांतील ज्ञान-दर्शन लुप्त पावून माझ्यांत जडत्व निर्माण होईल. म्हणून ज्ञायक-स्वभाव हेंच माझें 'स्व' आहे. म्हणून मी ज्ञायक स्वभावाचा स्वामी आहे. पर-द्रव्यांचें ग्रहण किंवा त्यांचें स्वयित्व मी स्वीकारणार नाहीं, हा माझा दृढनिश्चय आहे.

★ ★ ★

– १७८ –

जीवाचा भाव तर जीवच आहे जीवांचा स्व-स्वामीसंबंध आहे. जीवाला अजीवाचा परिग्रह मानतां येणार नाहीं. परमार्थानें जीवाला अजीवाचा परिग्रह मानणें मिथ्या आहे. ज्ञान्याला अशी मिथ्या बुद्धि नसते. तूंहि सम्यक् ज्ञानाचा नायक हो !

★ ★ ★

– १७९ –

या अनंत कालप्रवाहांत कोणती वस्तु नित्य टिकून राहिली आहे ? उत्पत्ति, वाढ आणि विनाश या गोष्टी सर्व वस्तूंना लागू पडतात. जगांत अनेक राज्यें स्थापिलीं गेलीं आणि त्यांचा विनाशहि झाला. नदीला आलेला पूर ओसरूनहि जातो. नवीन निर्माण झालेली संस्कृति नष्टहि पावते. दिमाखानें उभ्या असलेल्या इमारतींना एके दिवशीं रसातळांस यावेंच लागतें. म्हणून या जगांतील कोणतीहि परवस्तू नष्ट झाली तर तुला शोक मानण्याचें काय कारण आहे ? वस्तु अनेक रूपांनीच वावरत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असतात. तेव्हां त्यांचें एकच एक रूप कायम राहणार नाहीं. हे उघड सत्य आहे. म्हणून त्यांच्या प्राप्तीनें हर्ष व त्यांच्या वियोगानें खेद मानण्याचें कांहीच कारण नाहीं. तो सृष्टीचा कायदाच आहे. जें लयास जात आहे त्यास प्रेमानें निरोप दे !

* * *

– १८० –

इच्छा हाच परिग्रह आहे. तीव्र इच्छेचा मनुष्य तीव्र परिग्रही होय ! ही तीव्र इच्छाच संसाराला कारणीभूत आहे. साठा करणें पापजनक ठरणार नाहीं; पण परिग्रहाविषयीं वासना बाळगणें पाप ठरेल. ही वासना अनेक दुःखांना कारणीभूत आहे. वासना अज्ञानाच्या पोटीं जन्म घेत असते. परंतु ज्ञान्याचीं प्रत्येक क्रिया ज्ञानपूर्वक असल्यानें तो अज्ञान आणि अज्ञानजन्य वासना यांना मुळींच थारा देत नाहीं. वासनांच्या ऐवजीं त्यास ज्ञानमय भावच होत असतात. म्हणूनच तो शुद्धोपयोगरूप निश्चय धर्माला सोडून अज्ञानमय पुण्यस्वरूप किंवा पापस्वरूप धर्माचा अंगीकार करीत नाहीं. शुभ किंवा अशुभ कृत्यें वासनेचीं फळें होत हें तो जाणतो.

* * *

– १८१ –

या जगांत अन्यायाची आणि पापाची जर कोणाला भीति वाटत असेल तर ती ज्ञानी पुरुषालाचं होय. विषय-कषायांना बळी पडून तो कोणतेंहि अनुचित कृत्य करणार नाहीं. कोणत्याहि प्राण्याची तो हिंसा करणार नाहीं ! चुकून देखील तो खोटं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बोलणार नाहीं. कोणाचीहि मालमत्ता गडप करणार नाहीं. परस्त्रियांकडे वाईट नजरेनें पाहणार नाहीं आणि परिग्रहाचा संग्रह करणार नाहीं. तो स्वतःची किंवा दुसऱ्याची फसवणूक करणार नाहीं. ज्यायोगें अहंकार वाढेल, दंभ वाढेल व ईर्षा आणि असूया निर्माण होईल. असें कांहीहि तो करणार नाहीं. तो नेहमीं आत्मस्वरूपांत लीन असतो. सप्त व्यसनांत बुडून आत्मनाश ओढवून घेणारे थोडे का अज्ञानी जीव आहेत ? पण ज्ञान्याच्या हातून अशीं दुष्कृत्यें घडणार नाहींत. त्यांचं जीवन नीतीच्या पायावर अधिष्ठित असतें. संसारांत तो सदैव सावधान असल्यानें त्यांचीं सर्वच कर्में सफल होतात. * * *

– १८२ –

इच्छा किंवा वासना म्हणजेच परिग्रह ! ही वासना नटाप्रमाणें अनेक सोंगें धारण करते. कधीं ती रागाच्या रूपानें व्यक्त होईल तर कधीं तो क्रोधरूपानें दिसेल. मान, माया किंवा मोह या रूपांनीं तिचा कधीं कधीं उद्रेक होईल. मन–वचन आणि कामयोग यानें देखील वासनेची निर्मिति होते. सुंदर नि उन्मादक दृश्यें पाहण्यासाठीं वासना दृष्टींत येऊन व्यक्त स्वरूप धारण करील तर कधीं उन्मादक सुगंधाकरितां घ्राणेंद्रियाद्वारें कार्य करील. स्पर्शासाठीं किंवा मिष्टान्न सेवनाकरितां वासनेचा उद्रेक होईल. याशिवाय वासनेमुळें प्रत्येक समयाला होणारे विभाव परिणाम तर असंख्य आहेत. या सर्वांना परिग्रह समजून ज्ञानी पुरुष त्यांचा त्याग करतो. त्यांची तो निर्मिति होऊं देत नाहीं. * * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– १८३ –

जेथें इच्छा आहे तेथें अज्ञान आहे. ज्ञान्याला तर अज्ञान-भाव नसतात. तो ज्ञानभावाचाच उपासक असतो. त्यास अज्ञानजन्य इच्छा नसल्यानें भुकेची जशी वासना नसते तशीच कोणतेंहि पेय पिण्याची इच्छा होत नाहीं. पण कर्मोदयानें पेय पदार्थाचें प्राशन करतांना त्यास ज्ञानस्वभावाचेंच प्राशन कर-ण्याची इच्छा होते.

भरत चक्रवर्ती आपल्या शंभर मुलांबरोबर प्रातःकाळीं दुग्धपान करीत असे. त्यावेळेस तो सर्वांशीं विनोद करीत असे नि आनंदानें वार्तालापहि करीत असे. पण त्याच्या गप्पा ज्ञान-स्वरूपाच्याच असत. कोणत्याहि क्रिया करतांना तो आपला ज्ञान-स्वभाव दृष्टिआड करीत नसे बालकांप्रमाणेंच त्याचे भाव निर्मळ नि पवित्र होते. आपल्या मुलांकडे पाहतांनाहि त्याच्या डोक्यांत विचार येत. 'हीं दुग्धपान करणारीं बालकें हळूहळू सुविचारांचें पान करतील आणि ज्ञानस्वरूपी बनतील. दुधानें ज्याप्रमाणें यांचीं शरीरें पुष्ट होतील, तसेंच सुविचारानें त्यांचीं मनें पुष्ट बनतील. वीतराग धर्माची उज्वल परंपरा तीं चालवतील.

* * *

– १८४ –

आज ज्या कारणांमुळें पदार्थांचा जसा संयोग झाला आहे तसाच त्यांचा वियोगहि होणार! अनंत ध्येयासक्ति उराशीं बाळगून आणि अनंत आशा मनांत बाळगून मनुष्य अनेक पदा-र्थांचा संग्रह करतो; पण जेव्हां प्रयाणकाल येऊन ठेपतो त्यावेळीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यांच्या वियोगाच्या दु:खानें अज्ञानी मनुष्याच्या अंत:करणांत किती कालवाकालव होते ! पण ज्ञानी मनुष्य परपदार्थांचा जितक्या सहजतेनें उपभोग घेतो तितक्याच सहजतेनें त्यांचा त्यागहि करतो. तो कोणत्याहि परवस्तूवर अवलंबून रहात नाहीं. आपल्या सहवासांत आलेलीं परद्रव्यें क्षणभंगुर असून जसा त्यांचा संयोग झाला तसाच त्यांचा वियोगहि होणार हें जाणून असतो वस्तूच्या मूळ स्वरूपाची कल्पना आल्यामुळें परपदार्थांच्या संयोग-वियोगानें तो सुखदु:ख मानीत नाहीं, म्हणून वर्तमान-कालांत त्याला कर्मबंध नाहीं. भूतकाल तर व्यतीत झालेला असल्यानें त्यावेळच्या कर्माचाहि बंध नाहीं. अन् सध्याच्या कृत्याबद्दल भावी फलाची आशा नसल्यानें भविष्यकाळींहि त्याला कर्मबंध नाहीं.

* * *

–१८५–

आत्म्यास वेदक आणि वेद्य असे दोन प्रकारचे भाव होतात. अनुभव करणाऱ्या भावास वेदकभाव म्हणतात, आणि अनुभव करण्यास योग्य असलेल्या भावास वेदभाव म्हणतात. हे दोन्ही भाव आत्म्यास एकसमयावच्छेदें न होतां क्रमाक्रमानें होतात. समयासमयाला त्यांची उत्पत्ति होते आणि समया-समयाला त्यांचा नाशहि होतो. पण आत्मा मात्र दोन्ही भावांच्या वेळीं नित्यच असतो. म्हणून ज्ञानी आत्मा दोन्ही भावांच्या वेळीं नित्यच आहे व तो दोन्ही भावांचा ज्ञाता आहे.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– १८६ –

मनुष्यास किती अन्नाची व किती जागेची आवश्यकता असते ? तसेंच त्याला किती वस्त्रांची आवश्यकता असते ? या प्रश्नांचीं उत्तरें तर फार थोडक्यांत येतील. पण या गोष्टींविषयीं मनुष्य अतिरिक्त वासना ठेवतो आणि स्वतःच संसार बंधाला कारण ठरतो. दिगंबरावस्थेंत राहून आत्मसाधना करणाऱ्या मुनींना कोणत्याच वस्त्रांची आवश्यकता भासत नाहीं. थंडी, ऊन, पाऊस, वारा या सर्वांवर त्यांनीं विजय मिळविलेला असतो. पण संसारी मनुष्य मात्र किती वस्त्रें सांठवितो आणि आसक्त बनून त्यांचा उपभोग घेतो. माणसाला कितीशा जागेची आवश्यकता आहे ? शेवटीं तो साडेतीन हात जागेंतच विश्रांती घेतो. पण जिवंतपणीं लोभानें अधिकाधिक जमीन तो बळकावतो, प्रत्येक वस्तूची हाव धरतो. पण ज्ञानी मात्र नियंत्रित जीवन जगतो. तो बाह्य परिग्रहांवर नियंत्रण ठेवतोच पण क्रोध, मान इ० अभ्यंतर परिग्रहांवरहि ताबा ठेवतो. तो अनेक संकल्प-विकल्पांनीं पसरलेला अफाट वृक्ष तयार करीत नाहीं. अशा रागाभावातीत अवस्थेंत त्यास नवीन कर्मबंध न होतां त्याच्या पूर्वबद्ध कर्मांचीं निर्जराच होते.

* * *

– १८७ –

रे अंतरात्मन् ! चिखलांत पडलेल्या सुवर्णावर परिणाम होत नाहीं. पण चिखलांत रुतलेल्या लोखंडावर मात्र अवश्य परिणाम होतो. त्यावर गंज चढतोच. तसेंच कर्मांनीं लिप्त

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

झालेल्यां ज्ञानी पुरुषांवर कर्मांचा कांही परिणाम होत नाहीं. पण अज्ञानी पुरुषांवर मात्र तो अवश्य होतो. कर्मलिप्त अज्ञानी पुरुष राग, द्वेष, क्रोध, मान, लोभ इ० विकारांना जन्म देतो. कर्मपंकानें तो माखला जातो. त्यामुळें पचेंद्रियांचे विषय भोगत असतांना त्यांतच तो रंगून जातो, आसक्त होतो. हा अज्ञानाचा दुष्ट परिणाम आहे.

* * *

– १८८ –

कांट्यानें कांटा काढावा त्याप्रमाणें ज्ञानी पुरुष कर्म भोगत असतांनाच त्याची निर्जराहि करतो. कर्मजन्य भोग तर कोणालाच सुटत नसतात. मनुष्याचें शरीर हें कर्मच आहे. तें आहे तोंपर्यंत अन्नसेवनाची हलनचलनाची क्रिया होणार ! या क्रिया झाल्या कीं नवीन कर्म येणारच ! नवीन कर्म न येऊं देण्याकरितां आणि असलेलें कर्म घालविण्याकरितां एक उपाय आहे. तो म्हणजे निरासक्त वृत्ति होय. त्यानें मात्र शरिराचे भोग भोगत असतांनाच कर्मावर विजय मिळवितां येतो.

* * *

– १८९ –

जग अनेक प्रकारच्या वैचित्र्यांनीं भरलेलें आहे. जगाच्या रंगभूमीवर चित्रविचित्र माणसांचा खेळ चाललेला आहे. त्यांत कोणी सुखी आहेत तर कोणी दु:खी आहेत, कोणी रंक आहेत तर कोणी राव आहेत. कोणी मोठे तर कोणी लहान, कोणी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कुरूप तर कोणी सुरूप ! हें वैचित्र्य त्यांना प्राप्त झालं याला कारण म्हणजे गतजन्मीं त्यांनीं केलेलीं कर्में हींच होत.

तुला कर्मफलाच्या वैचित्र्याचीं कांही उदाहरणें सांगतें. दुसऱ्यांनीं मिळविलेल्या संपत्तीवर नजर ठेवून ती हडप करण्याचा प्रयत्न करणारांना राजसेवक पकडतात व त्यांच्या गुन्ह्याप्रमाणें त्यांना दंड ठोकतात. कोणास फटक्याची शिक्षा मिळते, कोणास कैदेची शिक्षा मिळते, तर कोणास देहान्ताची शिक्षा मिळते. तसेंच राजाचे मर्जीप्रमाणें काम केल्यास राजा त्यास विविध सुखद वस्तु देतो. कोणास जहागिरी मिळते, कोणास इनाम मिळतें तर कोणास भरपूर पैसा मिळतो. ज्याच्या त्याच्या कृत्याप्रमाणें त्यास फळ मिळतं.

* * *

– १९० –

सर्व जीवांना फल देणारें कर्म म्हणजे राजा, अशी कल्पना कर ! चांगल्या किंवा वाईट कृत्यांबद्दल न्यायाधीश ज्याप्रमाणें शिक्षा फर्मावितो आणि गुन्हेगार नसणाऱ्यांना मुक्त करतो, त्याप्रमाणें कर्मरूपी राजा जीवाच्या बऱ्यावाईट कृत्यांबद्दल त्यांना शिक्षा देतो, शुद्धात्म्यापासून विलग होऊन अन्यायी कृत्यें करणाऱ्यांना कर्म वाईट फळच देणार ! म्हणूनच विषयासक्त होऊन भोग भोगणाऱ्यांना दरिद्रता, रोग, कुरूपता, अशक्तता इत्यादि दुःखें भोगावीं लागतात. अत्यंत दरिद्रावस्थेंत आयुष्य कंठणाऱ्यांनीं समजून असावें कीं गुन्हा करून तुरुंगवास भोगणाऱ्या कैद्याप्रमाणें कांही दिवस हें दुष्ट फळ भोगावेंच लागतें.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– १९१ –

ज्ञानी मनुष्य विषयसुखाच्या वासनेनें जर पुण्यकृत्यें करीत असेल तर तो पापानुबंधी (पापाला उत्पन्न करणारें) पुण्य मिळवील. पण त्यानें वासनेनें रहित होऊन दान, तप, व्रतादि क्रिया केल्या, तर मात्र तो पुण्यानुबंधी कर्म बांधील. ज्ञान्याच्या शुभ भावनेनें पुण्याचा बंध तुटतो.

ज्ञानी मनुष्य सदा आपल्या ज्ञानांतच मग्न असतो. कोणत्याहि क्रिया तो ज्ञानपूर्वक करतो. त्या क्रिया करीत असतां तो कोणत्याहि फळाची अपेक्षा करीत नाहीं. पण त्याच्या पुण्यक्रियांनीं बद्ध झालेलें कर्म आपलें कार्य करतेंच. त्यामुळेंच ज्ञानी उच्च कुळांत जन्म पावतो. त्यांतहि अत्यंत श्रेष्ठ अशींच पदें त्यास प्राप्त होतात.

* * *

– १९२ –

तूं आतां निर्भयी आणि निःशंक झालास ! सम्यक्त्वी जीवाच्या प्रगतिपथावरील पहिली धोंड म्हणजे शंका आणि तज्जन्य भीति ! मनुष्य जीवनाच्या प्रगतीसाठीं धडपड करीत असतो. या जगांत आपली अवनती व्हावी असें कोणत्या शहाण्या किंवा मूर्ख प्राण्याला वाटेल ? पण शहाणा मनुष्यच उन्नतीची वाटचाल करतो आणि मूर्ख मात्र मागे राहतो. मूर्खाच्या अवनतीचें मूळ कारण म्हणजे आपल्या अंगीकृत कार्यांत असलेली त्याची अश्रद्धा ! वस्तूच्या यथार्थ रूपावर अस-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लेली सम्यक् श्रद्धा म्हणजे कोणत्याहि प्रगतीचा भक्कम पायाच होय. हीच सम्यक् श्रद्धा मूर्खाजवळ नसल्यानें मूर्ख मनुष्य परागतीच करीत असतो.

* * *

– १९३ –

रे ज्ञानवंता ! ज्ञानी किंवा सम्यक्त्वी पुरुष निर्भय बनूनच व्यवहार करतो. पण यदाकदाचित् पूर्व कर्मामुळें भयाचीं कारणें उपस्थित झालीं तर तो त्यापासून कटाक्षानें अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतो. यावेळीं तो विचार करतो, ‘ माझ्या पूर्वबद्ध शुभाशुभ कर्माप्रमाणें माझ्यांत कांही दोष निर्माण होतात, त्यांच्या उदयाचें फल मला भोगलेंच पाहिजे. पण कर्माचें फल हें माझ्या आत्मिक स्वरूपापासून पूर्णतः भिन्न आहे. ’ एवंच सम्यक्त्वी पुरुषास आत्म्याच्या स्वरूपाविषयीं मुळींच शंका नसते.

* * *

– १९४ –

सम्यक्दृष्टि पुरुष आणखी एका दोषापासून अलिप्त असतो. तो म्हणजे आत्मतत्त्वाविषयीं अविचल श्रद्धा ! आत्मतत्त्वावर त्याची प्रगाढ श्रद्धा असते. संपूर्ण ज्ञानधारी जे वीतराग देव त्यांनीं सांगितलेला चराचर सृष्टीबद्दलचा नियम हा पूर्ण सत्य आहे, याविषयीं त्याच्या मनांत तिळमात्रहि शंका उरत नाहीं. त्याची श्रद्धा नष्ट करण्याचा जर कोणीं प्रयत्न केला तर तो संपूर्ण अपयशी झाल्याशिवाय राहणार नाहीं. पर्वत हलोत,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आकाश कोसळो, धरणी दुभंगून जावो, समुद्र आपल्या मर्यादा सोडो पण तो सर्वज्ञ आणि वीतरागी मात्र देवांनीं सांगितलेल्या मार्गावर अविचल स्थित असतो; त्याची श्रद्धा तलवारीवर चढविलेल्या पाण्याप्रमाणें अकंप असते.

* * *

–१९५–

सम्यक्त्वी कांक्षारहित असतो. कांक्षा म्हणजे इच्छा ! ही इच्छा अनेक रूपांनीं प्रकट होते. त्या सर्व इच्छा पापबीज असतात; म्हणून सम्यक्दृष्टीला त्यांची आसक्ति नसते. तो नि:कांक्षित गुणांचा धारणकर्ता होतो. पापबीज-स्वरूप असलेली इच्छा कायमचीच नष्ट व्हावी, म्हणून तो देवपूजा, दान, व्रत इत्यादि सर्व क्रिया करतो. त्यामुळें तो भोगाभिलाषारहित होतो. सम्यक्त्वी भोगाभिलाषारहित असतो, याविषयीं कांहीजण शंका व्यक्त करतील, परंतु ती व्यर्थ आहे. सम्यक्दृष्टि सर्व क्रियांच्या इच्छेनें रहित असा असतो. याचा अर्थ असा कीं, तो क्रिया करतो पण त्या त्याज्य समजूनच तो करतो. त्या क्रिया केल्यानें नाशवंत सुखाशिवाय कांहींहि मिळणार नाहीं, अशी त्याची खात्री असल्यानें तो कोणत्याहि क्रियेच्या फलाची आशा करीत नाहीं. कोणत्याहि क्रियेंत आसक्ति ठेवून भाग घेणें निराळें आणि त्यांत अनासक्तिपूर्वक भाग घेणें निराळें !

ही अनासक्ति म्हणजेच मुक्तिदर्शक पायवाट होय !

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– १९६ –

संसारांतील सुख हें खरें नसून तें नाशवंत आहे; अशी दृढ श्रद्धा ठेवून त्याचा निरपेक्ष त्याग करणाऱ्या अनंतमतीची कथा तुला सांगतें.–

अंग देशांतील चंपानगरींत प्रियदत्त नांवाचा श्रेष्ठी रहात होता. त्याच्या पत्नीचें नांव अंगवती. त्यांच्या जीवन-वेलीवर अनंतमतीच्या रूपानें एक सुंदर नि टवटवीत फूल आलें. अनंतमति म्हणजे उभयतांचा जीव कीं प्राण ! ती आपल्या पितरांच्या हृदय-सागरांत राजहंस पक्ष्याप्रमाणें स्वच्छंद विहार करीत होती. प्रियदत्त श्रेष्ठी मोठे धार्मिक होते. चंपानगरींतील सर्वश्रेष्ठ धर्मात्मा म्हणून त्यांची ख्याति होती. जैनांत 'अष्टाह्निक' नांवाचा महापर्व असतो. त्या काळांत प्रत्येक जैन गृहस्थानें आपलें जीवन साधें नि पवित्र ठेवावें, असा दंडक आहे. सर्व प्रकारच्या विषयभोगांपासून त्यानें अलिप्त असावयास हवें. म्हणून प्रियदत्तानें धर्मकीर्ति मुनीजवळ आठ दिवसांकरितां ब्रह्मचर्य व्रत घेतलें. अनंतमतीनें देखील हट्ट करून ब्रह्मचर्य व्रत घेतलें.

शुक्लपक्षांत चंद्र रोज एकेक कलेनें वाढावा, त्याप्रमाणें अनंतमती वाढूं लागली. आतां तर ती पौर्णिमेच्या चंद्रासारखी विकसित झाली होती. घरीं आई-वडिलांनीं जेव्हां तिच्या लग्नाची तयारी सुरूं केली, तेव्हां अनंतमती म्हणाली, "मी लहानपणीं धर्मकीर्ति मुनींजवळ ब्रह्मचर्य व्रत घेतलें आहे, तें मी केव्हांच मोडणार नाहीं."

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनंतमतीच्या निग्रहापुढें कोणाचाच इलाज चालला नाहीं. एकदां ती उद्यानांत हिंदोळयावर वसून झोके घेत असतांना आकाशमार्गें गमन करणाऱ्या कुंडलमंडित नांवाच्या विद्याधराची तिच्यावर दुष्ट दृष्टि खिळली आणि त्यानें तिला उचलून नेलें. पण नंतर आपल्या पत्नीच्या भीतीनें त्यानें तिला एका घोर अरण्यांत टाकलें. तेथें भीम नांवाच्या भिल्लांच्या राजानें तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. पण तेथील वन-देवीनें भिल्लराजास शासन करून अनंतमतीचें संरक्षण केलें. पुढें ती पुष्पक नांवाच्या व्यापाऱ्याच्या हातीं सांपडली. त्यानें तिला कामसेना नांवाच्या वेश्येस विकलें. पण ती ब्रह्मचर्यापासून च्युत होत नाहीं हें पाहून कामसेनेनें तिला सिंहराजाच्या हातीं सोंप-विलें. तो तिच्याशीं जबरदस्ती करण्याचा जेव्हां प्रयत्न करूं लागला, तेव्हां एक नगरदेवता प्रगट झाली व तिनें अनंतमतीचें संरक्षण केलें. जीवनाच्या या विविध अनुभवांतून गेलेल्या अनंत-मतीनें शेवटीं कमलश्री नांवाच्या अर्जिकेजवळ दीक्षा घेतली व अंतसमयीं उत्कृष्ट समाधिमरण साधलें. अनेक संकटें कोसळूनहि ती आपल्या व्रतांत दृढ राहिली व तिनें संसारांतील सर्व वासनांचा त्याग केला.

★ ★ ★

– १९७ –

रे ज्ञानवंता ! अमंगलांतूनहि ज्यांना सदा मंगलत्वाचेंच दर्शन होत होतें, अशा एका जोडप्याचें उदाहरण मी तुला सांगतें. हें जोडपें विचिकित्सापासून अलिप्त असल्यानें निर्विचिकित्सा अंगांत त्यांची ख्याति गायिली जाते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उद्दायन नांवाचा एक राजा होता. तो वत्स देशाचा असून त्याची रोटक नांवाची राजधानी त्यावेळीं भारतांत प्रसिद्ध होती. राजा उद्दायन म्हणजे अनेक सद्‌गुणांचा पुतळाच ! तो जितका पराक्रमी तितकाच विशुद्ध वर्तनाचा ! अनेक विद्या, कला आणि शास्त्रें त्याच्या ठिकाणीं वसत होतीं. त्याची राणी प्रभावती ही सुद्धां तशीच गुणवान् होती. या सर्व गुणांत उभयतांचा एक गुण सर्व गुणांत चांगला होता. तो म्हणजे राजा-राणी उभयतां सम्यक्त्वी असून आपला पुष्कळ वेळ दान, पूजा, व्रत, उपवासांत घालवीत असत. राज्यांतील सर्व प्रजेस त्यांचा हस्त सदा वरदहस्त ठरत असे. विद्वानांचा त्यांच्या दरबारीं जसा सन्मान होत असे, तसें अनेक रोगपीडित याचकहि त्यांच्या दानानें संतुष्ट होत असत. राजाराणीची ही कीर्ति मर्त्य लोकांत तर पसरलीच पण गगनाला छेदून ती स्वर्गलोकांतहि पसरली. एवढेंच नव्हे तर सौधर्मेन्द्रानें स्वर्गांतील आपल्या दरबारांत राजा-राणींच्या निर्विचिकित्सा अंगाची तोंड भरून स्तुति केली. ती ऐकून दरबारांतील सर्व सम्यक् प्रकृतीच्या देवांना अत्यानंद झाला. पण वासव नांवाच्या देवास ही गोष्ट मुळींच आवडली नाहीं. राजाच्या स्तुतीनें त्याच्या सर्वांगाचा दाह झाला व तत्काळ तो राजाराणीची परीक्षा पाहण्यासाठीं पृथ्वीवर आला.

त्यानें कुलपीडित मुनीचा वेष धारण केला. त्याच्या विकृत शरिराचा दुर्गंध येत होता. आपल्या महारोगग्रस्त शरिराचं विकृत प्रदर्शन करीत राजवाड्यासमोर जाऊन तो उभा राहिला. मुनीस पाहतांच राजाराणीस अत्यानंद झाला. साधूच्या दर्शनानें जणुं दिवाळीचा आनंदच आला असें त्यांना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वाटलें. आपलें हें हिडीस स्वरूप पाहून राजाराणीस किळस येते कीं नाहीं, हें तो मुनी आपल्या काकदृष्टीनें सतत पहात होता. पण त्याच्या पहिल्या परीक्षेंत तर राजा-राणी उत्तीर्ण झाली! त्यांनीं अत्यंत भक्तीनें मुनीस आहारास आमंत्रण दिलें. अनेक खाद्यपदार्थांवर मुनीनें ताव मारला. आहार संपतांच त्यानें अति दुर्गंधीयुक्त उलटी केली! तिच्या भयंकर वासानें जवळपासचे सगळे लोक पळून गेले. पण राजा-राणी मात्र दूर गेलीं नाहींत. ती उभयतां मुनीचें अंग स्वच्छ करूं लागली. आपली सेवा करणाऱ्या राजा-राणीवरच मुनीनें आणखी एक उलटी केली! यानंतरहि राजा-राणीस मुनीची किळस न वाटतां ती स्वतःसच दोष देऊं लागली. आपल्या अन्नानेंच मुनींना त्रास झाला याबद्दल ती हळहळ करूं लागली. राजा-राणीची ही दृढ भक्ति पाहून मुनीनें आपलें मायावी रूप टाकून खरें रूप प्रगट केलें. त्यानें आपण येथें कां आलों यासंबंधीचा सर्व खुलासा निवेदन केला व उभयतांची पुन्हा पुन्हा स्तुति करून व त्यांचें भलें चिंतून तो निघून गेला.

रे अंतरात्मन्! शरीर दिसायला चांगलें असो किंवा वाईट असो, पण मूलतः तें अमंगळ आहे. पण म्हणून तें धारण करणाऱ्या सुंदर शरीरधारी जीवांची स्तुति आणि अमंगळ शरीरधारी जीवांची निंदा करतां कामा नये.

★ ★ ★

– १९८ –

सम्यक्त्वी पुरुषाचा एक मौलिक गुण म्हणजे तो कोमल स्वभावाचा आणि दयार्द्र असतो. पण व्रतपालनांत तो वज्रा-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सारखा कठीण असतो, सन्मार्गांत तो लोण्याप्रमाणें मऊ असेल; पण कुमार्गाशीं झगडा देतांना वज्रच्छेद करण्याची शक्ति त्याच्यांत येईल. तो सन्मार्गांत अत्यंत स्थिर असतो, तो स्वत: सत्प्रवृत्त आणि सन्मार्गांत स्थिर असतो; पण दुसऱ्या सम्यक्त्वी आणि धार्मिक पुरुषांनाहि तो त्यांच्या मार्गांत स्थिर करण्याचा प्रयत्न करतो. म्हणजेच सम्यक्त्वी पुरुषांचा 'स्थितिकरण' हा एक गुण आहे. स्थितिकरणाचा अर्थ आहे सन्मार्गांत स्वत: स्थिर राहणें व इतरांनाहि स्थिर करणें होय. विशेषत: सम्यक्त्वी पुरुषानें आत्मस्वरूपांत लीन असावयास हवें.

आत्महिताची जाणीव असणारे सम्यक्त्वी जीव पुन्हा आत्मसन्मुख होतात. आत्मविन्मुख झाल्याचा त्यांना पश्चात्ताप होतो. असे पश्चात्तापदग्ध आत्मे स्वत: जसे सन्मार्गांत स्थिर राहतात त्याप्रमाणें आत्महितापासून पतित होणाऱ्यांना पुन्हा स्थिर आधारहि देतात.

* * *

– १९९ –

'वसुधैव कुटुम्बकम्' मानणारे सम्यक्त्वी अंत:करणानें अत्यंत दयाळू असतात; वृत्तीनें वत्सल आणि मनाचे मोठे असतात. या वृत्तीचे लोकच जगाचें हित करूं शकतात.

जगांतील सर्व प्राणिमात्र सुखी राहतील, ते सर्व प्रकारच्या अनुकूलतेनें युक्त होतील, आणि त्यांच्या जीवनांतील दु:खें कापराप्रमाणें उडून जाऊन तेथें नेहमीकरितांच सुखं ठाण मांडून बसतील अशी अपेक्षा सम्यक्त्वी पुरुष करीत असतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गाईचें वासराविषयींचें शुद्ध प्रेम, आईची मुलांविषयींची ममता आणि सम्यक्त्वी पुरुषाचें सहधर्मी पुरुषांविषयींचें वात्सल्य एकच होत! मनुष्यामनुष्यांत किंवा भिन्नभिन्न राष्ट्रांत जीं युद्धं होतात त्याचें एकमेव कारण म्हणजे त्यांच्यांत असलेला वात्सल्य गुणाचा अभाव! आपापल्या मनांतील विकृति काढून टाकल्यास वात्सल्य गुणाची वृद्धि व्हावयास वेळ लागणार नाहीं. सर्वसामान्यपणें वात्सल्य-गुण हा मैत्री, प्रमोद, कारुण्य, माध्यस्थ इत्यादि प्रकारें प्रगट होतो, ज्याचा वत्सलभाव सदा झिरपत असतो तो विश्वांतील संपूर्ण प्राण्यांविषयीं मैत्री बाळगतो. विश्वांतील कांही जीव त्याचे सहधर्मी आणि सहगुणी असतील, तर कांही योग्यतेच्या अपेक्षेनें त्याच्यापेक्षां हीन असतील. विकासाच्या अत्युच्च शिखरावर आरूढ झालेल्याविषयींहि त्याला मत्सर वाटणार नाहीं.

* * *

– २०० –

कर्मबंधाच्या कारणांसंबंधीं सर्वत्र पुष्कळच गैरसमज पसरला आहे. कांही लोकांचें म्हणणें आहे कीं अजीव बंधाला कारण आहे. कांहींचें म्हणणें आहे कीं, जीव बंधाला कारण आहे. जगांत अनेक मोहक वस्तू आहेत. सुंदरीचें सौंदर्य, फुलाचा मोहकपणा, पदार्थाची रुचि, गायनाचें माधुर्य यांपैकीं एकहि बंधाला कारण नाहीं. हीं सर्व कर्मबंधाला निमित्तें आहेत. आखाड्यांत व्यायाम करण्यासाठीं आणि कुस्ती खेळण्यासाठीं मल्ल जात असतात. व्यायामाच्या आरंभीं ते अंगाला तेल लावून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मालीश करतात. कुस्ती खेळतांना त्यांच्या अंगाला तांबडी माती लागते व त्यांचा मूळचा रंग बदलल्यासारखा दिसतो. येथें माती कांही स्वतः होऊन त्याच्या अंगाला चिकटलेली नाहीं. माती आणि मल्लाचें शरीर यांना जोडण्याचें काम तेल करीत असतें. प्रत्येक संसारी मनुष्य कर्माच्या जाळ्यांत सांपडला आहे. त्याला कारण म्हणजे बाह्य पदार्थाविषयीं त्याच्या मनांत असलेली आसक्ति हीच होय. जीवाची आसक्तीच कर्मबंधाला कारण आहे. * * *

– २:१ –

कर्मभोग्य पुद्‌गलांनीं भरलेलें लोकाकाश बंधाला कारण नाहीं. तें जर बंधाला कारणीभूत असतें तर लोकाकाशांतच असणाऱ्या सिद्ध भगवंतांनाहि कर्मबंध झाला असता ! पण ते तर कायमचेच कर्ममुक्त आहेत. मन, वचन आणि कायस्वरूप योगहि बंधाला कारण नाहीं. त्यानें जर कर्मबंध झाला असता तर मन, वचन आणि कायस्वरूप हलनचलन करणाऱ्या संयमी जीवांनाहि कर्मबंध झाला असता. सर्वत्र विहार करणाऱ्या केवली भगवंतांनाहि कर्मबंध झाला असता.

रे अंतरात्मन् ! वरील सर्व क्रिया करीत असतां जीवाच्या ठिकाणीं जे रागभाव निर्माण होतात तेच कर्मबंध बांधतात. मिथ्यात्वी आपल्या क्रियेंत रागभावाची निर्मिति करीत असल्यानें त्याला कर्मबंध आहे. म्हणजे कोणताहि जीव जेव्हां रागादि भावांबरोबर एकरूप होतो तेव्हांच तो कर्म बांधतो. * * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २०२ –

निरनिराळ्या कर्मांचीं निरनिराळीं फळें भोगावीं लागतात. ज्ञानावरणाचा अनुभाग (कार्य) म्हणजे जीवाला ज्ञान न होऊं देणें किंवा विपरीत होणें. दर्शनावरणाचें फळ म्हणजे दर्शनाचा अभाव होय. सुख किंवा दुःख देणें हें वेदनीयाचें फळ समजावें; मोह उत्पन्न करणें हें मोहनीयाचें फळ होय. मनुष्य, देव, तिर्यक् आणि नरक या भवांत जन्म घडवून आणणें हें आयुकर्माचें फळ होय. शरीर आणि इंद्रिय प्राप्त करून देणें हा नामकर्माचा अनुभाग होय. उच्चत्वाचा आणि नीचत्वाचा अनुभव देणें हा गोत्र-कर्मांचा अनुभाग होय. निरनिराळ्या कार्यांत विघ्नांचा अनुभव येणें हा अन्तराय कर्मांचा अनुभाग होय. ★ ★ ★

– २०३ –

वरील कर्में जेव्हां फल देतात, तेव्हां त्यांची निर्जरा होते. तीं कर्में जीवापासून निघून जातात. ही कर्मनिर्जरा दोन प्रकारची असते. एक सविपाक निर्जरा आणि दुसरी अविपाक निर्जरा होय. आपापल्या स्थितीप्रमाणें कर्माचें फल दिल्यानंतर आत्म्यापासून निघून जाणें यास सविपाक निर्जरा म्हणतात. कर्मांची स्थिति पूर्ण होण्याच्या पूर्वीं तप वगैरेंनीं कर्माला उदयांत आणून आत्म्यापासून ते वेगळे करणें यास अविपाक निर्जरा म्हणतात. ज्याप्रमाणें एखादें आम्रफळ झाडावरच पिकून जातें त्याप्रमाणें कांहीं कर्में त्यांची स्थिति पूर्ण होईपर्यंत जीवाजवळ

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राहतात व नंतर फळ देऊन आपोआप निघून जातात. पण आंबा लवकर पिकवायचा झाला तर तो आधींच तोडून गवता-मध्यें झांकून लवकर पिकवितात. त्याप्रमाणें तपादिकांच्या साह्यानें कर्मांना उदयांत आणून त्यांची स्थिति पूर्ण होण्याच्या आधींच त्यांना घालवितां येते. अशा निर्जरेस अविपाक निर्जरा म्हणतात.

याप्रमाणें कर्मबंधाचे प्रकार आहेत. रागादि भावांची निर्मिति करशील तर हे सर्व कर्मबंध तुला होतील. जर रागादि भावांचा अभाव करशील तर तूं कर्ममुक्त होशील. * * *

– २०४ –

साध्या सम्यक्त्वी पुरुषापासून केवली भगवंतापर्यंत सर्वंच मन, वचन आणि कायरूप हलनचलन करतात. त्यांना त्यामुळें कर्मबंध होत नाहीं. संपूर्ण विश्व कर्मानें भरलेलें असलें आणि अबुद्धिपूर्व चैतन्याचैतन्याचा घात होत असला तरी सम्यक्त्वी जीवास कर्मबंध नाहीं. बुद्धिपूर्वक चैतन्याचैतन्याचा घात झाला, आणि मन, वचन व कायेचें हलनचलन झालें तर मात्र कर्मास्रव, कर्मबंध अवश्य होणारच. बुद्धिपूर्वक हिंसा कर-तांना जीवाचे भाव अत्यंत क्रोधी व रागी असतात. यामुळेंच कर्मबंध होतो.

कर्मास्रवाचें आणि कर्मबंधाचें कारण यथार्थपणें समजून घे.

* * *

– २०५ –

ज्ञानी आणि सम्यक्त्वी पुरुषास कर्मबंध नाहीं, म्हणून त्यांनीं आपलें वर्तन स्वैर ठेवलें तर चालतें असं मात्र मुळींच नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अजाणपूर्वक अथवा अबुद्धिपूर्वक केलेल्या मन, वचन व काय-योगानें कर्मास्त्रव व कर्मबंध होत नाहीं; पण जाणावपूर्वक किंवा बुद्धिपूर्वक जर तींच कार्यें घडलीं तर मात्र कर्मबंध अवश्य होतो. स्वच्छंद वर्तन हें ज्ञान्याचें असो किंवा अज्ञान्याचें असो त्यायोगें कर्मास्त्रव व कर्मबंध होणारच. जाणावपूर्वक घडलेलं पाप आणि अजाणत: घडलेलं पाप यांत फरक असतोच. ज्ञानी पुरुषाच्या अजाणपूर्वक घडलेल्या पापामुळें कर्मबंध नाहीं; पण त्यानें जाणीवपूर्वक केलेल्या पापांमुळें मात्र कर्मबंध होईल. जाणीव-पूर्वक पाप करणारा मनुष्य ज्ञानी असणें शक्य नाहीं, म्हणजे कर्मबंधाला मूळ कारण अज्ञानच आहे असें आपोआप सिद्ध होतें. अज्ञान हें कर्मरूपी इमारतीचा पाया आहे. * * *

– २०६ –

'मी परजीवाला मारतों आणि मी परजीवाकडून मारला जातों,' हें म्हणणेंच चुकीचें आहे. 'संपूर्ण पृथ्वीच निःक्षत्रिय करतो' अशा प्रतिज्ञेनें संहार करावयाला निघणाऱ्यांची मनीषा कधींच पूर्ण होऊं शकली नाहीं. अनादि कालापासून पृथ्वीवर वावरत असलेल्या मनुष्यप्राण्यांचा संपूर्ण वध केव्हांच होऊं शकणार नाहीं. त्यांच्या आत्म्यांना तर कोणत्याच काळांत किंवा कोणत्याहि स्थितींत मृत्यु नाहीं. ज्ञानी पुरुष कोणत्याच संहारक अस्त्रांची भीति बाळगणार नाहीं. त्याची सतत एकच भावना असते. तो म्हणतो,– 'माझा आत्मा स्वतंत्र आहे. त्याला कोणीच मारूं शकणार नाहीं. त्याच्यावर कोणत्याहि अस्त्रांचा परिणाम

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होणार नाहीं. तो अच्छेद्य, अदाह्य आहे. आत्म्याला मारायला निघणाऱ्या लोकांची शेवटीं फसगत झाल्याखेरीज राहणार नाहीं. आपल्या मूर्खतेची त्यांना निश्चित प्रचीति येईल." * * *

– २०७ –

'आत्मा अमर आहे, त्याला कोणीच मारूं शकत नाहीं.' ही गोष्ट जशी खरी आहे, त्याप्रमाणें जीवधारी देहालासुद्धां त्याचें आयुष्य संपल्याशिवाय कोणी मारणार नाहीं. आयुष्याची दोरी बळकट असणारे अनेक प्राणघातक संकटांतून वांचत असतात, हें आपण नेहमीच पाहत असतों; अन् आयुष्य संपत आलें असल्यास कोणत्याहि निमित्तानें किंवा निमित्त न घेतांहि तो मरतो, हेंहि आपणांस ठाऊक आहे आयुकर्मांचें अस्तित्व असेतों तुला कोणीच मारूं शकणार नाहीं; पण आयुकर्मांचा क्षय होतांच तुझ्या देहाचें पतन होईल. * * *

– २०८ –

निश्चयनयानें जें आहे त्याचा अस्त कधींच होत नाहीं. 'अस्त झाला' असें म्हणणें हा व्यवहार आहे. निमित्त-नैमित्तिक भावानें पर्यायाचा उत्पाद व व्यय होणें यासच जन्म आणि मरण म्हणतात.

अमुक रोगानें, अमुक आजारानें, अपघातानें किंवा शस्त्र-क्रियेंतच मृत्यु झाला असें जें म्हटलें जातें, तें व्यवहारनयानेच म्हटलें जातें, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. पण वस्तुतः मरणाराचें आयुष्य संपतांच तो मरतो; – तें त्याचें मूळ कारण आहे. कोणत्याहि गोष्टीचें सम्यक् स्वरूप तुला ठाऊक असावयास हवें * * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २०९ –

एक जीव दुसऱ्या जीवाला ठार मारूं शकत नाहीं, हें जसें खरें तसेंच एक जीव दुसऱ्या जीवाला वांचवूं शकत नाहीं, हेंहि खरें आहे ! आयुष्य संपण्याच्या आधी ज्याप्रमाणें कोणी कोणाला मारूं शकत नाहीं, त्याप्रमाणें आयुष्य संपल्यावर कोणत्याहि उपायांनीं कोणी कोणास वांचवूं शकत नाहीं. ज्याप्रमाणें कोणी कोणास दुःख देऊं शकत नाहीं; तसेंच कोणी सुखहि देऊं शकत नाहीं. एकजण दुसऱ्याचें बरें-वाईट करतो, हें जरी व्यवहारतः बरोबर असलें तरी तत्त्वतः तें अवास्तव आहे. या अपेक्षेनें पुण्य-कार्यें करणें, दुसऱ्याचा उद्धार करणें, त्यांचा संहार करणें, हें सर्व व्यवहारतः बरोबर आहे. सुख आणि दुःख निर्माण करणारा ज्याचा तोच आहे. विकारांच्या अस्तित्वानें भौतिक सुखदुःखें प्राप्त होतात आणि तदभावीं आत्मिक सुखाची प्राप्ति होते, हेंच वास्तव स्वरूप आहे.

* * *

– २१० –

ज्ञानी काय विचार करतो, याच्या वर्णनानें तूं गडबडून गेलास. यामुळें तुझा गोंधळ उडाला आहे. एक गोष्ट लक्षांत ठेव, ‘ तुझ्यामुळें अनेक जीव जगत आहेत, ही कल्पनाच खोटी आहे. जगणारे आपल्या आयुकर्माच्या उदयानें जगत आहेत. ’

‘ मी दुसऱ्यांना जगवितों. त्यांच्या प्राणांचें रक्षण करतों.’ वगैरे सर्व भाग मिथ्यारूप आहेत. तो खोटा अहंकार आहे. तूं नसतास तरी ते त्यांच्या बळकट आयुकर्मानें आयुष्य असेपर्यंत जगले असते.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २११ –

'मी दुसऱ्या जीवांना जगवीत नाहीं. मी त्यांना जगवितों' असें म्हटलें जातें, हें खरें ! पण जेथें व्यवहारच खोटा आहे, तेथें व्यवहारनयानें म्हटलेल्या गोष्टी कशा खऱ्या असूं शकतील ?

एकमेकांच्या उद्धारास एकमेक नुसते निमित्तमात्र होत. ज्याचा तोच आपला आपण उद्धार करून घेतो.

* * *

– २१२ –

'मी दुसऱ्याला जगवितों आणि दुसरे मला जगवितात' ही कल्पना मिथ्या आहे. व्यवहारामध्यें अशा प्रकारची भाषा नेहमीच ऐकूं येते. व्यवहाराच्या दृष्टीनेंच ती कल्पना सत्य ठरेल. पण खऱ्या अर्थानें असं समजणं चुकीचं आहे. सम्यक् दृष्टीनें विचार केल्यास कोणी कोणाला जगवीत नाहींत, आणि कोणी कोणाला मारीत नाहींत. जगणें आणि मरणें हें ज्याच्या त्याच्या कर्मांवर अवलंबून आहे. येथें जगणें आणि मरणें हें जीव धारण करणाऱ्या शरिराबद्दल म्हटलें आहे. कारण जीव किंवा चेतना ही कधींच मरत नसते. जीवाच्या कर्मांमुळें शरीर निर्माण होतें आणि त्याची स्थिति टिकवून धरणाऱ्या कर्मांचं अस्तित्व संपलें कीं पिकलेल्या पानाप्रमाणें तें पतन पावतें.

* * *

– २१३ –

बाह्य पुद्गलाच्या प्राप्तीनं आनंद झाला असता तर जगांतील सर्वच श्रीमंत लोक सुखी झाले असते; आणि सर्वच धनहीन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लोक दुःखी झाले असते. पण असं दृश्य सर्वत्र दिसत नाहीं. ज्ञान, शक्ति, इच्छापूर्ति, आयुष्य, चांगलें-वाईट कुल या सर्व गोष्टी कर्माधीन आहेत. केवळ पैशावर या गोष्टी अवलंबून असत्या तर श्रीमंत पालकांचीं मुलें बुद्धिहीन आणि कांही गरीब मुलें बुद्धिमान् कां निपजावीत ? पुष्कळ पैसा खर्च करून श्रीमंताचीं कांही मुलें शेवटपर्यंत बुद्धिहीनच राहतात; त्यांच्या शिक्षणाकरितां खर्च झालेला सगळाच पैसा व्यर्थ जातो. उलट विशेष पैसा खर्च न करतांहि ज्ञान मिळविणारीं गरीब मुलें कांही थोडीं नाहींत.

एवंच ज्ञानप्राप्ति धनावर अवलबून नसून बुद्धीच्या क्षयोपशमावर अधिष्ठित आहे. म्हणजे प्रत्येकजण स्वतः केलेल्या कर्माचें फळ भोगतो, आणि ज्ञान, शक्ति, सुख आणि दुःख कर्मजीवित असतात, हेंच सिद्ध होतें.

* * *

– २१४ –

'मी दुसऱ्यास सुखी किंवा दुःखी करतों आणि दुसरे मला सुखी किंवा दुःखी करतात.' ही कल्पना रागादि भावांची निर्मिति करते. अशा कल्पनेंतून अहंकार, कीर्तीचा लोभ या गोष्टींचा जन्म होत असतो. अशा कल्पनेच्या आहारीं गेलेला मनुष्य अहंकाराचा पुतळा बनतो. या कल्पनेच्या आहारीं गेलेला मनुष्यच दुसऱ्यांना सुखी करण्याचा आभास निर्माण करून कीर्ति मिळविण्याची धडपड करीत असतो. स्वार्थी वृत्तीचा जन्महि अशाच कल्पनेंतून होत असतो. भोळसट माणसांना फसवून त्यांची संपत्ति हरण करणें आणि त्यांची सेवा करीत आहोंत असें भासवून स्वार्थं साधणें या गोष्टी मिथ्यात्वी मनुष्य करीत असतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कृत्रिम सुखदुःखांच्या मृगजलामागें न धावता तूं आत्मिक आनंदाच्या प्राप्तीसाठीं प्रयत्न कर त्यानेंच तुझे कर्मबंध तुटतील.

★ ★ ★

– २१५–

दुसऱ्याला सुखी किंवा दुःखी करण्याची भावना शुभाशुभ कर्मास्रवाला कारणीभूत आहे. ही शुभ व अशुभ कर्मेंच मनुष्यास सद्गति किंवा असद्‌गति मिळवून देतात. दुसऱ्याचें अहित करणाऱ्या कृतीनें दुष्ट कर्माचा बंध होतो व त्यामुळेंच नरकगतीचा बंध होतो. तेथें गेलेल्या जीवांच्या दुःखाचें वर्णन काय करायचें? सतत भांडणें, मारामाऱ्या, अवयवच्छेद करणें व रक्तपात करणें यांतच त्यांचें सगळें आयुष्य जातें. पशुपक्ष्यांचें हीन जीवन जगणें हेंहि अशुभ कर्माचेंच फळ होय. पण दुसऱ्याचें हित करण्याच्या शुभ क्रियेमुळें शुभ कर्मांचा बंध होतो व मनुष्य गतींत श्रेष्ठ कुलांत जन्म आणि स्वर्गगतीचा लाभ होतो. त्यामुळें तो आयुष्यभर अनेक सुखांचा भोग घेतो. म्हणजे नरकांतील दुःख वाट्यास येणें व स्वर्गादिकांतील सुख भोगणें हें ज्याच्या त्याच्या कर्माधीन आहे, हीच गोष्ट यांतून सिद्ध होते.

हीच शुभ व अशुभ कर्मबंधनें तोडून तुला मुक्तीची वाटचाल करायची आहे, ही गोष्ट मात्र तूं विसरूं नकोस.

★ ★ ★

– २१६ –

कोणतेंहि कार्य करतांना तें आपलें नैसर्गिक कार्य आहे; आपलें कर्तव्य आहे या जाणीवेनें कर. तें करीत असतां कोणताहि हेतु बाळगूं नकोस. अशा निर्हेतुक कार्यानें कर्मबंध होत नसतो.

★ ★ ★

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २१७ –

हिंसा आणि अहिंसा यांचं सूक्ष्म ज्ञान तूं करून घे. जीव मरो अथवा न मरो, जीवाला मारो अथवा ना मारो, त्याला मारण्याबद्दलचे जे भाव होतील तेच बंधाला कारण आहेत. प्रमादाच्या योगानें जी रागद्वेषात्मक प्रवृत्ति होते तीच बंधाला कारण होते. सावधानता व जागरूकता जेथें असेल तेथें बंध असत नाहीं. जागरूकता जेथें असेल तेथें बंध असत नाहीं. ज्ञान्याचे वरीलप्रमाणें भाव असतात म्हणून त्यास कर्मबंध नाहीं. अज्ञानी मनुष्याचे भाव प्रमादी असल्यानें त्यास कर्मबंध होतो. प्रमाद असेल तेथें हिंसा होतेच. * * *

– २१८ –

हिंसा आणि अहिंसा यांचें विवेचन फारच सूक्ष्म आहे. शुद्धात्म्याच्या मूळ स्वरूपापासून च्युत होणें यास हिंसा म्हणतात. तसेंच आत्मिक शुद्ध परिणामाचा घात करणें ही सुद्धा हिंसाच होय. मन, वचन, कायेनें आपल्या व दुसऱ्यांच्या परिणामांत दु:ख निर्माण करणें यासहि हिंसाच म्हणतात. हिंसा दोन पद्धतींनी होते. एक भावहिंसा आणि दुसरी द्रव्यहिंसा होय. आत्मिक परिणामांत विकृति होणें, ही भावहिंसा होय. शारीरिक कष्ट पोहोंचविणें किंवा त्यांचा छेद करणें ही द्रव्यहिंसा होय. हिंसा मुख्यत: भावनेवर अवलंबून असते. विकृत भावना हीच हिंसेला निमित्तभूत आहे. हितकर्त्यानें केलेला कटुतर उपदेश हिंसेंत मोडत नाहीं. त्या उपदेशानें उपदेश ऐकणाऱ्याच्या मनांत वाईट वाटलें तरी उपदेशकास दोष लागत नाहीं. कारण उपदेशकाचा उपदेश देण्यांत सद्धेतु असतो तसेंच प्रमादवश नसतांना किंवा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दृष्टिदोषामुळें हिंसा करण्यासारखे मानसिक परिणाम नसतांना एखाद्या सूक्ष्म जीवाचा घात झाला तर त्यामुळें त्यास हिंसा लागत नाहीं.

* * *

– २१९ –

हिंसेचे दुसऱ्या तऱ्हेनें चार प्रकार पाडण्यांत आले आहेत. संकल्पिनी, आरंभिनी, उद्योगिनी आणि विरोधिनी असे तिचे भेद आहेत. हिंसेच्या अभिप्रायानें किंवा हिंसा करण्याच्या भावनेनें जी हिंसा केली जाते, ती संकल्पिनी हिंसा होय. संकल्पिनी हिंसा करण्यास तयार झालेल्या जीवाच्या हातून इतर जीवांची हिंसा होवो अथवा न होवो पण त्याच्या परिणामांत कषायाची विकृति झाल्यानें त्याला हिंसा केल्याचाच कर्मबंध होतो.

विरोधिनी हिंसा देश, धर्म आणि संस्कृति रक्षणार्थ घडलेली असते. जेव्हां एखादा मनुष्य त्याच्यावर चालून जातो, आणि दोघांच्या संघर्षांत त्याच्याकडून जी हिंसा घडते ती विरोधिनी हिंसा होय. विरोधिनी हिंसा करणाऱ्याच्या मनांत हिंसा करण्याची भावना नसतांनाहि अचानकपणें आलेल्या संकटाच्या परिनिवारणार्थ तो उभा ठाकत असल्यानें त्याच्याकडून घडलेल्या हिंसेंत तीव्रता कमी असते.

* * *

– २२० –

गृहस्थी माणसाकडून घडणाऱ्या हिंसेस आरंभिनी हिंसा म्हणतात. प्रपंच चालविण्यासाठीं त्याला अनेक प्रकारचे आरंभ करावे लागतात. बाजारहाट करणें, कपडे धुणें, पाणी सांडणें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

इत्यादि प्रकारचे आरंभ त्याला करावे लागतात. या सर्व प्रकारच्या आरंभांत अनेक सूक्ष्म आणि स्थूल जीवांची हिंसा घडते. अशा हिंसेस आरंभिनी हिंसा म्हणतात.

उद्योगिनी हिंसा ही गृहस्थानें केलेल्या उद्योगांमुळें घडते. शेतकरी शेत नांगरीत असतां त्याच्याकडून अनेक सूक्ष्म जीवांची हिंसा घडते. तसेंच व्यापार करतांना, कारखाने आणि गिरण्या चालवितांना अनेकांची हिंसा संभवते. अशा हिंसेस उद्योगिनी हिंसा म्हणतात.

वरील सर्व प्रकारच्या हिंसेमुळें कमीअधिक पापांची शक्यता असली तरी त्या अंतीं त्याज्यच होत. मुनि सर्व प्रकारच्या हिंसेचा त्याग करतात. गृहस्थ संकल्पिनी हिंसा सोडून बाकीच्या हिंसा सोडूं शकत नाहीं. जीवनव्यवहारासाठीं एवढी हिंसा त्याच्याकडून होणारच. * * *

– २२१ –

कित्येक वेळां एखादा जीव हिंसा करण्याची इच्छा करून देखील प्रत्यक्ष जीवाचा घात करूं शकत नाहीं. अशा अवस्थेंत हिंसामय परिणाम घडल्यामुळें त्याच्याकडून प्रत्यक्ष हिंसा न घडून देखील त्यास हिंसेचें पाप लागतें व त्यास हिंसेचें फळ भोगावें लागतें. रोजच्या रोज पाण्यांत जाळें टाकून मासे मारणारा कोळी पापाचा धनी होतोच. त्याचे परिणाम हिंसकच असतात. पण एखाद्या दिवशीं पाण्यांत जाळं टाकूनहि त्यांत मासे अडकले नाहींत तरी तो हिंसेचा आणि पर्यायानें पापाचा धनी होतो, सकषायी परिणाम हेच हिंसेचें फळ भोगण्यास कारणीभूत असतात, हें यावरून सिद्ध होईल. * * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २२२ –

पण शुद्धाचरणी आणि शुद्ध परिणामांचा शेतकरी शेत नांगरोत असताना अनेक सूक्ष्म नि स्थूल जीवांची हिंसा करतोच. पण त्याबद्दल लागणाऱ्या पापाचा तो धनी नसतो. कारण हिंसा होणें अथवा न होणें परिणामावर अवलंबून असतें. कोळयाची कषाययुक्त इच्छा भावहिंसेस कारणीभूत झाली आणि शेतकऱ्याची शुभ परिणामी इच्छा हिंसा घडूनहि शुभास्रवास कारणीभूत होते. पण शुभास्रव काय किंवा पापास्रव काय दोन्ही कर्मास्रवच आहेत.

तूं दोन्ही आस्रवांपासून विरक्त आहेस. त्यामुळें तुला दोन्ही प्रकारच्या कर्मांचा बंध नाहीं.

* * *

– २२३ –

दारुड्याचं दारू पिण्याचं व्यसन जसं एकदम सुटत नाहीं, त्याप्रमाणें हिंसकाची हिंसा तत्काळ आटोक्यांत येत नाहीं. हिंसेचा त्याग करण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषानें क्रमाक्रमानें खालील गोष्टी कराव्यात. त्यानें दारू पिणें, मांस खाणें, मध खाणें व ज्यामध्यें अनंत सूक्ष्म जीव आहेत अशीं उम्बर, कटुम्बर, पिंपळ, वड, पाकर वगैरे फळें भक्षण करणें सोडून दिलें पाहिजे. याप्रमाणें हीं फळें भक्षण न करणारा व मद्य, मांस व मधु यांचा त्याग करणारा श्रावक म्हटला जातो. अशा प्रकारचा दयाळू श्रावकच सत्शास्त्राचा उपदेश ऐकतो व देतो. तोच देवपूजा, गुरु-भक्ति, स्वाध्याय, संयम, त्याग, दान हीं षट्कर्में आचरूं शकतो.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २२४ –

वासनायुक्त मनुष्य संसारी म्हणविला जातो आणि वासनेनें रहित मनुष्य मुक्त म्हणविला जातो. ज्याची वासना सुटली त्याची संसारयात्रा संपुष्टांत आली. अशा माणसाच्या आड परिग्रहाचे पर्वतहि येऊं शकत नाहींत. आणि थोडासा विचार केला तर असें आढळून येईल कीं वस्तुतः परिग्रह कोणत्याहि व्यक्तीच्या बंधाला कारणीभूत होत नाहीं. जग अनेक वस्तूंनीं खचाखच भरलेलें आहे. अनादि कालापासून या जगांत वस्तू आहेत आणि अनंत कालपर्यंत त्या तशाच राहणार ! त्यांच्या बाह्य रूपांत क्षणोक्षणीं परिवर्तन घडत असलं तरी त्यांच्या अस्तित्वांत बदल होण्याचं कांही एक कारण नाहीं. त्या तशाच राहणार ! त्यांच्यामुळें जीवाच्या विकासांत अडथळा आला असता तर एकहि जीव पूर्ण विकासी झाला नसता; याचा अर्थच असा कीं परिग्रहांच्या अस्तित्वानें मनुष्यप्राण्याच्या विकासांत अडथळा येत नाहीं. पण बाह्य परिग्रहांत अशी एक शक्ति आहे कीं तिच्यामुळें जीवांमध्यें ममत्वाची भावना निर्माण होते. अशीं ममत्वाचीं पुटं ज्यावर चढलीं आहेत तो जीव डोळे असूनहि आंधळ्यासारखा वागतो; कान असून बहिऱ्यासारखं सोंग घेतो आणि ममत्वाच्या आहारीं जाऊन बाह्य वस्तूंविषयीं आसक्त बनतो. ही आसक्ति त्याला खरं काय आणि खोटं काय याची जाणीव होऊं देत नाहीं

★ ★ ★

– २२५ –

कोणत्याहि गोष्टीचा नाश करायचा असेल तर ती मुळा-सकट काढून टाकली पाहिजे. झाड काढून टाकायचें असेल तर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तें मुळासकट काढून टाकायला नको काय? नाहीं तर मूळ अंकुरेल व त्यांतून पूर्वीचाच वृक्ष निर्माण होईल. रागादि भावां-मुळें आत्म्याच्या प्रगतींत अडथळा येतो म्हणून ते नष्ट केले पाहिजेत. पण वरवरचा राग काढून टाकून काय उपयोग? तो समूळच काढून टाकला पाहिजे. कोणताहि क्रोध, मान, माया, लोभ इत्यादि रागभावांचीं मूळं चेतन-अचेतन पदार्थांमध्यें अस-तात. मोहक वस्तु, सुंदर फुलं, प्रेमळ मुलं, प्रिय पत्नी इ० अनेक गोष्टी अशा आहेत कीं त्यांतूनच रागादि भाव अंकुरतात. या रागादि भावांचा नाश करायचा असेल तर चेतन-अचेतन पदा-र्थांवरील आसक्ति सोडली पाहिजे. आसक्तीचा जन्म होऊं नये म्हणून आसक्तींचा त्याग आवश्यक आहे. बाह्य परिग्रहांचा पर्वत समोर असूनहि त्याबद्दल आसक्ति न बाळगतां मुक्तीची प्राप्ति करणारे कोणी असतात. पण संख्येनें ते फार थोडे असतात. इतरांना तें शक्य होत नाहीं. परिग्रहाच्या दर्शनानें त्यांच्यांत वासना अंकुरतेच; म्हणून अशा पदार्थांचा त्याग आवश्यक असतो. त्यांच्या अभावीं वासना किंवा रागादिभाव निर्माण होणार नाहींत. त्यांच्या अभावीं कर्मबंध नाहीं आणि कर्मबंधाच्या अभावीं संसार नाहीं. मुक्तीचें रहस्य हें असें आहे. * * *

– २२६ –

अध्यात्ममार्गाचं शुभफळ आणि आधिभौतिक मार्गाचं दुष्फळ मी तुला किती दिवस सांगूं? क्रोधाला बळी पडून तूं दुसऱ्यांना दुःख देण्याचा आणि ममतेला बळी पडून दुसऱ्यांना सुख देण्याचा प्रयत्न करतोस! क्रोध काय किंवा ममता काय

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कर्मांचेच अधिष्ठान आहेत. त्यामुळं तुलाच कर्मबंध होतो. कषायांना बळी पडून तूं कांहींना डांबून ठेवतोस. त्यांना तूं बद्ध करतोस, व त्यांना शिक्षा दिल्याच्या आनंदांत असतोस.

तूं बांधल्यानें कोणी बद्ध होत नाहींत किंवा तूं सोडल्यानें कोणी मुक्त होत नाहींत. कर्मबद्ध होणें किंवा कर्ममुक्त होणें ज्याच्या त्याच्या प्रयत्नाधीन आहे. ही शुद्ध दृष्टि तूं सतत ठेव.

* * *

– २१७ –

पराची आसक्ति सोड. पराचें अवलंबन जर तूं सोडणार नसशील तर तुझी ओळख तुलाच होणार नाहीं. तुझें आश्रयस्थान तुझा आत्माच आहे. तेथेंच तूं श्रद्धापूर्वक वावर. त्याचेंच ज्ञान करून घे व त्याचेंच आचरणहि कर.

* * *

– २१८ –

स्फटिक-मण्याप्रमाणें आत्मा शुद्ध आहे. आत्मा स्वतः होऊन रागादि रूप परिणमत नाहीं. परद्रव्यांच्या संपर्कानें मात्र तो आपल्या शुद्ध स्वभावापासून च्युत होऊन रागादि रूप परिणमतो. तो एकटाच असता तर त्याच्या ठिकाणीं क्रोध, माया, मान, लोभ, आसक्ति, परिग्रहाभिलाषा इत्यादि विकार निर्माण झालेच नसते. तो शुद्ध आणि पवित्र बनला असता, पण पुद्गल द्रव्यांच्या संपर्कानें मात्र वरील विकार त्याच्या ठिकाणीं निर्माण होतात. तो परद्रव्यरूपानें परिणमतो. म्हणूनच बाह्य पदार्थांचा त्याग करण्यास सांगितले जाते. त्यांच्यामुळें जीवांच्या ठिकाणीं वासना निर्माण होतात, व वासनांमुळें जीव पुद्गलाशीं बद्ध होतो; आणि त्यामुळें अखंड संसार सुरू होतो.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २२९ –

काळ धावत जातो, त्याप्रमाणें मनुष्याचें जीवनहि पुढें पुढेंच मार्गक्रमण करीत जातें. हें जीवन जगत असतां कांही सुखाचे व कांही दुःखाचे प्रसंग येत असतात. कित्येक उत्तमोत्तम पदार्थांचा भोग घेतलेला असतो, सुंदर गाणीं ऐकलेलीं असतात, मोहक प्रसंग पाहिलेले असतात. भूतकाळांत उपभोगलेल्या सुखोपभोगांची सतत आठवण करणें, व त्या सुखाचें कर्तृत्व आपल्याकडे घेऊन पुन्हा नवीन सुखोपभोगांच्या प्राप्तीची इच्छा करणें, याला द्रव्याप्रतिक्रमण म्हणतात आणि परद्रव्य-ग्रहणाच्या निमित्तानें जे कांही रागादिक भाव झाले असतील किंवा भोगोपभोग्य पदार्थांचा उपभोग घेतांना जी आसक्ति झाली, ती चांगलीच होती असें मानून तिचे पुनः पुन्हा चिंतन करणें, व ममत्वभाव प्रदर्शित करणें यास भावाप्रतिक्रमण म्हणतात.

पुढील काळीं किंवा पुढील भवांत भोगोपभोग्य पदार्थांची अभिलाषा करून त्याबद्दल ममत्व ठेवणें यास द्रव्याप्रत्याख्यान म्हणतात, आणि त्याच्या निमित्तानें भविष्यकाळीं होणाऱ्या रागादि भावांची इच्छा करणें व ममत्वभाव ठेवणें यास भावाप्रत्याख्यान म्हणतात

* * *

– २३० –

कर्मबंधापासून सुटका करणाऱ्या सम्यक्त्वाच्या विविध प्रकारांची कल्पना मी तुला देतें. व्यवहार-सम्यक्त्व व निश्चय-सम्यक्त्व हे सम्यक्त्वाचे दोन मुख्य प्रकार तुला ठाऊक आहेतच. देव, गुरु सत्य व शास्त्र यांवर श्रद्धा ठेवणें, यास व्यवहार-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सम्यक्त्व म्हणतात; आणि आत्म्यावर श्रद्धा ठेवणें यास निश्चय सम्यक्त्व म्हणतात. इतर निमित्तादिकांच्या अपेक्षेनें सम्यक्त्वाचे दहा प्रकार होतात.—

(१) जीवाज्ञा मानल्यामुळें जें तत्त्वश्रद्धान होतें, त्यास आज्ञासम्यक्त्व म्हणतात.

(२) निर्ग्रंथ मार्गाच्या अवलोकनानें जें सम्यक्त्व निर्माण होते, त्यास मार्गसम्यक्त्व म्हणतात.

(३) तीर्थंकरादिपुरुषश्रेष्ठांचें वर्णन करणाऱ्या पुराणाच्या उपदेशानें, उत्पन्न झालेल्या सम्यक् ज्ञानानें आणि आगमसमुद्रामध्यें पारगामी असलेल्या पुरुषांच्या उपदेशानें जी एक प्रकारची दृष्टि प्राप्त होते, तिला उपदेशसम्यक्त्व म्हणतात.

(४) मुनींच्या आचार-विधानांचें प्रतीक असलेल्या आचार सूत्रांचें श्रवण करून जें श्रद्धान होतें, त्यास सूत्रदृष्टि म्हणतात. हें सूत्र म्हणजेच सम्यक्त्व होय.

(५) गणित ज्ञानास कारणभूत जें बीज-सूत्र, त्यामुळें दर्शनमोहाचा अनुपम-उपशम होतो. त्या उपशम-सामर्थ्याच्या निमित्तानें अत्यंत दुर्बोध पदार्थसमूहांची उपलब्धि अथवा श्रद्धावरूप परिणति ज्यास प्राप्त झाली आहे, असा करणानुयोगाचा जो ज्ञानी त्यास बीजदृष्टि असते. हें बीजच सम्यक्त्व जाणावें.

(६) पदार्थांना संक्षेपानें जाणल्यामुळें जें श्रद्धान होतें, ती श्रेष्ठ संक्षेपदृष्टि होय.

(७) द्वादशांगवाणी ऐकून जी रुचि व जें श्रद्धान उत्पन्न होतें, त्यास विस्तारदृष्टि म्हणतात. यासच विस्तार-सम्यक्त्वहि म्हणतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

(८) जिनशास्त्रांच्या वचन-श्रवणाशिवाय कोणत्या तरी इतर पदार्थांच्या निमित्तानें प्राप्त होणाऱ्या अर्थदृष्टीस अर्थ सम्यक्त्व म्हणतात.

(९) अंग व अंगबाह्यसहित जैनशास्त्रांमध्यें अवगाहन करून उत्पन्न झालेली जी दृष्टि ती अवगाढ दृष्टि होय. यासच अवगाढ-सम्यक्त्व म्हणतात. तसेंच श्रुतकेवलींना जें श्रद्धान असतें, त्यास देखील अवगाढ-सम्यक्त्व म्हणतात.

(१०) केवलज्ञानींना जें तत्त्वश्रद्धान असते, त्यास परमावगाढ सम्यक्त्व म्हणतात.

याप्रमाणें सम्यक्त्वाचे दहा प्रकार होतात. * * *

– २३१ –

प्रत्येक कार्य आपापल्या योग्यतेनुसार होतें. ज्या कार्याच्या उपादानामध्यें योग्यता नसेल, तें कार्य होणार नाहीं. जीवामध्यें अशी शक्ति आहे, कीं ज्यामुळें तो कर्माशी बद्ध होतो. ती योग्यता अनादि कालापासून त्याच्याजवळ आहे. तिलाच वैभाविक शक्तीचें विभावरूप परिणमन म्हणतात. परंतु हें विभावरूप परिणमन दुसऱ्याच्या निमित्ताशिवाय होत नाहीं. प्रत्येक पदार्थामध्यें विशेष निमित्ताशिवाय जी परिणमनें होतात, तीं सर्व स्वाभाविक असतात असा नियम आहे. पण विभावरूप परिणमनाला कारणीभूत सामग्रीला कर्म म्हणतात. हें कर्म प्रतिसमय जीवाशीं बद्ध होतें, आणि कार्य संपतांच फल देऊन निघून जातें. याप्रमाणें जीवाच्या विभावरूप परिणमनाच्या निमित्तानें कर्में बांधलीं जातात. या कर्मांमुळेंच जीवाची विभावरूप परिणति होते. यांतूनच संसार

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निर्माण होतो. जीवाला बद्ध करून टाकणारी दशा म्हणजेच संसार होय. या दशेंत केल्या गलेल्या बऱ्या वाईट कृत्यामुळं जीवाच्या परिणामांत अशुद्धता येते, ही अशुद्धता अन्य-निमित्तक असल्यामुळें उपचारानें तद्‌गुणाकार संक्रमरूप मानली आहे. येथें तद्‌गुण अर्थानें जीव ज्यानें बांधता त्याचे गुण घतले आहेत. जीवामध्यें कर्मांच्या गुणांचा संचार होतो; त्यामुळें अमूर्त जीव देखील मूर्त म्हणविला जातो. पण याचा असा नव्हे कीं जीव कर्मरूप होतो. याचा अर्थ असा कीं कर्मानुकूल जीवाचें परिणमन होतें. मोहाचा उदय झाल्यावर जीव अन्य पदार्थांवर ममता करूं लागतो. ज्ञानावरणाचा उदय झाल्यावर जाणण्याची शक्ति असतांना देखील अन्य पदार्थांना जाणूं शकत नाहीं. निमित्तनैमित्तिक संबंधच असा आहे कीं, त्यायोगें जीवाची परिणति अशा प्रकारची होते; म्हणूनच या परिणतीला पराधीन म्हटलें आहे. ही पराधीनता जीवाला निर्बल बनविते.

कर्मांच्या निमित्तानें रागादि भाव होतात. त्यांपासून तूं मुक्त हो म्हणजे तूं आपोआप शुद्ध होशील. ही शुद्धावस्था म्हणजेच मोक्ष होय. * * *

– २३२ –

अंतरात्मन् ! कर्मबंधाच्या केवळ चिंतनानें तूं संत्रस्त होऊं नकोस. आर्त व रौद्र ध्यान सोडून तूं धर्मज्ञान करीत आहेस ही आनंदाची गोष्ट आहे. पण एवढ्यावरच संतुष्ट राहूं नकोस. कारण धर्मज्ञान मोक्ष मिळवून देण्याचें एक श्रेष्ठ साधन असलें तरी तेवढ्यानें कांही मुक्ति मिळणार नाहीं. त्यासाठीं धर्म-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ध्यानाच्या पुढें आणखी मजल गाठली पाहिजे. शुक्लध्यानाच्या अवलंबनानें मुक्ति मिळते. ह्या मार्गानेंच महान् यतीश्वर कर्म-बंधनाच्या वलयांतून मुक्त झाले आहेत.

* * *

– २३३ –

तूं बंधाच्या स्वभावाचीं कारणें व आत्म्याचा स्वभाव जाणून घे. बंधाच्या कारणापासून तुझ्या आत्म्यास अलग ठेव. तोच कर्ममुक्तीचा मार्ग आहे. कर्ममुक्तीला कारण असणाऱ्या शुक्लध्यानाचें स्वरूप तूं जाणून घे.

* * *

– २३४ –

स्वरूपाचें ध्यान करणाऱ्या सम्यक्त्वी जीवानें प्रथम स्वपर-भेद-विज्ञान जाणून घ्यावें; नोकर्म, द्रव्यकर्म व भावकर्मरहित चैतन्यरूप आपलें रूप आहे हें ओळखावें. परद्रव्यांचा विचार सुटल्यानंतर आत्म्याच्या ठिकाणींच तो केंद्रित करावा. 'मी चिदानंदस्वरूप आहे, शुद्ध आहे, सिद्ध आहे,' असा त्यानें विचार करावा. यामुळेंच खरा आनंद मिळूं शकतो. यामुळेंच निर्विकल्प समाधीचें सुख मिळूं शकतें.

सविकल्प दशेमध्यें ज्ञान अनेक ज्ञेयांना जाणणारें असतें. तेंच ज्ञान निर्विकल्प दशेमध्यें केवळ आत्म्यालाच जाणतें. शुद्ध सम्यक्त्वी जीवाच्या ज्ञानाची ही विशेषता आहे.

* * *

– २३५ –

कर्मबंध व आत्मा यांना अलग अलग करणारी प्रज्ञाच शुद्धात्म्याचा विशुद्ध आणि निर्विकल्प आनंद प्राप्त करून देते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ही प्रज्ञा जितकी तीव्र आणि सर्वंकष असेल तितकाच तिच्यामुळें लाभणारा आनंद सर्वंकष असतो.

डोळा, कान, नाक, जीभ, स्पर्श व मन हीं माणसाचीं इंद्रियें आहेत. या इंद्रियांमार्फत ज्ञानप्राप्ति होते म्हणून त्यांना ज्ञानेंद्रियें म्हणतात. परंतु प्रगति करीत करीत सर्वोच्च ज्ञानाची प्राप्ति जेव्हां होते तेव्हां होणारें ज्ञान कसें असतें ? या इंद्रियां-मार्फतच त्यास ज्ञान होतें काय ? त्याला होणारें ज्ञान इंद्रियां-मार्फत न होतां तें आत्मिक ज्ञान होतें. अप्रगत अवस्थेंत पांच इंद्रियें व मन यांनीं जें ज्ञान प्रवृत्त होतें तें ज्ञान प्रगत अवस्थेंत किंवा निर्विकल्प अनुभवामध्यें सर्व बाजूंनीं परावृत्त होऊन केवळ स्वस्वरूप सन्मुख होतें.

* * *

– २३६ –

प्रज्ञेनें ग्रहण केलेला व अनुभवलेला शुद्धात्मा मीच आहे. माझ्यांतील रागभाव हे माझे नाहींत. अनादिकालापासून त्यांच्याशीं माझा संबंध आला ही दुर्दैवाची गोष्ट आहे. माझ्या इच्छित मार्गांतले हे विकार म्हणजे अडथळे होत. या अडथळ्यां-मुळेंच मी अजून माझ्या मुक्कामाला पोहोंचूं शकलें नाहीं, याची आता मला परिपूर्ण कल्पना आल्यामुळें मी आता ‘सोऽहं’ या माझ्या एकमेव मंत्राचाच सतत जप करीत आहे. संपूर्ण आत्मिक गुणांनीं परिपूर्ण आणि सर्व प्रकारच्या विकारांनीं रहित असलेला अत्यंत शुद्ध असा आत्मा मीच आहे. या शुद्धात्म्याचाच ध्यास मला लागला आहे.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

— २३७ —

सर्व गुणांनीं परिपूर्ण असा परमात्मा व तूं यांत कसलाहि फरक नाहीं. तूं ज्ञान दर्शनात्मक आहेस. याचा परिपूर्ण विकास झाला कीं तूं परमेश्वर बनशील. ज्याप्रमाणें दर्शन हा चैतन्याचा गुण आहे, त्याचप्रमाणें ज्ञान आत्म्याचा गुण आहे. तूं तुझ्या मूळ स्वरूपाला तुझ्या अखंड ज्ञानानेंच जाणूं शकशील. तूं परिपूर्ण ज्ञानी असून पूर्ण विकासी परमात्मा आहेस. परंतु द्रव्यकर्में, भावकर्में आणि नोकर्में यापासून मात्र तूं वेगळा आहेस. त्यांना तूं जाणतोस, ही गोष्ट सत्य असली तरी ही बुद्धि सुद्धां तूं सोडून दे. तूं ज्ञायक स्वभावाचा असून त्यालाच जाणणारा आहेस. याकडेच तूं आतां पूर्ण दृष्टि लाव. यासाठींच 'सोऽहं' महाध्वनि सतत चालूं दे. त्यांत तूं लीन हो.

* * *

— २३८ —

पापी लोक भयभीत असतात; पण निष्पाप लोक मात्र नेहमीच निर्भय असतात. उजळ माथ्यानें ते वावरत असतात. एखादें बालक जितकें सुखी असतें तितकेच ते सुखी असतात. त्यांचा आनंद अकृत्रिम असतो. त्यांना कोणीहि शत्रु नसतात. दुष्ट वाणी, दुष्कृत्यें, हिंसक कृत्यें यामुळें जगांत शत्रू निर्माण होत असतात. पण सज्जन माणसें यांपैकीं एकहि गोष्ट करीत नसल्यामुळें त्यांना कोणी शत्रूच नसतो. त्यामुळें स्वच्छंदी पांखराप्रमाणें ते विहार करतात; आनंदानें जगतात. मृत्यूचेंहि आनंदानें स्वागत करतात. त्यामुळें त्यांचा अपराध नसतांहि जर कोणी त्यांना त्रास दिला तर त्याबद्दल त्यांना कसलीच खंत वाटत नाहीं. असा अजातशत्रु तूं हो !

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २३९ –

चित्तशुद्धीचा उपाय देहशुद्धी एवढाच महत्त्वाचा असतो. जीवन हें संमिश्र भावनांनीं युक्त असल्यामुळें त्यांत घाण निर्माण होते. सश्रद्ध जीवन जगत असतांहि काजळी निर्माण होते. या काजळीनें दैदीप्यमान दिसणारें जीवनहि काहीं काळाने काळवंडून गेलेलें दिसून येतें.

यासाठीं योग्य शास्त्र, गुरु यांच्याकडे जाऊन श्रद्धेचें शुद्धीकरण करणें, कांही दोषपूर्ण वागणुकींचा जाहीर निषेध करणें, गुरूजवळ स्वतःचें मन मोकळें करणें इत्यादि उपाय चित्तशुद्धीसाठीं सांगितले आहेत.

पण या उपायांकरवीं हमखास चित्तशुद्धी घडतेच असें मात्र नाहीं. चित्तशुद्धी ही आत्मिक आहे. आत्म्याची प्रवृत्ति रुजूं असल्याशिवाय या प्रकारांनीं चित्तशुद्धी होणार नाहीं. ***

– २४० –

भाग्यशाली महान् लोक सर्व परद्रव्यांचा त्याग करून आपल्या आत्मस्वरूपांत लीन राहतात. सर्व प्रकारच्या रागादि अपराधांपासून ते मुक्त होतात. ते नवीन कर्मबंधनें निर्माण होऊं देत नाहींत व पूर्वींचीं कर्मबंधनें मात्र नियमानें तोडतात. शेवटीं नित्य उदयरूप अन् प्रकाशमान अशा केवलज्ञानाची प्राप्ति करून घेऊन ते मोक्षाला जातात. तूहि तोच मार्ग धरावा. * * *

– २४१ –

जीवाचा महिमा जसा थोर आहे तसाच अजीवाचा महिमाहि अगाध आहे. प्रचंड प्रमाणांत पसरलेला, नटलेला व थाटलेला

– १२

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संसारहि जीव आणि अजीव यांच्या संबंधापासूनच निर्माण झाला आहे. या उभयतांचें सहअस्तित्व नसतें तर मात्र या पृथ्वीवर एकहि चैतन्यमय जीव आढळला नसता. 'ही पृथ्वी म्हणजे जडांनीं भरलेला अफाट असा प्रदेश' असेंच तिचें वर्णन करावें लागलें असतें. स्व आणि पर यांतला भेद न समजतां त्यांना एक समजल्यानें ज्ञानावरणादि कर्मांच्या प्रवृत्तीच्या निमित्तानें हा आत्मा रागादिभावांनीं युक्त होऊन अनेक वेळां जन्म घेतो आणि तितक्याच वेळां मरणहि पावतो. या अनंत जन्मांत आत्म्यामध्यें रागादिभाव उत्पन्न होतात व विलग पावतात. सागरांतल्या लहरींप्रमाणें हे रागादिभाव क्षणाक्षणाला उत्पन्न होतात व नष्ट पावतात.

* * *

– २४२ –

व्यवहारांत निमित्तनैमित्तिक संबंध फार महत्त्वाचा आहे. उपादान व निमित्ताशिवाय कोणतेंच कार्य होऊं शकत नाहीं. कोणतेंहि कार्य मग तें लहान असो किंवा मोठें असो केवळ एका द्रव्यानें होऊं शकत नाहीं. तेथें या जीवाजीवांची किंवा जडाजडांची संगति पाहिजेच; उपादानाला जसें महत्त्व आहे तसें निमित्तालाहि आहे. एका कार्याच्या पूर्तीसाठीं अनेक कारणें लागतात. कोणतेंहि कारण अपुरें पडलें तर तें कार्य होऊं शकत नाहीं हा या व्यवहारांतला अनुभव आहे.

* * *

– २४३ –

परद्रव्याचा कर्ता असणें किंवा परद्रव्य भोगणें हा आत्म्याचा स्वभाव नव्हे; अज्ञानामुळें जीव परद्रव्याचें कर्तृत्व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व भोक्तृत्व स्वत:कडे ओढवून घेतो. त्यामुळेंच तो ज्ञान व ज्ञेय एकच मानतो. पण अज्ञानावस्था संपतांच ही कर्तृत्वाची व भोक्तृत्वाची भावना आपोआप नष्ट होते.

* * *

– २४४ –

अज्ञानी व ज्ञानी यांत फरक काय ? असा प्रश्न वारंवार विचारला जातो. दोघेंहि त्याच क्रिया करीत असतात. पण एक ती क्रिया अज्ञानपणें करतो, तर दुसरा ती जाणीवपूर्वक करतो. अज्ञानी कर्मफल – म्हणजे प्रकृतीच्या स्वभावानुरूप फल भोगतो. ज्ञानी मात्र कर्मफल जाणतो, पण तें तो भोगत मात्र नाहीं. ज्ञानी आणि अज्ञानी यांच्यांतला फरक आणखी एका उदाहरणानें स्पष्ट केला गेला आहे. अज्ञानी खाण्यासाठीं जगतो, आणि ज्ञानी जगण्यासाठीं खातो. अज्ञानी मनुष्य शुद्ध आत्मा जाणत नाहीं. शुद्ध ज्ञानाची त्याला कल्पना नसते. त्यामुळें स्व-पर यांतील फरक त्याला कळत नाहीं; म्हणून परद्रव्यासहि तो अहंपणें भोगतो. पण ज्ञानी तसें करीत नाहीं. त्याला भेदविज्ञान झाल्यानें तो हेय आणि उपादेय, चांगलें-वाईट यांतला फरक जाणतो; म्हणून तो बाह्य भोगांचा संपूर्णपणें त्याग करतो, व शुद्ध आत्म्याचाच 'सोऽहं' बुद्धीनें स्वीकार करतो.

* * *

– २४५ –

सतत त्याज्य गोष्टी करणारा अज्ञानी मधून मधून चांगल्या गोष्टी देखील करीत असतो; पण म्हणून तो ज्ञानी ठरूं शकत नाहीं. खूप दारू पिऊन झिंगलेला मनुष्य आईस बहीण, बहिणीस मुलगी व मुलीस पत्नी मानतो. तशी तो बडबड करतो. पण एखादे वेळेला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तो आईस आई, बहिणीला बहीण व मुलीस मुलगी समजतो. देखील पण याचा अर्थ असा नव्हे कीं, त्याचा दारूचा अंमल गेला व तो चांगल्या अवस्थेंत बडबड करतो. तसेंच अज्ञानी नेहमीच परद्रव्याचा कर्ता व भोक्ता असतो. * * *

– २४६ –

अज्ञानी मनुष्यानें शास्त्राचें पठन केलें किंवा इतर चांगल्या गोष्टी केल्या म्हणून तो ज्ञानी ठरत नाहीं. त्याला पूर्वी इतकाच कर्मबंध राहील. कारण कर्मप्रकृतीशीं तो एकरूप होऊन कार्य करीत असतो. परद्रव्यासंबंधीचें त्याचें कर्तृत्व व भोक्तृत्व सुटत नाहीं. विषारी सर्पानें चावा घेतला नाहीं म्हणून तो निर्विष झाला अशी कल्पना करणें जसें व्यर्थ आहे, त्याप्रमाणें एक-दोन चांगल्या कृतींवरून अज्ञान्यास ज्ञानी म्हणणें चुकीचें ठरेल. परद्रव्यासंबंधींचें कर्तृत्व व भोक्तृत्व गेल्याशिवाय खऱ्या ज्ञानाचा प्रकाश पडणार नाहीं. * * *

– २४७ –

शरीर व आत्मा यांच्या भिन्न स्वभावाचें ज्याला सम्यक् ज्ञान झालें आहे; असा परम तत्त्वज्ञानी जीव, संसार, शरीर व भोग यांपासून सर्वथा अलिप्त होतो. त्याच्या या विरागतेमुळें तो शुभाशुभ कर्मांचें फल न भोगतां त्यापासून तो आपल्या शुद्ध आत्म्यास अलग ठेवतो. तो अशुभ कर्मफळास विषाप्रमाणें कडु समजतो, व शुभकर्म-फलास शर्करा किंवा अमृताप्रमाणें गोड समजतो. मात्र या दोन्ही फलांपासून तो अलिप्त राहतो. * * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २४८ –

सृष्टीच्या व तिच्यातील यच्चयावत् प्राण्यांच्या उत्पत्ती-संबंधीं लोकांत किती अज्ञान आहे ! आत्म्याला कर्ता मानणारे सामान्य लोक अज्ञच आहेत; पण मुनी आणि संन्यासी लोकहि जर सृष्टीचें कर्तृत्व व भोक्तृत्व स्वत:कडे घेऊं लागले तर तेहि अज्ञच नव्हेत का ?

* * *

– २४९ –

आत्म्याला कर्ता मानणारे लोक सामान्य असोत किंवा मुनी असोत, दोघेहि सारखेच अज्ञ जाणावेत. कांही लोक विष्णु किंवा ईश्वर याना कर्ता मानतात; तर श्रमण लोक आत्म्याला कर्ता मानतात. या अज्ञानी वृत्तीबद्दल लौकिक-जनांना ज्याप्रमाणें मोक्ष नाहीं; त्याप्रमाणें श्रमणांना देखील मोक्ष नाहीं. रागद्वेषपूर्वक आत्म्याचें व ईश्वराचें कर्तृत्व व भोक्तृत्व प्रस्थापित करणाऱ्यांना कर्मबंध होईल व त्याचें फल त्यांना भोगावेंच लागेल. कर्मफलांचा स्वाद घेणाऱ्यांनीं मोक्षाची अपेक्षा धरण्यांत काय अर्थ आहे ?

– २५० –

विश्व आणि विश्वांतील चराचर यांचें कर्तृत्व मानणाऱ्या लौकिक-जनांना आणि कांही श्रमणांना मोक्ष कां नाहीं, अशी शंका विचारली जाते. आत्म्याच्या यथार्थ स्वरूपावर श्रद्धा ठेवणें, आत्म्याचें यथार्थ स्वरूप जाणून घेणें व आत्म्याची कर्मांपासून सुटका करण्यासाठीं सम्यक् आचरण ठेवणें, या तीन गोष्टींच्या द्वारें मोक्षाची प्राप्ति होत असते. पण वरील लौकिक जन व श्रमण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यांची आत्म्याच्या खऱ्या स्वरूपावर श्रद्धा नसते. त्यांना आत्म्याचें खरें ज्ञान नाहीं व त्यामुळेंच त्यांचें आचरणहि सम्यक् नाहीं; म्हणून त्यांना मोक्षाची प्राप्ति होत नाहीं. अन्य द्रव्यें व आत्मा यांचा कांही एक संबंध नाहीं; म्हणून कर्ता-संबंधाचा त्यांच्यांत सर्वथा अभाव आहे. वस्तुतः सृष्टीच्या कर्तृत्वासंबंधीचें हेंच सम्यक् स्वरूप आहे.

* * *

– २५१ –

व्यवहारनयाचें स्वरूप चांगल्या प्रकारें जाणून घे. व्यवहारनय हा व्यवहार समजून घेण्याकरितां आहे. त्यांतच रममाण होणें योग्य नाहीं. तूं आपल्या ज्ञायक स्वभावांतच रमून जा.

* * *

– २५२ –

आकाशांतून पडणारं पाणी स्वच्छ असतं; पण तें जमिनीवर पडतांच गढूळ बनतं. त्यांत माती आणि खडे मिसळतात. वरवर पाहणारास पाणी आणि माती एकजीव झाल्यासारखें दिसतें. पण वस्तुतः दोन्ही द्रव्यें अलग आहेत. जीवाचें लक्षण म्हणजे ज्ञान ! ज्ञान ही अत्यंत पवित्र वस्तु ! पण तो अपवित्र बनतांच जीवाची खऱ्या स्वरूपावरील श्रद्धा उडून जाते. मिथ्या ज्ञानानें श्रद्धा देखील मिथ्या होते. यामुळेंच मनुष्य मिथ्यात्वी म्हणविला जातो. म्हणजे चेतन पुद्गल कर्मांच्या सान्निध्यांत येतांच मिथ्यात्वाची निर्मिति होते !

* * *

– २५३ –

तूं अनंत ज्ञानी आहेस ! तुझ्यांत अनंत दर्शन आहे. जगांतील मोठ्यांतील मोठ्या सागरांना देखील किनारा आहे;

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पण तुझ्या अंतरंगांत वसलेल्या अनंत शक्तीला मात्र बांध नाहीं. तूं शुद्ध स्वरूपांत राहिलास तर तुझ्या सुखाला देखील अंत राहणार नाहीं. तुझा स्वभाव चैतन्यमय आहे. द्रव्यांतील सामान्य व विशेष स्वरूपाला तें प्रकाशित करतें. द्रव्याचें जसें स्वरूप आहे तसें आपणांस प्रतिभासित होणें यासच चैतन्य असें म्हणतात. सामान्य प्रतिभास म्हणजे दर्शन व विशेष प्रतिभास म्हणजे ज्ञान होय.

* * *

– २५४ –

कोळशांत निखारे बनण्याचें सामर्थ्य जसें असतें तसें परमात्मा बनण्याचें सामर्थ्य आपल्या आत्म्यात असतें. तें सामर्थ्य प्रगट व्हावें म्हणूनच तर हा खटाटोप आहे.

* * *

– २५५ –

संपूर्ण विश्वाची विभागणी स्वर्ग, मध्य आणि पाताळ या तीन भागांत झाली आहे. या अफाट विश्वांत अनंतानंत जीव असून त्यांचे नानाविध प्रकार आहेत. त्यांची पुन्हा प्रामुख्यानें चार भागांत विभागणी झाली आहे. स्वर्गांतील देव, पृथ्वीवरील मानव आणि तिर्यंच आणि पाताळांतील नारकी ! ही विभागणी कशी झाली ? याला कारणीभूत कोण आहेत ? कोणत्याहि जीवाच्या केवळ इच्छेनें घडून येणारी ही घटना नव्हे ! त्यांतहि कोणी अल्पायुषी तर कोणी दीर्घायुषी ! कोणी कुरूप तर कोणी सुंदर ! कोणी उच्च वर्णीय तर कोणी नीच वर्णीय ! कोणी दानवीर तर कोणी कंजूष ! ह्या गोष्टी कांही मनुष्यकृत नव्हेत!

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

याला शास्त्रीय कारणें आहेत. एका भवांतून दुसऱ्या भवांत, एका गतींतून दुसऱ्या गतींत जीव भ्रमण करतो, आणि तेथें कांही काल स्थिर राहतो. याला कारण म्हणजे आयुकर्म होय ! पुनर्जन्मावर ज्यांचा विश्वास आहे त्यांना ही गोष्ट मान्य करावी लागेल कीं, कोणती तरी एक अदृश्य शक्ति असल्याशिवाय कोणी मानव म्हणून, कांही पशु म्हणून, कोणी नारकी व कांही देव म्हणून जन्म घेणें शक्य नाहीं. आयुष्य संपतांच सगळेच देव, सगळेच मानव, सगळेच पशु-पक्षी किंवा सगळेच नारकी म्हणून जन्म घेत नाहींत. प्रत्येक जीव आपापल्या परिणामांच्या तीव्र मंदतेप्रमाणें निरनिराळ्या गतींत जन्म घेतो. त्या त्या गतींत जितकें आयुष्य असेल तितक्या कालपर्यंत जीव तो तो पर्याय धारण करतो. आयुष्य संपतांच पुन्हा दुसऱ्या गतीकडे त्याचा प्रवास सुरू होतो.

* * *

– २५६ –

तूं मोठमोठे अपघात अनेक वेळां पाहिले असशील. या सर्वसंहारक अपघातांत मोठीं माणसें निधन पावल्याचीं व लहान मुलें जिवंत राहिल्याचीं अनेक उदाहरणें तुला ठाऊक आहेत ! 'देव तारी त्याला कोण मारी' अशा म्हणी देखील रूढ झाल्या आहेत. शिवाय कांहीजण चालतां चालतां किंवा बोलतां बोलतां मरतात तर कांही मरणांतिक रोगांतूनहि वाचतात ! हा सगळा विचित्र प्रकार कां घडतो? याला एकमेव कारण म्हणजे आयुकर्म ! या कर्मानें प्रत्येक गतींतील जीवाला त्याच्या आयुष्याची मर्यादा ठरवून दिलेली असते. या कर्मामुळेंच मनुष्यादि पर्याय टिकून राहतात किंवा नष्ट होतात. जोंपर्यंत आयुकर्माचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उदय चालू आहे तोंपर्यंत रोगादिक कारणें मिळालीं तरीहि देहाचा संबंध सुटूं शकत नाहीं. अन् आयुकर्माचा उदय नसला तर मात्र कितीहि प्रयत्न केले तरी देहाचा संबंध टिकून रहात नाहीं.

* * *

– २५७ –

प्रत्येक आत्म्याच्या ठिकाणीं अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत सुख आणि अनंत वीर्य या शक्ति अस्तित्वांत आहेत! कांही बोटावर मोजण्याइतक्या माणसांमध्येंच त्या शक्तीचा आविष्कार होतो आणि इतरांत कां होऊं नये? इतरांमध्यें त्या शक्ति नाहींत का? त्या असूनहि त्यांचा आविष्कार कां होऊं नये? त्या शक्ति आविष्कृत होत नाहींत याला कारण म्हणजे त्या सुप्त स्वरूपांत आहेत हें होय! त्या शक्ति सुप्त स्वरूपांत राहण्याचें किंवा त्यांना प्रतिबंध होण्याचें कारण म्हणजे अंतराय कर्म होय!

* * *

– २५८ –

जीव सूक्ष्म आहे आणि शरीर स्थूल आहे. जगांत चाललेलीं युद्धं, लढाया, भांडणं, मारामाऱ्या या गोष्टी कोण करतात? जीव या गोष्टी करतो काय? पण सूक्ष्म असलेल्या जीवाकडून या स्थूल गोष्टी कशा होतील? जीव स्वतः दुसऱ्याला मारीत नाहीं आणि दुसरे त्याला ठार करूं शकत नाहींत! जीवासंबंधीं मारणें आणि मरणें या गोष्टींची कल्पना करणें मिथ्या आहे. जीव अविनाशी आहे. तो जसा जन्मत नाहीं, त्याप्रमाणें मरतहि नाहीं. तो अच्छेद्य आहे. असें असतांना मरणें आणि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मारणें या गोष्टी कशा संभवतात? त्या फक्त शरिराच्या बाबतींत संभवतात. एखाद्याला मारणें किंवा त्याच्याकडून मारला जाणें या क्रिया परघात नामकर्माच्या उदयानें होतात. त्या कर्माचा उदय झाला कीं, एकमेकांचे अवयव छेदणें, एकमेकांना जाळणें, ठार मारणें किंवा जखमी करणें अशा दुष्ट क्रिया संभवतात. त्यालाच आपण अमुक एक व्यक्ति ठार झाली, जखमी झाली असें म्हणतो. * * *

– २५९ –

गुण आणि पर्यायांनीं (अवस्था) जें युक्त असेल त्यास द्रव्य म्हणतात. प्रत्येक द्रव्य अनंत गुणांचा व क्रमानें होणाऱ्या त्यांच्या पर्यायांचा पिण्ड आहे. म्हणून द्रव्याला गुण-पर्यायवान् म्हटलें आहे. सर्वच गुणांना अन्वयी व पर्यायांना व्यतिरेकी म्हटलें आहे. याचा अर्थ असा कीं, ज्यायोगें एका धारेमध्यें एकरूपता येते त्याला गुण म्हणतात, व ज्यायोगें भेदाचें प्रतिपादन केलें केलें जातें त्यास पर्याय म्हणतात. जीवामध्यें ज्ञानाची धारा केव्हांहि विच्छेद होऊं शकत नाहीं. ज्ञान गुण आहे; परंतु केव्हां तें मतिज्ञानरूप तर केव्हां तें श्रुतज्ञानादि रूप होतें, म्हणून मतिज्ञानादि ज्ञानाचे पर्याय होत. द्रव्य नेहमी या गुण-पर्यायांनीं युक्त असतें, म्हणून त्यास गुण-पर्यायवान् म्हणतात. * * *

– २६० –

प्रत्येक पदार्थांत समयासमयाला परिवर्तन चालू आहे. पूर्वपर्यायाचा नाश आणि नवीन पर्यायाची निर्मिति हा उत्पाद-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व्ययाचा क्रम सतत चालू आहे. याच्या अभावीं एका वस्तूपासून दुसऱ्या वस्तूची निर्मिति करतां आली नसती. पण हें पर्यायान्तर कोण करतो ? सोन्याच्या गोळ्यापासून सोनार निरनिराळे अलंकार करतो. कापसाचें कापडांत रूपांतर होतें; पण तें विणकरच करतो का ? मातीपासून मूर्तिकार निरनिराळ्या आकृत्या तयार करतो. व्यवहारांत आपण त्यांचें कर्तृत्व सोनार, विणकर, मूर्तिकार यांना देतो. पण वस्तुतः ते त्या आकृत्यांच्या निर्मितीस निमित्तमात्र आहेत. मूळ निमित्त तीं तीं द्रव्येंच आहेत. त्यांच्या अभावीं वरील विणकरादिकांना नवीन पर्याय करतां आले नसते; म्हणून या पुद्गल पर्यायांच्या निर्मितीस निमित्त विणकरादि नसून, त्या त्या वस्तूंतच नवीन पर्याय धारण करक्षमता असल्यानेंच नवीन पर्याय निर्माण होतात. * * *

– २६१ –

कर्माचा उदय झाला कीं, त्याचें सुखदुःखात्मक फल भोगावेंच लागतें. अध्यापक अध्यापनाचें कार्य करतो. त्यानें शिकविलेलीं मुलें हुशार निघालीं कीं, त्यास आनंद होतो. कृषीवलास शेतांतून अधिक धान्य मिळालें कीं, आपल्या कष्टाचें साफल्य झालें या जाणीवेनें हर्ष होतो. * * *

– २६२ –

आत्मा देखील विविध क्रियारूप व परिणामस्वरूप कृत्यें करतो व त्यांचीं फळें भोगतो. आत्मा हा परिणामाचा अनन्यरूप असें एक द्रव्य असल्यामुळें त्याच्यांत व परिणामांत परिणामी व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परिणाम असा संबंध निर्माण होतो. आत्मा आधीं कर्म करतो, व नंतर त्याचें फल भोगतो. कर्म करतांना कर्मचेतना व परिणाम भोगतांना कर्मफलचेतना असते. * * *

– २६३ –

हा रंगारी भितीला रंग देत आहे. पिवळ्या रंगानें भित शोभून दिसते. भित आणि रंग एकजीव झाल्याप्रमाणें दिसतात; पण म्हणून रंग म्हणजे भित नव्हे किंवा भित म्हणजे रंग नव्हे. दोन्ही एकत्र आहेत म्हणून ते एक आहेत, असें म्हणतां येणार नाहीं. ***

– २६४ –

हा मूलतःच ज्ञाता आहे. ज्ञान आणि दर्शन हे त्याचे नैसर्गिक गुण आहेत. त्यांच्या साह्यानें तो सृष्टींतील अनेक वस्तु जाणतो; पण त्याचें ज्ञान-दर्शक गुण त्या जाणलेल्या वस्तु-स्वरूपाचे होत नाहीं. सृष्टींतील वस्तूंच्या निमित्तानें त्यांचें ज्ञान व्यक्त होतें, ही गोष्ट खरी आहे; पण हें ज्ञान त्यास त्या वस्तूंमुळें होत नाहीं. * * *

– २६५ –

युद्धामध्यें भाग घेऊन पराक्रम गाजविणारांना लोक पराक्रमी म्हणतात. पराक्रमी हा स्वभावतःच पराक्रमी असतो. त्याचा पराक्रम रणभूमीवर व्यक्त होतो इतकेच. स्वभाव परिस्थितींतून निर्माण होत नसून परिस्थितीनें तो व्यक्त होतो. खऱ्या श्रद्धेचें व खऱ्या चारित्र्याचें असेंच असतें. कोणत्याहि गोष्टीवर श्रद्धा एकरूप दिसल्या तरी त्या एकरूप नसतात. * * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २६६ –

शुद्ध नयाच्या दृष्टीनें विचार केला, तर कोणत्याहि द्रव्याचा स्वभाव दुसऱ्या द्रव्याच्या स्वभावरूप बनत नाहीं. चंद्राचें चांदणें पृथ्वीवर पडलें म्हणजे पृथ्वी शुभ्र दिसते. चांदणें आणि पृथ्वी एकरूप वाटतात; पण ती दोन्ही एक नाहींत. ज्ञान ज्ञेयाला जाणतें म्हणून ज्ञान व ज्ञेय एक नाहींत. तीं दोन्हीं भिन्न आहेत.

* * *

– २६७ –

आत्मा ज्ञानस्वभावाचा आहे. त्याच्या ज्ञानांत ज्ञेय पदार्थ प्रतिबिंबित होतात. पण ज्ञान व ज्ञेय मूलतःच भिन्न आहेत. जोंपर्यंत ज्ञान ज्ञानरूप नाहीं व ज्ञेय ज्ञेयरूप नाहीं, तोंपर्यंत अज्ञान राहणार. अज्ञान असेपर्यंत संसार-विषवृक्षाचीं फळें चाखावीं लागणार. म्हणून ज्ञानी होणें हाच सुखी होण्याचा मार्ग आहे.

– २६८ –

आपल्या तेजानें प्रकाशत राहणारा दिवा नाश पावला कीं, त्याच्याबरोबरच त्याच्या प्रकाशाचा नाश होतो. अन् दिव्याचा प्रकाश संपुष्टांत आला कीं, दिवा संपुष्टांत आला असं म्हणावयास कांही हरकत नाहीं. प्रकाशानें रहित असलेला दिवा कोणत्या उपयोगाचा ? ज्यामध्यें जें आहे तें त्याचा आधार नाहींसा झाला कीं, नष्ट पावतें. ज्याच्याजवळ जें नाहीं त्याचा नाश झाल्यावरहि त्याचा नाश होत नाहीं. खोलींत दिवा आहे. दिव्याचा नाश झाला कीं, खोलीचा नाश होत नाहीं. कारण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिवा आणि खोली यांचा संबंध दिवा आणि प्रकाश यांच्या संबंधाप्रमाणें नाहीं.

* * *

– २६९ –

ज्ञान, दर्शन आणि चरित्र हे आत्म्याचे धर्म आहेत. पुद्गल शरिराचा नाश झाल्यावर त्यांचा नाश होत नाहीं. पंचेंद्रिय विषयांचा घात झाल्यावर दर्शन–ज्ञान–चरित्राचा घात होत नाहीं. कारण त्यांचा आधार आधेय संबंध नाहीं.

* * *

– २७० –

ज्ञानावरण-दर्शनावरणादि आठ कर्मे अजीव आहेत! म्हणजे त्यांना चेतना किंवा ज्ञान-दर्शन हे गुण नाहींत. स्पर्श, रस, गंध आणि वर्ण हे अजीवाचे गुण आहेत! चेतना आणि स्पर्शादि गुण यांत मौलिक भेद आहे. चेतना हा जीवाचा गुण आहे. जीवाच्या आसक्तीमुळें जीव आणि कर्मे एकत्र येतात, व एक भासतात, पण भास म्हणजे सत्य नव्हे.

शरीर पडलें कीं, जीवाचेंहि पतन झालें असें आपण सारेच समजतों; किंवा जीव निघून जातांच शरीर नष्ट झाल्यागत आहे असें मानण्यांत येतें. पण वस्तुत: यांपैकीं एकहि गोष्ट घडत नाहीं. मृत्यूनंतर देहच दिसतो पण जीव दिसत नाहीं. याचा अर्थ तो नष्ट झाला असा नव्हे. जुना कपडा टाकून आपण नवीन कपडे परिधान करतों त्याप्रमाणें जीव एक शरीर सोडून दुसरें शरीर ग्रहण करण्यासाठीं जातो. म्हणजे आत्म्याचा नाश होत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाहीं. ज्ञान-दर्शन हे गुणहि आत्म्याबरोबरच असतात म्हणून अचेतन कर्में जीवाच्या सम्यक् ज्ञान-दर्शन-चरित्राचा घात करूं शकत नाहींत.

* * *

– २७१ –

क्रोधादिक विकार एका अर्थानें आत्म्याचेच आहेत. अचेतन पदार्थांत क्रोध, प्रेम, असूया यांची निर्मिति कुणी पाहिली आहे काय? ममतेनें उच्चारलेले शब्द देखील अचेतन व जड आहेत. त्या शब्दांद्वारें क्रोध, प्रेम, इ० चेतन भावना व्यक्त होतात एवढेंच !

* * *

– २७२ –

एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचा घात करीत नाहीं, किंवा एक द्रव्य दुसरें द्रव्य निर्माण करीत नाहीं. याचा अर्थ असा, कीं सर्व द्रव्यें आपापल्या स्वभावानें उत्पन्न होतात. माती जेव्हां कुंभरूपानें परिणमते तेव्हां कुंभांत मातीचेच गुणधर्म असतात व कुंभाराचे नसतात. मातीचे स्पर्श, रस, गंध आणि वर्ण हे गुण कुंभांत असतातच. म्हणजे माती आपल्या मूळ स्वभावाला उल्लंघीत नाहीं. याप्रमाणें सर्व द्रव्यें आपापल्या परिणामरूप पर्यायांनीं युक्त असतात.

* * *

– २७३ –

आत्म्यामध्यें उत्पन्न होणारे रागादिक परिणाम आत्म्याचेच आहेत ! ते तुझे नाहींत असें वाटणें मिथ्याज्ञान आहे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तूं स्वतः रागावतोस, क्रोध करतोस, अहंकारी बनतोस व त्याचा आरोप दुसऱ्यावर करतोस! तुझ्या अज्ञानामुळें पर-द्रव्यांवर जी आसक्ति बनते तीच तुला दोषी बनविते. तेव्हां अंतर्मुख होऊन तुझा अपराध तूंच शोधून काढ.

★ ★ ★

– २७४–

निंदेचे आणि स्तुतीचे असे दोन्ही प्रकारचे शब्द जड-अचेतन आहेत. विविध स्वर-व्यंजनांच्या युतीनें त्यांची निर्मिति होते. ती निर्मितीहि जड आहे असें तूं जाण. शब्दांमुळें तुझ्या मनांत विकृति होऊं देऊं नकोस.

★ ★ ★

– २७५ –

फुललेलें सुंदर फूल तुला ज्याप्रमाणें बोलावीत नाहीं; त्या प्रमाणें कुरूप वस्तूहि तुला बोलावीत नाहीं. सुरेल संगीत तुला लक्ष पुरविण्यास आणि बदसूर तुला दुर्लक्ष करण्यास सांगत नाहींत. असें असून सुंदर फूल व सुरेल संगीत या गोष्टी तुझें चित्त हिरावून नेतात, आणि कुरूप वस्तु व बदसूर संगीत तुझ्या तिरस्काराला निमित्तभूत होतात, हें आश्चर्य नव्हे काय? बाह्य पदार्थांतील स्वरूपांत कसलाहि बदल होत नाहीं; तुझ्यांत मात्र बदल होऊन विकारांची निर्मिति व्हावी, हें आश्चर्यकारक होय!

★ ★ ★

– २७६ –

झाडावरच पक्व झालेला आणि आपला सुगंध दरवळ-विणारा आंबा तुला मोह पाडतो. त्याची गोडी चाखावी अशी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तीव्र इच्छा तुला होते; म्हणजे पक्व आंब्याकडे तूं स्वत: आकर्षिला जातोस. आंबा कांहीं तुला आपल्याकडे बोलावीत नाहीं, किंवा त्याचें सेवन करण्यासहि सांगत नाहीं. आपणच अनेक प्रकारच्या भौतिक सुखांच्या कल्पना-साम्राज्यांत वावरतों. त्या साम्राज्याची निर्मिति आपण स्वत:च करतों.

* * *

– २७७ –

चांगलें-वाईट, इष्ट-अनिष्ट, सुख-दु:खकारक अशी भौतिक पदार्थांची विभागणी देखील आपली स्वत:चीच असते. निसर्गाची तशी विभागणी नाहीं. या विभागणीमुळें आम्हांस आमचें – आत्म्याचें सुख दिसून येत नाहीं.

* * *

– २७८ –

भूतकाळांत घडलेल्या बऱ्या-वाईट गोष्टींचें स्मरण करून कधीं सुखी तर कधीं कष्टी कां होतोस ? हीं सुख-दु:खें तुझे अंग-भूत गुण नाहींत. ते तर पौद्‌गलिक आहेत. पुद्‌गल कर्मापासून उत्पन्न होणाऱ्या सुख-दु:खात्मक भावांपासून आत्म्यास परावृत्त करणें यास प्रतिक्रमण म्हणतात. प्रतिक्रमण म्हणजे भूतकाळांत घडलेल्या दोषांची सूक्ष्म पाहणी, त्या दोषांची उघड कबुली. ती शाब्दिक असून काय उपयोग ? ज्ञान-चेतनेला शुद्धतेकडून विशुद्धतेकडे नेणें हाच एक मात्र उपाय आहे. ही विशुद्धावस्था तेव्हांच निर्माण होते, जेव्हां तूं नवीन कर्मबंधनांत सांपडणार नाहींस.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २७९ –

भविष्यकाळांत देखील तूं कर्मबद्ध होणार नाहींस अशी दक्षता – सावधानता म्हणजेच खरें प्रत्याख्यान.

वर्तमानकाळांतील मानवी जीवन म्हणजे भूतकाळांतील शुभाशुभ कर्मांचीं फळें, हें जाणून माध्यस्थ वृत्तीनें राहणें ही आलोचना.

* * *

– २८० –

ज्ञानाहून वेगळें असलेलें परद्रव्य मीच आहे अशी कल्पना करणें, ही अज्ञान चेतना होय. या अज्ञान-चेतनेमुळेंच परद्रव्यांच्या कर्तृत्वाबद्दल अहंकार निर्माण होतो. जीवाच्या सर्व क्रिया परद्रव्याभोंवतीच केंद्रित होतात. या कर्तृत्वमदानेंच पुन्हा कर्में बांधलीं जातात. हीच कर्मचेतना होय. कर्मफल भोगतांना विरक्तीपूर्वक तें भोगणें हाच ज्ञात्याचा मार्ग होय. भोगांतील आसक्ति काढली, तर भोग मोक्षदायक होतो.

* * *

– २८१ –

सर्व ज्ञानांचा सांठा शास्त्रांत आहे असें जरी म्हटलें जातें, तरी प्रत्यक्ष शास्त्र म्हणजे कांही ज्ञान नव्हे. शास्त्रांतील ज्ञान वचनात्मक असतें. स्वतः शास्त्र जड आहे, पौद्‌गलिक आहे. म्हणून शास्त्राहूनहि ज्ञान वेगळें आहे. यासाठीं शास्त्रावर असलेली तुझी आसक्ति तूं सोड. ज्ञान मिळण्याच्या अनेक साधनां-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पैकीं तें एक साधन आहे; म्हणून या साधनावर अवलंबून न राहतां तूं आपल्या ज्ञानावरच अवलंबून राहा.

* * *

– २८२, २८३, २८४, २८५ –

एखाद्या वस्तूच्या रूपाचें–आकाराचें– संख्येचें ज्ञान म्हणजे खरें ज्ञान नव्हे. ज्ञान हें त्या वस्तूच्या रूपाहून निराळें आहे.

एखाद्या वस्तूच्या रंगाचं ज्ञान म्हणजे खरें ज्ञान नाहीं. ज्ञान हें त्या रंगाहून वेगळें आहे.

ज्ञान वस्तूच्या गंधाहून, रसाहून वेगळें आहे. गंध हा जडाचा गुण आहे. जाणणें हा आत्म्याचा – चेतनेचा गुण आहे. दोघांमध्यें जमीन-अस्मानाचें अंतर आहे.

वस्तूच्या स्पर्शाचें ज्ञान म्हणजे ज्ञान नव्हे. स्पर्श हा जडाचा गुण, तो आत्म्याचा कसा होईल ?

* * *

– २८६ –

असाच खोल विचार सर्व अचेतन वस्तूंच्या गुणासंबंधीं केला, तर ज्ञान हें त्याहून वेगळें आहे; अचेतन वस्तूंचा सचेतन वस्तूंशीं निसर्गतः अर्थाअर्थी कांहीच संबध नाहीं, असें तूं जाण.

* * *

– २८७ –

याप्रमाणें सर्व परद्रव्यांपासून तुझें स्वरूप भिन्न आहे. तुझें स्वरूप म्हणजे ज्ञान होय. तूं म्हणजेच ज्ञान व ज्ञान म्हणजेच तूं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्ञाता व ज्ञान एकच होय. ध्याता, ध्यान व ध्येय एक झाले म्हणजे निर्विकल्प समाधीचें दर्शन होतें. ज्ञायक हाच जीवाचा स्वभाव. ज्ञातृत्व व द्रष्टेपणा हा आत्म्याचा स्वभाव. ते दोन्ही भिन्न नसून एकच आहेत. ज्ञान व ज्ञायक हे अभिन्न आहेत. निरंतर जाणणें हाच आत्म्याचा स्वभाव होय. या तुझ्या स्वरूपांत तूं सतत लीन राहा.

* * *

– २८८ –

ज्ञानच सम्यक् दृष्टि आहे. ज्ञानानेंच आत्मानुभूति निर्माण होते. ज्ञान म्हणजेच संयम होय. चेतनेंत ज्ञानाचें अस्तित्व असलें, कीं संयमाची निर्मिति होते. हा संयम ज्ञानानेंच होतो. हें ज्ञान म्हणजेच द्वादशांग सूत्र होय. द्वादशांग सूत्र ज्ञानाहून वेगळें नाहीं. ज्ञान म्हणजेच सूत्र व सूत्र म्हणजेच द्वादशांग असें समज. शुभाशुभ कृत्यांत ज्ञान-शक्तीच कार्य करते. संयम आणि तप यांत देखील ज्ञानच कार्य करतें. प्रव्रज्या किंवा दीक्षा म्हणजे सुद्धां ज्ञानच होय.

* * *

– २८९ –

आत्मा अमूर्तिक आहे. तो आहारक कसा असूं शकेल ? आहार मूर्तिक असून आत्मा अमूर्तिक आहे. पण तुझी सारी दृष्टि आहार ग्रहण करण्यांतच गढून गेली आहे. तुझें ज्ञान व आत्मा अमूर्तिक आहेत. तुझ्या आत्म्याचें शरीर म्हणजेच ज्ञान होय.

* * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २९० –

परद्रव्यांच्या ग्रहणाचें व त्याग करण्याचें कार्य परद्रव्यच म्हणजे देहच करणार ! आत्मा तर अबद्ध व अस्पृष्ट असा आहे. तो ज्ञानमय आहे. आत्मा कशाचें ग्रहण व कशाचा त्याग करतो ? तो परद्रव्यांच्या निमित्तानें होणाऱ्या प्रायोगिकी गुणांचा त्याग करतो, व परद्रव्यांशिवाय असणाऱ्या स्वाभाविक गुणांचें ग्रहण करतो. कर्मजनित भाव म्हणजे प्रायोगिक भाव होत. त्यांचा आत्मा त्याग करतो. कर्मांशिवाय असणारे भाव स्वाभाविक होत. आत्मा या भावांचें ग्रहण करतो. * * *

– २९१ –

विशुद्ध चैतन्यानें युक्त असलेला आत्मा परद्रव्याच्या परमाणूचें देखील ग्रहण करीत नाहीं व म्हणून तो त्याचा त्यागहि करूं शकत नाहीं. जीव व पुद्गल या दोघांच्याहि गुणांचें ग्रहण व त्याग तो करूं शकत नाहीं. परजीवांविषयीं रागद्वेष भाव बाळगणें, त्यांच्याशीं मैत्री व शत्रुत्व बाळगणें, स्त्री, पुत्र, शिष्य, गुरु या रूपांनीं संबंध ठेवणें इत्यादि सर्व प्रकार आत्म्याच्या बाबतींत होऊं शकत नाहींत. त्याच्या दृष्टीनें कोणी कोणाचा शत्रू नाहीं व कोणी कोणाचा मित्र नाहीं. पौद्गलिक देहांच्या बाबतींतच ह्या सर्व गोष्टी शक्य आहेत. हा कांही ज्ञानाचा स्वभाव नव्हे. ज्ञानांतच रममाण होणें हाच ज्ञानाचा म्हणजे आत्म्याचा स्वभाव आहे. ज्ञान ज्ञानमयच राहील. त्याचें लक्षण कधींच बदलणार नाहीं. * * *

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– २९२ –

जो आत्मा स्वतः कशाचें ग्रहण करीत नाहीं, कशाचा त्यागहि करात नाहीं, तो विशुद्ध आत्मा होय. अशा आत्म्याच्या विशुद्धतेसाठीं—कैवल्यपद प्राप्तीसाठीं—कसल्याहि बाह्य उपाधीचें अवलंबन नको असतें. विशिष्ट गंधाचे उभे-आडवे पट्टे, निरनिराळा पोषाख, शरीराचें आवृत किंवा अनावृत स्वरूप यांचीहि आवश्यकता नाहीं. शरिरापेक्षां आत्मा हाच केवळ चिंतनीय, मंननीय, स्मरणीय विषय असतो.

* * *

– २९३ –

मग हे गृहस्थांनो, हे साधूंनो, तुम्ही बाह्य चिन्हांचा विचार सोडून उपाधिविरहित परम शुद्ध आत्म्याचें चिंतन करा. विशुद्ध ज्ञान चेतनेच्या निर्मल, विशुद्ध तेजांत न्हाऊन निघा.

परम विशुद्ध अशा ज्ञानचेतनेशीं एकरूप होऊन विचाराच्या—विकल्पाच्या-संकल्पाच्याहि पलीकडे जा. शुद्ध ज्ञानचेतनेनें प्रेरित तुझ्या सर्व क्रिया होऊं देत.

* * *

– २९४ –

आत्मौपम्य दृष्टि प्राप्त झाल्यावर तुला हें सहजच लक्षांत येईल कीं, कसल्याहि प्रकारच्या बाह्य चिन्हांनीं तूं श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरत नाहींस. 'मी कमी कपडे वापरतों, मी दिगंबर आहें,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मी श्वेतांबर आहें, मीं जटा वाढविल्या आहेत इत्यादि विकल्पांचा मोक्ष–मार्गाशी‥ विशुद्ध मार्गाशी संबंध नाहीं.

* * *

– २९५ –

आत्म्याच्या विविध शक्तींची केवळ ओळख मी तुला करून देतें. खऱ्या अर्थानें संपूर्ण शक्तीचें स्वरूप आकलन होणें अशक्य आहे. आत्म्यामध्यें जीवत्व, दर्शन, ज्ञान, सुख, वीर्य, प्रभुत्व, विभुत्व, सर्वदर्शित्व. सर्वज्ञत्व, निर्मलत्व, प्रकाशत्व, असंकुचित-विकासत्व, अकार्यकारणत्व, परिणम्य-परिणामत्व, उत्पाद-ध्रौव्यव्ययत्व, त्यागोपादान-शून्यत्व, अगुरुलघुत्व, अस्तित्व, अमूर्तत्व, अकर्तृत्व, अभोक्तृत्व, निष्क्रियत्व, नियतप्रदेशत्व, स्वधर्म व्यापकत्व, साधारण-असाधारण धर्मत्व, अनंत धर्मत्व, विरुद्ध धर्मत्व, तत्स्वरूपत्व, अतत्स्वरूपत्व, एकत्व, अनेकत्व, भावत्व, अभावत्व, भावाभावत्व, अभावभावत्व, भावभावत्व, अभाव-अभावत्व, भावमय-क्रियाशीलत्व, कर्मशीलत्व, कर्तृत्व, करणत्व, संप्रदानत्व, अपादानत्व, अधिकरणत्व. स्व-स्वामित्व अशा साधारणत: ४७ शक्ति आहेत, या विविध शक्तींची ओळख मी मुद्दामच तुला करून देत आहें. तुझी स्थिति 'तुझें आहे तुजपाशीं परि जागा विसरलासी' अशी झाली आहे. तूं जागृत हो. स्वत:तील दिव्यत्व जाण.

येथें माझा विचार संपला. सर्व विचार आत्म-केंद्रित आहे. विशुद्ध अविनाशी सुख हें या विचार मंथनाचें नवनीत आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जेथें अर्थ-संगती नीट झाली असेल तो गुण प्रभू कुंदकुंद या महान् आचार्यांचा आहे. जेथें अर्थ विसंगति वाटत असेल, तो दोष माझ्या अल्पमतीचा आहे. हंसबुद्धीनें या विचार दुग्धाचें प्राशन करून तुम्ही सुखी व्हावें.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

5199

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi